# महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद आणि राज्यातील कृषि विद्यापीठांच्या कार्याचा

# पुनर्विलोकन अहवाल




**डॉ. आर.बी. देशमुख**

अध्यक्ष, पुनर्विलोकन अभ्यासगट (२०२३-२४)

# महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद आणि राज्यातील कृषि विद्यापीठांच्या कार्याचा

# पुनर्विलोकन अहवाल




**डॉ. आर.बी. देशमुख**

अध्यक्ष, पुनर्विलोकन अभ्यासगट (२०२३-२४)

## महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद आणि राज्यातील कृषि विद्यापीठांच्या कार्याचा

# पुनर्विलोकन अहवाल २०२३-२४


**प्रकाशक**

**महासंचालक**
महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद
पुणे – ४११००७

■ फेब्रुवारी २०२४

# अनुक्रमणिका


| तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|
| मनोगत | १-२ |
| अहवालासंबंधी संक्षिप्त माहिती | ३-४ |
| प्रस्तावना | ५-८ |
| १. प्रशासन | ९-३२ |
| २. कृषि शिक्षण | ३३-५२ |
| ३. कृषि संशोधन व विकास | ५३-७१ |
| ४. कृषि विस्तार शिक्षण | ७२-७८ |
| ५. वित्त | ७९-९१ |
| ६. साधन सामुग्री विकास | ९२-९६ |
| ७. राज्य शासनास सर्वसाधारण शिफारशी | ९७-१०२ |
| परिशिष्ट - १ (अभ्यासगट गठण शासन निर्णय) | १०१-१०३ |
| परिशिष्ट - २ (अभ्यासगट कार्यकक्षा शासन निर्णय) | १०४-१०५ |
| परिशिष्ट - ३ (अभ्यासगट बैठकांचा तपशील) | १०६-१०७ |
| परिशिष्ट - ४ (कृषि विद्यापीठांचे संशोधनातील महत्वपूर्ण योगदान) | १०८-१०९ |
| परिशिष्ट - ५ (विद्यापीठ कृषि विस्तार शिक्षण व कृषि विभागाच्या विस्तार कार्याची सांगड) | ११०-११२ |

# मनोगत



**डॉ. आर.बी. देशमुख**
अध्यक्ष तथा माजी कुलगुरु
मफुकृवि, राहुरी

सन १९६० आणि ७० च्या दशकात राज्यात कृषि विद्यापीठांची स्थापना झाली तेव्हा राज्याची आणि देशाची गरज अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ करणे ही होती. वाढत्या लोकसंख्येला पुरेसे अन्न मिळेल इतके पिकविणे ही आपली प्राथमिक गरज होती. खरेतर या गरजेपोटीच देशात कृषि विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. त्यामुळे कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्याचे एकात्मिकीकरण करणे शक्य झाले आणि देश अन्नधान्य पिकविण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. एवढेच नव्हे तर आपण अन्नधान्याबरोबरच विविध शेतमालाचे जसे की, फळे, भाजीपाला, दुध, मांस, मासे, अंडी, इत्यादी पौष्टिक शेतमालाचेही उत्पादन अनेक पटींनी वाढवून त्यांची अनेक देशांना निर्यात करून आपल्या देशाला मोठया प्रमाणावर परकीय चलन मिळत आहे. परंतु, आज बदलत्या गरजांनुसार शेती आणि शेतकऱ्यांपुढे नवीन आव्हाने उभी राहत आहेत.

१. देशाचे कृषि उत्पादन वाढले परंतु उत्पादन खर्चात मोठी वाढ झाल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात अपेक्षित वाढ झाली नाही,
२. शेतीच्या जागतिकीकरणामुळे आपल्या अल्प, अत्यल्प आणि कोरडवाहू भूधारक शेतकऱ्यांना प्रगत देशातील शेतकरी आणि कार्पोरेट शेती बरोबर उत्पादकता आणि शेतमालाच्या गुणवत्तेबाबत जीवघेणी स्पर्धा करावी लागत आहे,
३. जगभर होत असलेल्या हवामान बदलाचे (तापमानातील वाढ, दुष्काळ, गारपीट, अवकाळी पाऊस) सर्वात जास्त दुष्परिणाम शेतीवर विशेषत: महाराष्ट्रातील शेतीवर होत आहेत.

या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आपल्याला राज्यातील कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्याचा आढावा घेवून वेळीच उपाययोजना आखणे, त्यासाठी सुयोग्य धोरण ठरविणे आवश्यक आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कृषि शिक्षणातही राबविण्यासाठी व्यवहार्य आराखडा तयार करणे व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे. कृषि संशोधनावर आधारीत अद्यावत तंत्रज्ञान शेतकरी आणि उद्योजकांपर्यंत प्रभावीपणे पोहचल्याशिवाय त्याचा उपयोग नाही, त्यासाठी कृषि विस्तार शिक्षण आणि तंत्रज्ञान प्रचार व प्रसारात कृषि संशोधकांचा सक्रीय सहभाग असणे अपेक्षित आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीचा गांभीर्यपूर्वक विचार करून कृषि विद्यापीठे व महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद यांच्या समग्र कार्याचे पुनर्विलोकन करण्याचे शासनाने ठरविले असून त्यासाठी अभ्यास गट गठीत करण्यात आला आहे.

तत्कालीन कृषि मंत्री मा.ना.श्री. अब्दुल सत्तार यांनी स्वत: पुढाकार घेवून या अभ्यासगटाची स्थापना केली आणि विद्यमान कृषि मंत्री मा.ना.श्री. धनंजय मुंडे यांनी अभ्यासगटाचे कार्यास सातत्यपूर्ण पाठबळ दिले याबद्दल अभ्यासगट त्यांचे ऋण व्यक्त करतो. तसेच तत्कालीन प्रधान सचिव (कृषि), श्री. एकनाथ डवले, भाप्रसे व विद्यमान अपर मुख्य सचिव (कृषि), श्री. अनूप कुमार, भाप्रसे यांचे मार्गदर्शन आणि शासनाचा भक्कम पाठिंबा यामुळेच कृषि विद्यापीठांच्या कार्याचे पुनर्विलोकन व्यापक दृष्टीकोनातून पूर्ण करणे शक्य झाले, त्याबद्दल अभ्यासगट त्यांचे आभार व्यक्त करतो.

सदर अभ्यासगटाने कृषि शिक्षण, संशोधन, विस्तार शिक्षण, साधन सामुग्री विकास, प्रशासन व वित्त या विषयनिहाय सहा उपसमित्या स्थापन करून त्याबाबतची सविस्तर माहिती संकलित करून आणि त्याअनुषंगाने विस्तृत चर्चा करून अहवाल अंतिम केला आहे. सदर अहवालातील मार्गदर्शक सूचना आणि शिफारशी राज्यातील कृषि विद्यापीठांच्या भविष्यातील विकासासाठी उपयोगी ठरतील यामध्ये दुमत नाही. अहवालामध्ये शेतकरी व विद्यार्थी हे केंद्र बिंदू मानून कृषि परिषद व कृषि विद्यापीठांच्या कार्याचे पुनर्विलोकन करण्यात आले आहे.

अभ्यासगटाचे सन्माननीय सदस्य, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू, डॉ. प्रशांतकुमार पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरू, डॉ. शरद गडाख, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू, डॉ. इंद्र मणि, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे कुलगुरू, डॉ. संजय भावे आणि महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक तथा सदस्य सचिव, श्री. रावसाहेब भागडे, भाप्रसे यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगटाने गठीत केलेल्या विविध उपसमित्यांनी कृषि परिषद व कृषि विद्यापीठांकडील सर्व आवश्यक ती माहिती संकलित करून त्यांच्या कार्याचा पुनर्विलोकन अहवाल तयार करण्यात सक्रीय सहभाग नोंदविला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सदर अभ्यासगटामध्ये कृषि विद्यापीठांशी योग्य समन्वय ठेवून शासकीय योजना प्रभावीपणे राबविणारे आणि भविष्यातील संभाव्य आव्हाने ओळखून त्यानुसार शासकीय धोरणात बदलांचा आग्रह धरणारे माजी कृषि आयुक्त, डॉ. उमाकांत दांगट, भाप्रसे (सेवानिवृत्त) यांनी उपसमित्यांना सखोल मार्गदर्शन करण्यापासून ते अभ्यासगटाचा अंतिम अहवाल तयार करण्यात आणि निश्चित स्वरुपाच्या मार्गदर्शक सूचना व शिफारशी कायम करण्यात जे मोलाचे योगदान दिले त्याबद्दल मी व्यक्तिश: त्यांचा आभारी आहे.

कृषि विभाग आणि कृषि विद्यापीठे यांच्यातील समन्वय व सहकार्याची भावना अधिक वृध्दिंगत व्हावी, यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता विचारात घेऊन या क्षेत्रातील तज्ञ माजी कृषि संचालक डॉ. सुदाम अडसूळ आणि ग्रामीण विकास क्षेत्रीय कामाचा दांडगा अनुभव असलेले डॉ. दिलीप देशमुख यांनी देखील सदर अहवाल तयार करण्यासाठी विशेष योगदान दिलेले आहे, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

डॉ. हरिहर कौसडीकर, संचालक (संशोधन), कृषि परिषद, पुणे यांनी अभ्यासगटाला केलेले सहकार्य आणि मदत याचा उल्लेख केल्याशिवाय हे मनोगत पूर्ण होऊच शकत नाही. अभ्यासगटाचे सर्व सदस्य व त्यांच्या उपसमित्यांचे सदस्य सचिव यांचेशी सतत संपर्कात राहून अहवाल प्राप्त करून घेणे, कृषि विद्यापीठांमध्ये अभ्यासगट सदस्यांच्या भेटी आयोजित करणे, कृषि विद्यापीठांतील विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी तसेच कृषि विभागातील अधिकारी, प्रगतीशील शेतकरी या सर्वांशी संपर्क साधून त्यांच्या सुचनांचा अहवालात अंतर्भाव करण्यात त्यांनी जे योगदान दिले ते अनमोल आहे. तसेच, डॉ. रोहिणी दराडे, वरिष्ठ संशोधन सहाय्यक व श्री. अक्षय देशमुख, संगणक चालक यांनी संपूर्ण अहवालाचे टंकलेखन व मांडणीमध्ये दिलेले योगदान कौतुकास पात्र आहे. त्यासाठी मी स्वत: आणि संपूर्ण अभ्यासगट त्यांचा आभारी आहे.

अभ्यासगटाच्या सर्व उपसमित्यांचे सदस्य, कृषि परिषद व कृषि विद्यापीठांचे सर्व संचालक, सहसंचालक, अधिकारी व कर्मचारी यांनी अहवालासाठी माहिती संकलन आणि विविध बैठकांतील सविस्तर विचारविनिमयात दिलेल्या योगदानाबद्दल अभ्यासगटाच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

अभ्यासगटाच्या वतीने प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेस अनुसरून कृषि विद्यापीठांचे माजी कुलगुरू, प्राध्यापक, कृषि विभागातील अधिकारी, प्रगतीशील शेतकरी, विद्यार्थी आणि कृषि उद्योजक यांनी सादर केलेल्या उपयुक्त सूचनांबद्दल अभ्यासगट त्यांचे विशेष आभार व्यक्त करीत आहे.

अभ्यासगटाचा अहवाल महाराष्ट्र शासनास, कृषि शिक्षण, संशोधन, विस्तार विषयक धोरण ठरविण्यास तसेच, कृषि परिषद व राज्यातील कृषि विद्यापीठांना त्यांच्या भविष्यातील वाटचालीस दिशादर्शक ठरेल, असा विश्वास वाटतो.

पुणे
२९ फेब्रुवारी, २०२४

**(डॉ. आर.बी. देशमुख)**
अध्यक्ष तथा माजी कुलगुरु
मफुकृवि, राहुरी

# अहवालासंबंधी संक्षिप्त माहिती

कोणत्याही संस्थेच्या कार्याचा वेळोवेळी आढावा घेवून तिच्या ध्येय धोरणात व कार्यपध्दतीत कालसुसंगत बदल करणे संस्थेच्या शाश्वत विकासासाठी आवश्यक असते. राज्यात कृषि विद्यापीठांची स्थापना होवून पाच दशके होवून गेली. या कृषि विद्यापीठांच्या शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण कार्यांमध्ये समन्वय व सुसूत्रता राखण्यासाठी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेची स्थापना सन १९८४ मध्ये करण्यात आली. त्यास देखील या वर्षी चार दशके पूर्ण होत आहेत.

राज्यातील चारही कृषि विद्यापीठांनी कृषि शिक्षण व संशोधनात भरीव कामगिरी केली असून कृषि तंत्रज्ञान विस्तार कार्यातही त्यांनी मोठे योगदान दिले आहे. याचा लाभ फक्त कृषि विद्यापीठांचे विद्यार्थी व शेतकरी यांच्या पुरताच सिमीत न राहता कृषि क्षेत्राशी निगडीत कृषि उद्योग, व्यवसाय, सेवा क्षेत्र व उपभोक्ता ग्राहक या सर्वच घटकांना झाला आहे.

कृषि विद्यापीठांनी प्रशिक्षित केलेले कुशल मनुष्यबळ आणि विकसित केलेले तंत्रज्ञान यांचा राज्याच्या सर्वांगीण विकासात मोलाचा सहभाग आहे. तथापि, जागतिक हवामान बदल व जागतिकीकरण यामुळे सध्या शेती क्षेत्र संक्रमण स्थितीतून मार्गक्रमण करीत आहे. अशा परिस्थितीत राज्यातील शेतीला व शेतकऱ्यांना स्थैर्य प्राप्त करून त्यांचा शाात विकास करणे हे राज्यापुढील मोठे आव्हान आहे. देशभर नवीन शैक्षणिक धोरण-२०२० राबविण्यात येत आहे. त्याची राज्याच्या कृषि शिक्षणात अंमलबजावणी करण्यासाठी प्रचलित शिक्षण पध्दतीत व अभ्यासक्रमात आवश्यक ते बदल करणे आणि त्याअनुषंगाने कृती आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे.

कृषि विद्यापीठांमध्ये होत असलेल्या संशोधनावर आधारीत तंत्रज्ञान लवकरात लवकर आणि योग्य प्रकारे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषि विद्यापीठांमधील संशोधक आणि कृषि व संलग्न विभागातील विस्तार कार्यकर्ते यांची सांगड घालून सातत्यपूर्ण समन्वय साधण्याची गरज आहे. कृषि विद्यापीठांनी पुढील संशोधन आणि शिक्षणासाठी आर्थिकदृष्टया केवळ शासनावर अवलंबून न राहता कृषि विद्यापीठांकडे असलेली सुमारे १५००० हेक्टर जमीन, साधन सामुग्री व मनुष्यबळाचा अधिक कार्यक्षमपणे वापर करून स्व-उत्पन्नाची साधने वाढविण्यास मोठा वाव आहे. तसेच, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन संस्थांसोबत सहकार्य वाढवून आर्थिक सहाय्य मिळविण्याच्या देखील अनेक संधी उपलब्ध आहेत.

या संदर्भात महाराष्ट्र कृषि परिषद व कृषि विद्यापीठे यांच्या कार्याचे पुनर्विलोकन करून त्यांचे कामकाज कालसुसंगत व परिणामकारक करण्याच्या अनुषंगाने अहवाल तयार करण्यासाठी शासनाने डॉ. आर.बी. देशमुख, माजी कुलगुरू, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट गठीत केला आहे. सदर अभ्यासगटाने शासनाने ठरवून दिलेल्या कार्यकक्षेनुसार सहा उपसमित्या स्थापन करून माहिती संकलित केली व त्यावर सांगोपांग चर्चा व विचारविनिमय करून समग्र अहवाल तयार केला आहे.

शासनाने अभ्यासगटास ठरवून दिलेल्या कार्यकक्षेनुसार प्रकरणनिहाय तयार करण्यात आलेला हा अहवाल राज्य शासनास दीर्घकालीन धोरण ठरविण्यासाठी उपयुक्त ठरेल. तसेच, कृषि परिषद व कृषि विद्यापीठे यांना त्यांच्या भविष्यकालीन वाटचालीत दिशादर्शक व दैनंदिन कामकाजात मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास वाटतो.

**रावसाहेब भागडे** (भाप्रसे)
सदस्य सचिव
महासंचालक, कृषि परिषद, पुणे

**डॉ. उमाकांत दांगट** (भाप्रसे)(से.नि.)
सदस्य
माजी कृषि आयुक्त, म.रा.,पुणे

**डॉ. आर.बी. देशमुख**
अध्यक्ष
माजी कुलगुरु, मफुकृवि,राहुरी

**डॉ. शरद गडाख**
सदस्य तथा कुलगुरू
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

**डॉ. इंद्र मणि**
सदस्य तथा कुलगुरु
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

**डॉ. प्रशांतकुमार पाटील**
सदस्य तथा कुलगुरू
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

**डॉ. दिलीप देशमुख**
सदस्य तथा से.नि. उपमुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य

**डॉ. सुदाम अडसुळ**
सदस्य तथा माजी संचालक
कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे

**डॉ. संजय भावे**
सदस्य तथा कुलगुरू
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

# प्रस्तावना

स्वातंत्र्यपूर्व काळात आणि त्यानंतरच्या दशकात भारताकडे जग एक 'भुकेला देश' म्हणून पाहत होते. सन १९५० मध्ये भारताची लोकसंख्या ३५.९० कोटी आणि अन्नधान्याचे उत्पादन ५०.८२ दशलक्ष टन होते. या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागेल इतके उत्पादन भारतात होत नव्हते. भारतातील जनतेची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी परदेशातून मोठया प्रमाणावर अन्नधान्य आयात करावे लागत असे. खरे तर वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी शेतीच्या उत्पादन वाढीची गरज १९ व्या शतकातच जाणवायला लागली होती त्यासाठी सन १८८१ च्या फेमीन कमीशनने शिफारस केल्यानुसार जुलै, १८८३ मध्ये कृषि खात्याची स्थापना करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य हे देशात कृषि शिक्षणाची सुरुवात करणारे अग्रगण्य राज्य आहे. नागपूर येथे १९०५ साली तर पुणे येथे १९०७ साली स्वतंत्र कृषि महाविद्यालयांची स्थापना होवून खऱ्या अर्थाने उच्च कृषि शिक्षणाची सुरुवात झाली. सन १९११ पासून गरजेनुसार विविध हवामान विभागात कृषि संशोधन केंद्राची स्थापना करण्यात आली. त्याचप्रमाणे, कृषि शिक्षणासाठी राज्याच्या प्रत्येक जिल्हयात दोन वर्ष कालावधी अभ्यासक्रमाच्या शासकीय कृषि शाळा स्थापन करण्यात आल्या.

केंद्र शासनाने सन १९६४ साली डॉ. बी. एस कोठारी यांचे अध्यक्षतेखाली कृषि शिक्षणाचा अभ्यास करण्यासाठी समितीची स्थापना केली. सदर समितीने कृषि उत्पादन वाढ व ग्रामीण विकासासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाची गरज अधोरेखित करुन प्रत्येक राज्यात एक कृषि विद्यापीठ असावे अशी शिफारस केली. सदर समितीने शिफारस केल्यानुसार अमेरीकेतील लँडग्रँट महाविद्यालयाच्या धर्तीवर राज्यात राहुरी जिल्हा अहमदनगर येथे २९ मार्च, १९६८ रोजी महाराष्ट्र कृषि विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. तथापि, राज्याचा एकूण विस्तार आणि विविध विभागातील हवामान आणि त्याअनुषंगाने पीक रचनेतील विविधता लक्षात घेऊन सन १९६९ मध्ये विदर्भ व मराठवाडा विभागासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आणि राहुरी जिल्हा अहमदनगर येथील महाराष्ट्र कृषि विद्यापीठाचे महात्मा फुले कृषि विद्यापीठ असे नामांतरण करण्यात आले. पुढे चालून सन १९७२ मध्ये मराठवाडा विभागासाठी परभणी येथे मराठवाडा कृषि विद्यापीठ आणि दापोली जिल्हा रत्नागिरी येथे कोकण विभागासाठी कोकण कृषि विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. कालांतराने त्या विद्यापीठांचा अनुक्रमे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली असा नामविस्तार करण्यात आला. अशा प्रकारे कृषि विद्यापीठांच्या स्थापनेनंतर त्या त्या विभागातील सर्व कृषि महाविद्यालये, कृषि संशोधन केंद्र आणि कृषि विद्यालये संबंधित कृषि विद्यापीठांकडे हस्तांतरित करण्यात आली. यानंतर नवीन शासकीय कृषि, कृषि अभियांत्रिकी, उद्यानविद्या, पशुविज्ञान, मत्स्यविज्ञान, अन्नतंत्रज्ञान, कृषि जैवतंत्रज्ञान, कृषि व्यवसाय व्यवस्थापन, वनशास्त्र इत्यादी विषयांची कृषि संलग्न महाविद्यालये स्थापन करण्यात आली.

भारतीय राज्यघटनेच्या सातव्या अनुसूचीनुसार कृषि हा विषय सूची - २ (राज्य सूची) मध्ये अनुक्रमांक १४ वर समाविष्ट करण्यात आला असून राज्यघटनेच्या अनुच्छेद २८६ उपखंड ३ प्रमाणे कृषि, कृषि शिक्षण आणि संशोधन यासंदर्भात कायदे करण्याचे आणि धोरण ठरविण्याचे अधिकार राज्य शासनास आहेत. सन १९८३ मध्ये राज्यातील कृषि विद्यापीठांसाठी स्वतंत्र कायदा तयार करण्यात आला. त्या कायद्यानुसार कृषि विद्यापीठांमध्ये प्रभावी समन्वय व सुसूत्रता साधण्यासाठी महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम,१९८३ मधील कलम १२ मधील तरतूदीनुसार सन १९८४ मध्ये पुणे येथे महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेची स्थापना करण्यात आली.

देशात वारंवार पडणारे दुष्काळ आणि देशाच्या लोकसंख्या वाढीचा दर अन्नधान्य उत्पादनाच्या दरापेक्षा जास्त असल्याने अन्नधान्याचे उत्पादन वाढविणे अत्यावश्यक होते. यासाठी भारत सरकराने १९६५ साली हरितक्रांतीला सुरवात केली. हरितक्रांतीच्या सकारात्मक परिणामामुळे १९७८-७९ मध्ये अन्नधान्याचे १३१ दशलक्ष टन उत्पादन झाले. यामुळे भारताची गणना जगातील मोठया कृषि उत्पादक देशांमध्ये होऊ लागली. त्यानंतर अन्नधान्याच्या उत्पादनात सातत्यपूर्ण वाढ होत असून दर वर्षी कृषि उत्पादनाचे नवे उच्चांक प्रस्थापित होत आहेत. सन २०२२-२३ या वर्षात देशाचे अन्नधान्याचे उत्पादन ३२९.६८ दशलक्ष टन झाले आहे.

महाराष्ट्र राज्यात कृषि हवामान व भौगोलिक रचनेनुसार एकूण नऊ कृषि हवामान विभाग आहेत. प्रत्येक विभागातील जमीन, पिके, पीकपध्दती तसेच शेतीसंबंधीच्या समस्या भिन्न स्वरुपाच्या आहेत. या समस्यांवर स्थानिक परिस्थितीनुरुप कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षणाचे कार्य करून त्यावर राज्यातील कृषि विद्यापीठांद्वारे उपाय योजना सुचविण्यात येतात. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आणि विशेषत: विद्यापीठांच्या स्थापनेनंतर संशोधन कार्य प्रभावीरित्या होण्याकरीता शेतकऱ्यांच्या गरजा व कृषि क्षेत्रातील समस्या लक्षात घेऊन राज्यातील कृषि संशोधन केंद्रांचे मोठया प्रमाणावर बळकटीकरण करण्यात आले. प्रत्येक विद्यापीठाचे मुख्यालयी विविध संशोधन केंद्रावर अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत.

कृषि क्षेत्र सध्या अनेक नैसर्गिक व जागतिक आव्हानांना सामोरे जात असून यामध्ये मुख्यत: खालील बाबींचा समावेश होतो.

१. शेतक-यांचे कमी होत जाणारे जमीनधारण क्षेत्र,
२. कोरडवाहू शेतीचे मोठे प्रमाण,
३. जागतिक तापमान वाढ व हवामान बदल,
४. जागतिकीकरण व व्यापार स्पर्धा,
५. नागरीकरण आणि औद्योगिकरण यामुळे कृषि क्षेत्रासाठी कमी होत जाणारी जमीन व पाण्याची उपलब्धता,
६. उदरनिर्वाहासाठी शेतीकडून व्यापारी शेतीकडे होणारे संक्रमण,
७. शेतीच्या वाढत्या उत्पादन खर्चामुळे निव्वळ उत्पन्नात होणारी सातत्यपूर्ण घट,
८. बाजारपेठेची अनिश्चितता,
९. नागरिकरणामुळे आणि नागरिकांच्या वाढत्या आर्थिक उत्पन्नामुळे ग्राहकांच्या गरजेत आणि अपेक्षेत झालेले बदल,
१०. देशात बहुतांश पिकांचे विक्रमी उत्पादन होत असले तरीही कृषि पणन, साठवणूक, प्रक्रिया व मूल्यवर्धीत साखळी यामधील विस्कळीतपणा
११. कृषि उत्पादने आयात-निर्यात धोरणातील सातत्याचा अभाव,
१२. कृषि हे अर्थव्यवस्थेचे प्राथमिक क्षेत्र असूनही अर्थार्जनाचे दृष्टीने किफायतशीर नसल्याने उद्योग व सेवा क्षेत्राकडे तरुणाईचे वाढते आकर्षण,
१३. कृषि विकासात खाजगी गुंतवणुकीचा अभाव,
१४. कृषि शिक्षण व संशोधन क्षेत्रात अपुरी गुंतवणूक,
१५. आर्थिक विवंचनेत होणाऱ्या शेतकरी आत्महत्या.

कृषि क्षेत्रासमोरील उपरोक्त आव्हानांचा विचार करता, भविष्यात शेती व्यवसायात स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी जैवतंत्रज्ञान, कृषि तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान यांच्या योग्य समन्वयातून शिक्षण आणि संशोधन या क्षेत्रात महत्वपूर्ण बदल करण्याची आवश्यकता आहे. यासाठी कृषि विद्यापीठे व कृषि परिषदेच्या कार्यपध्दतीचे मूल्यमापन करुन कालसुसंगत दिशा व कार्यप्रणाली निश्चित करणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने कृषि परिषद व कृषि विद्यापीठे यांच्या कार्याचे पुनर्विलोकन करून सुधारणा व उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ. आर. बी. देशमुख, माजी कुलगुरू, मफुकृवि, राहुरी यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे अभ्यासगट गठीत करण्यात आला.

| अ.क्र | अध्यक्ष /सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १. | डॉ. आर. बी. देशमुख, माजी कुलगुरू, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | अध्यक्ष |
| २ | श्री. उमाकांत दांगट, (भाप्रसे), माजी कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ३ | डॉ. प्रशांतकुमार पाटील, कुलगुरू, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | सदस्य |
| ४ | डॉ. शरद गडाख, कुलगुरू, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | सदस्य |
| ५ | डॉ. इंद्र मणि, कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | सदस्य |
| ६. | डॉ. संजय भावे, कुलगुरु, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली | सदस्य |
| ७. | डॉ. सुदाम अडसुळ, माजी संचालक, कृषि, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ८. | डॉ. दिलीप देशमुख, से.नि. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ९. | श्री. रावसाहेब भागडे, (भाप्रसे) महासंचालक, कृषि परिषद, पुणे | सदस्य सचिव |

या समितीस खालील कार्यकक्षेस अधिन राहून महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे आणि राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांच्या कार्याचा पुनर्विलोकन अहवाल तयार करण्याविषयी शासन निर्णय क्रमांक मकृप/१०२२/प्र.क्र.२६४/७-अे, दि. २५/०४/२०२३ अन्वये व शासन पत्र दि. ०१/०६/२०२३ अन्वये खालीलप्रमाणे कार्यकक्षा निश्चित करून देण्यात आली आहे.

| अ.क्र. | विभाग/ विषय | अभ्यासगट कार्यकक्षा |
|---|---|---|
| १. | प्रशासन | कृषि क्षेत्राच्या भविष्याचा वेध घेऊन कृषि शिक्षण व संशोधन परिषद आणि राज्यातील कृषि विद्यापीठे यांच्या संदर्भातील कायदेशीर तरतूदी व प्रचलित नियमावली यांचा आढावा घेऊन कालसुसंगत सुधारणा सुचविणे. |
| २. | शिक्षण | राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी सुसंगत राज्य कृषि शिक्षण धोरणाचे प्रारुप व त्याअनुषंगीक अंमलबजावणी कृती आराखडा तयार करणे... |
| ३. | संशोधन | कृषि विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या संशोधन केंद्रांचा संक्षिप्त आढावा घेऊन त्यांचे बळकटीकरण करणे तसेच राज्यात नव्याने लागवडीखाली आलेल्या व प्रस्थापित होत असलेल्या पिकावरील संशोधनासाठी उपाययोजना सुचविणे... |
| ४. | विस्तार शिक्षण | कृषि विद्यापीठांतर्गत चालू असलेल्या विस्तार शिक्षण कार्यक्रमांचा राज्याच्या कृषि विभागाच्या कृषि विस्तार योजनांशी पूर्वीच्या प्रशिक्षण व भेट योजनेप्रमाणे सांगड घालून आणि समन्वय व सहकार्य वाढवून अद्ययावत तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषि विस्तार यंत्रणा सक्षम व परिणामकारक करण्यासाठी उपाय सुचविणे... |
| ५. | वित्त | अ) कृषि विद्यापीठांना मिळणारी अनुदाने, त्यांची स्व-उत्पन्नाची साधने आणि अन्य आर्थिक स्त्रोतांचा आढावा घेऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी उपाययोजना सुचविणे. ब) विद्यापीठांचे शासनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे. |
| ६. | साधनसामुग्री विकास | कृषि विद्यापीठांकडे असलेल्या जमिनींसंदर्भात संरक्षण व व्यवस्थापन करीता उपाययोजना सुचविणे |

शासनाने ठरवून दिलेल्या कार्यकक्षेच्या अनुषंगाने प्रत्येक बाबींची माहिती संकलित करून त्यावर चर्चा करून प्राथमिक अहवाल सादर करण्यासाठी उपरोक्त विषयनिहाय उपसमित्या गठीत करण्यात आल्या.

अभ्यासगटाचे अध्यक्ष व सदस्य यांनी कृषि विद्यापीठांना भेटी देवून तेथील प्राध्यापक, संशोधक, अधिकारी व शेतकरी प्रतिनिधी यांच्याशी चर्चा केली. वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देवून कृषि विभाग, कृषि विद्यापीठे आणि कृषि परिषदेमधील कार्यरत, सेवानिवृत्त कृषि तज्ञ, शासकीय व खाजगी कृषि संस्थांमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचारी, प्रगतीशील शेतकरी, कृषि उद्योजक तसेच कृषि विद्यापीठातील विद्यार्थी यांचेकडून सूचना मागविण्यात आल्या.

उपसमित्यांनी सविस्तर माहिती संकलित करून विविध मुद्यांवर विचार विनिमय केला आणि त्यांच्या अभिप्रायासह अभ्यासगटास त्यांचे प्राथमिक अहवाल सादर केले. या अहवालांवर अभ्यासगटाने सर्व सदस्यांशी साधक-बाधक चर्चा केली तसेच कृषि क्षेत्रातील विविध तज्ञांकडून प्राप्त सूचना व अभिप्राय विचारात घेवून योग्य त्या शिफारशींसह समग्र अहवाल तयार केला आहे.

शासनाने अभ्यासगटास ठरवून दिलेल्या कार्यकक्षेनुसार प्रकरणनिहाय तयार करण्यात आलेला हा अहवाल राज्य शासनास दीर्घकालीन धोरण ठरविण्यासाठी उपयुक्त ठरेल. तसेच, कृषि परिषद व कृषि विद्यापीठे यांना त्यांच्या भविष्यकालीन वाटचालीत दिशादर्शक व दैनंदिन कामकाजात मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास वाटतो.

# १. प्रशासन

**कार्यकक्षा :** कृषि क्षेत्राच्या भविष्याचा वेध घेऊन कृषि शिक्षण व संशोधन परिषद आणि राज्यातील कृषि विद्यापीठे यांच्या संदर्भात कायदेशीर तरतूदी व प्रचलित नियमावली यांचा आढावा घेऊन कालसुसंगत सुधारणा सुचविणे...

शासनाने ठरवून दिलेल्या कार्यकक्षेनुसार प्रशासन विषयाबाबत सविस्तर माहिती संकलित करून अधिनियमात आवश्यक सुधारणा सुचविण्यासाठी कृषि परिषदेचे महासंचालक श्री. रावसाहेब भागडे यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे उपसमिती स्थापन करण्यात आली.

| अ.क्र. | उपसमिती | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. रावसाहेब भागडे, महासंचालक, कृषि परिषद, पुणे | अध्यक्ष |
| २. | डॉ. सुदाम अडसूळ, माजी कृषि संचालक | सदस्य |
| ३. | डॉ. हरिहर कौसडीकर, संचालक (संशोधन), कृषि परिषद, पुणे | सदस्य |
| ४. | डॉ. नितीन गोखले, सेवानिवृत्त प्राध्यापक, डॉ.बासाकोकृवि, दापोली. | सदस्य |
| ५. | कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | सदस्य |
| ६. | कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | सदस्य |
| ७. | कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | सदस्य |
| ८. | कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली | सदस्य |
| ९. | डॉ. वैभव शिंदे, सहसंचालक (प्रशासन), कृषि परिषद, पुणे | सदस्य सचिव |

अमेरिकेतील लॅंडग्रॅंट महाविद्यालयाच्या धर्तीवर कृषि क्षेत्रातील शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण या उद्दिष्टांचा योग्य तो समन्वय साधण्यासाठी आणि कृषि क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठांची स्थापना करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्यात सध्या एकूण चार कृषि विद्यापीठे कार्यरत असून त्यांच्यामध्ये प्रभावी समन्वय व सुसूत्रता साधण्यासाठी महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ मधील कलम १२ अन्वये दि. १० सप्टेंबर, १९८४ रोजी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेची स्थापना करण्यात आली. कृषि परिषदेचे मुख्यालय पुणे येथे असून राज्याचे कृषि मंत्री हे परिषदेचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

कृषि परिषदेच्या संरचनेत सद्यस्थितीत १९ सदस्य आहेत यापैकी सहा सदस्य हे कृषि शास्त्रज्ञ आहेत. महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अेयुजी-१९८४/सीआर-१५-१९-अे, दि. १०.०९.१९८४ नुसार कृषि परिषदेच्या दैनंदिन कामकाजासाठी एकुण ४१ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. कृषि परिषदेत अद्याप पदभरती न झाल्याने सदरची पदे प्रतिनियुक्ती, सेवासंचित तसेच कंत्राटी पद्धतीने भरुन कृषि परिषदेचे कामकाज चालवण्यात येते.

महाराष्ट्रात चार कृषि विद्यापीठे असुन त्यांची स्थापना व त्यांचे कार्यक्षेत्र याबाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे.

| विद्यापीठाचे नाव | स्थापना वर्ष | विद्यापीठाचे कार्यक्षेत्र (जिल्हे) |
|---|---|---|
| महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | २९ मार्च, १९६८ | अहमदनगर, धुळे, जळगाव, कोल्हापूर, नंदुरबार, नाशिक, पुणे, सांगली, सातारा व सोलापुर (१०) |
| डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | २० ऑक्टोबर, १९६९ | अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपुर, गडचिरोली, गोंदीया, नागपुर, वर्धा, वाशिम व यवतमाळ (११) |
| वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | १८ मे, १९७२ | बीड, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, हिंगोली, जालना, लातुर, नांदेड व परभणी (०८) |
| डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली | १८ मे, १९७२ | मुंबई, मुंबई उपनगर, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि ठाणे (०७) |

राज्यातील चारही कृषि विद्यापीठांतील शिक्षक व शिक्षकेतर पदांबाबतची माहिती (मंजूर पदे, भरलेली पदे, रिक्त पदे व रिक्त पदांची टक्केवारी) खालीलप्रमाणे आहे.

### अ ) विद्यापीठनिहाय शिक्षक वर्गीय पदांबाबतचा तपशील (डिसेंबर, २०२३ अखेर)

| विद्यापीठाचे नाव | मंजूर | भरलेली | रिक्त | रिक्त पदांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| मफुकृवि, राहुरी | ९८२ | ४७९ | ५०३ | ५१.२२ |
| डॉ. पंदेकृवि, अकोला | ६४९ | ३७२ | २७७ | ४२.६८ |
| वनामकृवि, परभणी | ७१६ | ४१६ | ३०० | ४१.८९ |
| डॉ. बासाकोकृवि,दापोली | ३३५ | २३३ | १०२ | ३०.४५ |
| एकूण | २६८२ | १५०० | ११८२ | ४४.०७ |

### ब) विद्यापीठनिहाय शिक्षकेतर पदांबाबतचा तपशील (डिसेंबर, २०२३ अखेर)

| विद्यापीठाचे नाव | मंजूर | भरलेली | रिक्त | रिक्त पदांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| मफुकृवि, राहुरी | ३५५३ | १८७५ | १६७८ | ४७.२३ |
| डॉ. पंदेकृवि, अकोला | २७१० | ९९६ | १७१४ | ६३.२५ |
| वनामकृवि, परभणी | २१६९ | ९२६ | १२४३ | ५७.३१ |
| डॉ. बासाकोकृवि, दापोली | १४२५ | ९७६ | ४४९ | ३१.५१ |
| एकूण | ९८५७ | ४७७३ | ५०८४ | ५१.५८ |

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद आणि कृषि विद्यापीठे यांचे कामकाज महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम, १९८३ आणि परिनियम १९९० मधील तरतूदींनुसार चालते. तथापि, यासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या उपसमितीने केलेला अभ्यास आणि त्यांची निरीक्षणे, दैनंदिन कामकाजात उद्‌भवणाऱ्या अडचणी तसेच भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने तयार केलेला मॉडेल ॲक्ट मधील प्रस्तावित तरतूदी विचारात घेवून कृषि विद्यापीठे अधिनियम, १९८३ व त्याखाली निर्गमित केलेले परिनियम १९९० मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा सुचविण्यात येत आहेत.

### १.१ महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेची प्रस्तावित संरचना

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम, १९८३ मधील प्रकरण ३ कलम १२ अन्वये महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेची संरचना निश्चित करण्यात आलेली आहे. यात खालील प्रमाणे सुधारणा प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र | कलम | विद्यमान तरतूद | कलम | सुधारित तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | १२(२)अ | अध्यक्ष - मा. कृषि मंत्री, महाराष्ट्र राज्य. | १२(२)अ | अध्यक्ष - मा. कृषि मंत्री, महाराष्ट्र राज्य. |
| २ | १२(२)ब | उपाध्यक्ष - शासनाने नियुक्त करावयाची कृषि विकासाच्या कोणत्याही घटकाच्या बाबतीत तज्ञ असलेली व्यक्ती. | १२(२)ब | उपाध्यक्ष - शासनाने नियुक्त करावयाची कृषि विकासाच्या कोणत्याही घटकाच्या बाबतीत तज्ञ असलेली व्यक्ती. |
| ३ | १२(२)क (१) | पदसिध्द सदस्य - राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांचे कुलगुरू | १२(२)क (१) | पदसिध्द सदस्य - राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांचे कुलगुरू |
| ४ | १२(२)क (२) | पदसिध्द सदस्य - मुख्य सचिव प्रधान सचिव (कृषि विभाग) अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त विभाग) सचिव (नियोजन विभाग) | १२(२)क (२) | पदसिध्द सदस्य - अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव (कृषि विभाग), मंत्रालय, मुंबई आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, पुणे (कृषि परिषदेच्या स्थापनेपासून आतापर्यंत मा. मुख्य सचिव तसेच वित्त व नियोजन विभागाचे सचिव हे त्यांच्या कार्यबाहुल्यामुळे एकाही बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत. कृषि विभाग आणि कृषि विद्यापीठे यांच्यात योग्य तो समन्वय राहावा यासाठी आयुक्त (कृषि) यांना परिषदेवर सदस्य म्हणून प्रस्तावित करण्यात येत आहे.) |
| ५ | १२(२)क (३) | सदस्य - राज्य शासनाने नियुक्त करावयाचा भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचा प्रतिनिधी | १२(२)क (३) | सदस्य - राज्य शासनाने नियुक्त करावयाचा भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचा प्रतिनिधी |
| ६ | १२(२)क (४) | अशासकीय सदस्य - राज्य शासनाने नियुक्त करावयाचे प्रत्येक कृषि विद्यापीठातील एक कार्यकारी परिषदेचा सदस्य | १२(२)क (४) | भारतीय कृषि अनुसंधान परिषद यांनी तयार केलेल्या मॉडेल ॲक्ट नुसार अशासकीय सदस्य प्रस्तावित नाहीत |
| ७ | १२(२)क (५) | सदस्य - मा. कुलपती यांनी नेमावयाचा एक सदस्य | १२(२)क (५) | सदस्य - मा. कुलपती यांनी नेमावयाचा एक सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | १२(२)क (६) | सदस्य - राज्य शासनाने नियुक्त करावयाचे दोन कृषि शास्त्रज्ञ | १२(२)क (६) | सदस्य - राज्य शासनाने नियुक्त करावयाचे दोन सदस्य (१) कृषि विद्यापीठाचे सेवानिवृत्त कुलगुरू, (२) कृषि किंवा संलग्न पदवी असलेला भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी. |
| ९ | १२(२)क (७) | सदस्य सचिव - राज्य शासनाने नियुक्त करावयाचे पुर्ण कालिक अधिकारी | १२(२)क (७) | सदस्य सचिव तथा महासंचालक - राज्य शासनाने नियुक्त करावयाचा भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी |

विद्यमान संरचनेमध्ये १९ सदस्य आहेत, नवीन सुधारणेनुसार १३ सदस्य प्रस्तावित केलेले आहेत.

## १.२ महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचा प्रस्तावित आकृतीबंध

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अेयुजी-१९८४/सीआर-१५-१९-अे, दि. १०.०९.१९८४ नुसार कृषि परिषदेसाठी एकूण ४१ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. तथापि, बिंदुनामावली, सेवाप्रवेश नियम इ. बाबींची पुर्तता न झाल्याने कृषि परिषदेत अद्यापपर्यंत पदभरती प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. त्यामुळे आजतागायत कृषि विभाग, कृषि विद्यापीठे, मंत्रालयीन विभाग इ. विभागांकडून प्रतिनियुक्ती किंवा सेवासंचित तत्वावर सदर पदांवर मनुष्यबळ उपलब्ध करून घेऊन महत्प्रयासाने कामकाज चालविण्यात येत आहे.

सन १९८३ मध्ये मकृवि अधिनियम लागू करण्यात आला त्यावेळी कृषि विद्यापीठांतर्गत केवळ १४ शासकीय महाविद्यालये आणि त्यांच्या अंतर्गत १६५२ विद्यार्थी प्रवेश क्षमता होती. शासनाने सन २००१-०२ पासून खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांना मंजूरी देण्याचे धोरण अवलंबिले आहे. तसेच, राज्याच्या प्रत्येक जिल्हयात किमान एक शासकीय कृषि किंवा संलग्न महाविद्यालय स्थापन करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. सद्यस्थितीत राज्यात एकूण २०५ महाविद्यालये कार्यरत असून त्याअंतर्गत विद्यार्थी प्रवेश क्षमता १८,१२६ पर्यंत वाढली आहे. त्याचबरोबर महाविद्यालयातील प्रवेशासाठी राज्य सामायिक परीक्षा पध्दती आणि सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्याची जबाबदारी सध्या कृषि परिषदेवर आहे. केंद्र सरकारने तयार केलेले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ची अमंलबजावणी तातडीने होणे अपेक्षित आहे. भविष्यात पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवीच्या नियतकालीक परिक्षांचा समन्वय व संनियत्रणाची जबाबदारी कृषि परिषदेवर सोपविण्याचे प्रस्तावित आहे. या सर्व बाबींमुळे कृषि परिषदेची कार्ये व जबाबदाऱ्यांमध्ये दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे. मात्र त्यासाठी शासनाने कोणताही अतिरिक्त अधिकारी व कर्मचारी वर्ग मंजूर केलेला नाही.

वरील सर्व कामकाजाचा एकत्रित विचार करून कृषि परिषदेच्या कार्याची व्याप्ती लक्षात घेता खालीलप्रमाणे सुधारित आकृतीबंध प्रस्तावित करण्यात येत आहे.

| मंजूर आकृतीबंध | | | | प्रस्तावित आकृतीबंध | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अक्र | पदनाम | संवर्ग | पद संख्या | अक्र | पदनाम | संवर्ग | पद संख्या |
| १. | सदस्य सचिव | भा.प्र.से. | १ | १. | महासंचालक तथा सदस्य सचिव | भा.प्र.से. | १ |
| २. | संचालक (शिक्षण) | प्राध्यापक | १ | २. | संचालक (शिक्षण) | कृषि विद्यापीठातील संचालक समकक्ष | १ |
| | | | | ३. | परिक्षा नियंत्रक | कृषि विद्यापीठातील सहयोगी प्राध्यापक समकक्ष | १ |
| | | | | ४. | सहायक संचालक (शिक्षण) | कृषि विद्यापीठातील सहायक प्राध्यापक समकक्ष | १ |
| ३. | संचालक (संशोधन) | प्राध्यापक | १ | ५. | संचालक (संशोधन व विस्तार शिक्षण) | कृषि विद्यापीठातील संचालक समकक्ष | १ |
| | | | | ६. | सहसंचालक (संशोधन व विस्तार शिक्षण) | कृषि विद्यापीठातील सहयोगी प्राध्यापक समकक्ष | १ |
| ४. | संचालक (विस्तार शिक्षण व साधन सामुग्री विकास) | संचालक (कृषि विभाग) | १ | ७. | संचालक (साधन सामुग्री विकास) | कृषि विद्यापीठातील प्राध्यापक समकक्ष / कृषि विभागातील संचालक समकक्ष | १ |
| | | | | ८. | सहसंचालक (सासावि) | अधिक्षक अभियंता (स्थापत्य अभियांत्रिकी) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रतिनियुक्तीने (कृषि विद्यापीठातील इमारती, रस्ते व इतर बांधकाम प्रकल्पांच्या तांत्रिक मान्यतेसाठी) | १ |
| ५. | सहसंचालक (प्रशासन) | अधिक्षक कृषि अधिकारी (कृषि विभाग) | १ | ९. | संचालक (प्रशासन) | अपर जिल्हाधिकारी संवर्ग /सहसंचालक, कृषि विभाग | १ |
| | | | | १०. | सहायक संचालक (सेवा प्रवेश मंडळ) | कृषि विद्यापीठातील सहायक प्राध्यापक संवर्ग | १ |
| ६. | सहसंचालक (वित्त) | सहसंचालक (वित्त) | १ | ११. | संचालक (वित्त) | संचालक लेखा व कोषागारे समकक्ष | १ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १२. | उपसंचालक (लेखापरिक्षण) | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा अधिकारी वर्ग -१ (सर्व कृषि विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीवर्गाच्या वेतन पडताळणीसाठी) | १ |
| एकूण | | | ०६ | | | | १२ |

कृषि परिषदेतील विविध विभागासाठी महत्वाची पदे उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहेत. कृषि परिषदेचा आकृतीबंध १९८५ साली मंजूर झालेला असून अद्याप पर्यंत भरतीप्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. कृषि विद्यापीठांकडून किंवा कृषि विभागाकडून प्रतिनियुक्तीने आणि उसनवारीने अधिकारी / कर्मचारी घेवून कृषि परिषदेचे कामकाज चालविण्यात येते. नियमित पदभरती न झाल्यामुळे कामात सातत्य राहत नाही. पर्यायाने त्याचा दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम झाल्याचे दिसून येते. मागील ४० वर्षामध्ये कृषि विद्यापीठे आणि कृषि परिषदेच्या कामकाजात झालेली वाढ आणि सोपविण्यात आलेल्या अतिरिक्त जबाबदाऱ्या विचारात घेवून वरीलप्रमाणे प्रस्तावित विभागांसाठी सहाय्यकारी अधिकारी आणि कर्मचारी यांची देखील अतिरिक्त पदे निर्माण करण्याची तीव्र निकड आहे. यासंदर्भात कृषि परिषदेने विभाग निहाय कर्मचारी वर्गाचा आढावा घेवून प्रस्ताव शासनास सादर करावा. तसेच पदभरतीसाठी आवश्यक असलेले सेवा प्रवेश नियम तयार करून त्यानुसार वेळीच कार्यवाही करण्यात यावी.

### १.३ महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळाची प्रस्तावित संरचना

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-चार, असाधारण क्रमांक ५२ (दुसरी सुधारणा- दि. २४.१२.२०१३), महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ मधील कलम ५८ (२) मधील तरतुदीनुसार कृषि परिषदे अंतर्गत महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळाचे सन २०१३ मध्ये गठन करण्यात आले. महाराष्ट्र राज्यातील चारही कृषि विद्यापीठांमधील प्राध्यापक व उच्च संवर्गातील सरळसेवा/ पदोन्नती पदभरती प्रक्रिया, कारकीर्द प्रगत योजना (कॅस) लागू करणे, प्राध्यापक व उच्च संवर्गातील अधिकाऱ्यांचे सेवाविषयक तक्रारींचे निवारण करणे इ. कामे महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळाकडून केली जातात.

राज्यातील चारही कृषि विद्यापीठांमधील प्राध्यापक व उच्च संवर्गातील एकूण मंजूर आणि रिक्त पदांची दि. ३१/१२/२०२३ अखेरची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| विद्यापीठाचे नाव | प्राध्यापक व उच्च संवर्गातील पदे | | | रिक्त पदांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | मंजूर | भरलेली | रिक्त | |
| मफुकृवि, राहुरी | १४३ | २७ | ११६ | ८१.१२ |
| डॉ.पंदेकृवि, अकोला | ७३ | २५ | ४८ | ६५.७५ |
| वनामकृवि,परभणी | ६९ | २५ | ४४ | ६३.७७ |
| डॉ. बासाकोकृवि,दापोली | ५५ | २२ | ३३ | ६०.०० |
| एकूण | ३४० | ९९ | २४१ | ७०.८८ |

सद्यस्थितीत, सेवा प्रवेश मंडळाच्या विद्यमान संरचनेमध्ये एकूण सात सदस्य आहेत. सेवा प्रवेश मंडळाचे कामकाज पार पाडण्यासाठी एकूण ७ सदस्यांपैकी ४ सदस्य (गणपुर्ती) असणे आवश्यक आहे. तथापि, सदस्यांची पदे रिक्त असल्याने सेवा प्रवेश मंडळाचे कामकाज पार पाडताना आवश्यक गणपूर्ती होत नाही. त्यामुळे पदभरती प्रक्रियेस विलंब होत असल्याने सद्यस्थितीत मंजूर पदांपैकी ७०.८८ टक्के पदे रिक्त आहेत.

वरील बाबींचा विचार करता, सेवा प्रवेश मंडळाचे कामकाज नियमितपणे पार पाडण्यासाठी सेवा प्रवेश मंडळाचे सदस्य सहजरित्या उपलब्ध व्हावेत यासाठी महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळाची संरचना खालीलप्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्तावित आहे.

| विद्यमान संरचना | सुधारित संरचना |
|---|---|
| (एक) राज्य परिषदेच्या अध्यक्षाने नेमावयाचा अध्यक्ष | ( एक) राज्य कृषि परिषदेच्या अध्यक्षांनी नेमावयाचा अध्यक्ष (कृषि क्षेत्राशी निगडीत उच्च विद्याविभूषित व अनुभवी तज्ञ) |
| (दोन) संबंधित विद्यापीठाचे कुलगुरू | (दोन) संबंधीत विद्यापीठाचे कुलगुरू |
| (तीन) राज्यातील विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेच्या अशासकीय सदस्यांमधून प्रति-कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा एक अशासकीय सदस्य. | (तीन) प्रस्तावित नाही. |
| (चार) कुलपतीने नामनिर्देशित करावयाचे दोन तज्ञ | (चार) कुलपतीने नामनिर्देशित करावयाचे एक तज्ञ |
| (पाच) राज्य शासनाने नेमावयाचे भारतीय कृषि संशोधन परिषदेचे दोन प्रतिनिधी, यापैकी एक सदस्य हा, ज्या विशिष्ट क्षेत्रासाठी सेवा भरती करावयाची असेल त्या क्षेत्रातील विशेषज्ञ असेल. | (पाच) (१) अध्यक्ष, कृषि परिषद यांनी नेमावयाचा भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचा एक विषय विशेषज्ञ.<br>२) अध्यक्ष, कृषि परिषद यांनी नामनिर्देशित करा वयाचा एक विषय विशेषज्ञ. |
| (सहा) सचिव- महासंचालक, कृषि परिषद, पुणे | (सहा) सदस्य सचिव- महासंचालक, कृषि परिषद, पुणे |

टिप : सेवा प्रवेश मंडळाच्या कार्यासाठी प्रस्तावित केलेल्या संरचनेमधील गणपूर्तीसाठी एकुण ६ सदस्यांपैकी ४ सदस्य (किमान एक विषयतज्ञ) उपस्थित असणे आवश्यक राहील.

### १.४ महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम, १९८३ मधील प्रस्तावित सुधारणा.

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी सुधारित मॉडेल ॲक्ट - २०२३ तयार करून सर्व राज्य व कृषि विद्यापीठांना मार्गदर्शक सूचना म्हणून पाठविला आहे. त्यासअनुसरून मकृवि अधिनियम १९८३ मध्ये कालसुसंगत बदल करणे आवश्यक आहे. या विषयावर उपसमितीमध्ये झालेले विचारमंथन विचारात घेवून सदर अधिनियमामध्ये पुढीलप्रमाणे कलमनिहाय सुधारणा प्रस्तावित करण्यात येत आहेत. (महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ हा मूळ कायदा इंग्रजी भाषेत असल्याने प्रस्तावित सुधारणा इंग्रजीमध्ये नमूद करण्यात येत आहेत.)

### Proposed Amendments in Maharashtra Agriculture Universities (Krishi Vidyapeeths) Act, 1983

| Existing Provisions | Proposed Amendments |
|---|---|
| **CHAPTER I**<br>**Definitions ( 23 definitions)**<br>**2.** In this Act, unless the context otherwise requires,— | **CHAPTER I**<br>**Definitions ( 48 definitions)**<br>**2.** In this Act, unl ess the context otherwise requires,—<br>(a) "academic Council" means the Academic Council of the University;<br>(b) "act" means the University Act; |

| | |
|---|---|
| *(a)* "agriculture" includes the basic and applied sciences (including technology) relating to soil and water management, crop husbandry (including control of plant, pests and diseases), horticulture, agricultural engineering, 1****** * forestry and also home science, co -operation and marketing relating to agriculture; | (c) "agriculture" includes the basic and applied sciences (including technology) relating to soil and water management, c rop husbandry (including control of plant pests and diseases), horticulture, ag ricultural engineering, 1****** * forestry and also home science, co-operation and marketing relating to agriculture;<br>(a) Agri-business Management;<br>(b) Agricultural Engineering and Technology;<br>(c) Agricultural Information Technology;<br>(d) Basic Sciences and Humanities allied to Agriculture;<br>(e) Biotechnology;<br>(f) Community/ Home Science;<br>(g) Crop Improvement including Production and Protection;<br>(h) Dairy Science and Technology;<br>(i) Emerging Technologies related to Agriculture;<br>(j) Food Technology;<br>(k) Sericulture<br>(l) Horticulture;<br>(m)Natural Resource Management;<br>(n) Renewable Energy Engineering;<br>(o) Social Sciences allied to Agriculture;<br>(p) Fisheries Sciences;<br>(q) Animal Sciences<br>(r) Post Harvest Management and Marketing<br>(s) Any other discipline allied to agriculture and any other subject related to agriculture;<br>(d) "Authority" means any authority of the University as specified in this Act;<br>(a) "Authority" means any authority of the University as specified in this Act;<br>(b) "Board" means Board of Management of the University;<br>(c) "Board of Studies" means academic affairs committee at department level;<br>(d) "Chancellor" means Chancellor of the University; |

| | |
|---|---|
| | (e) "College" means a college of the University;<br>(f) "Comptroller" means Comptroller of the University;<br>(g) "Controller of Examination" means Controller of Examination;<br>(h) "Dean" means H ead of the constituent college;<br>(i) "Director" means Director of Education, Director of Research, and Director of Extension Education;<br>(j) "Extension Education Council" means Extension Education Council of the University;<br>(k) "Grant in aid colleges" means which receives complete or partial financial aid from Government;<br>(l) "ICAR" means Indian Council of Agricultural Research;<br>(m) "Government" means Government of Maharashtra;<br>(n) "Governor" means the Governor of Maharashtra; |
| **CHAPTER II**<br>**UNIVERSITIES**<br>**Incorporation of Universities**<br>**3** (1)<br>*(b)* The Chancellor, the Pro-Chancellor, the Vice-Chancellor, the first members of the Executive Council and the Academic Council of each of the Universities specified in column (2) of the Schedule and all persons who are deemed to be or may hereafter become or be, elected, nominated, appointed or co-opted as such Executives, officers or members of the respective University, are hereby constituted and declared to be the success or body corporate, with the same name as specified in column (2) of the Schedule, and with perpetual succession and a common seal and shall by the same name use and be used. | **CHAPTER II**<br>**UNIVERSITIES**<br>**Incorporation of Universities**<br>**3** (1)<br>*(b)* The Chancellor, the Pro-Chancellor, the Vice-Chancellor, the first members of the Board of Management and the Academic Council of each of the Universities specified in column (2) of the Schedule and all persons who are deemed to be or may hereafter become or be, elected, nominated, appointed or co-opted as such Executives, officers or members of the respective University, are hereby constituted and declared to be the success or body corporate, with the same name as specified in column (2) of the Schedule, and with perpetual succession and a common seal and shall by the same name use and be used. |

| | |
|---|---|
| **Powers and functions of University**<br>**6**<br>*(iv)* to institute degrees, diplomas, certificates and other academic distinctions; | **Powers and functions of University**<br>**6.**<br>*(iv)* to institute degrees, diplomas, certificates, skill development programmes and other academic distinctions;<br><br>(xx) After the completion of the formal degrees or diplomas or certificate course, specialized courses with respect to Skill Development, Entrepreneurship Development and to create expert man power by setting up different units and incubation centres of need based technologies in agriculture and allied fields. |
| **Prohibitions for award of degree, etc., in Agriculture, Veterinary Science and Fisheries by non-agricultural University.**<br>**9.**<br>(a) Notwithstanding anything contained in any Act relating to the establishment of any non-agricultural University in the state, no such University shall be competent to award any degrees, diplomas, certificates or other academic distinctions in Agriculture, ~~Veterinary Science~~ and Fisheries.<br><br>[3][Provided that, nothing in this section or section 40 shall apply to the Yashwantrao Chavan Maharashtra Open University established under section 3 of the Yashwantrao Chavan Maharashtra Open University Act, 1980 or any institution of higher learning or studies recognised by that university under clause *(xxiii)* of subsection *(1)* of section 5 of that Act; and that University shall be competent to award any degrees, diplomas, certificates or other academic distinctions in agriculture, ~~Veterinary Science~~ and Fisheries.] | **Prohibitions for award of degree, etc., in Agriculture, Veterinary Science and Fisheries by non-agricultural University.**<br>**9.**<br>(a) Notwithstanding anything contained in any Act relating to the establishment of any non-agricultural University in the state, no such University shall be competent to award any degrees, diplomas, certificates or other academic distinctions in Agriculture, ~~Veterinary Science~~ Animal Science and Fishery Sciences.<br><br>[3][Provided that, nothing in this section or section 40 shall apply to the Yashwantrao Chavan Maharashtra Open University established under section 3 of the Yashwantrao Chavan Maharashtra Open University Act, 1980 or any institution of higher learning or studies recognised by that university under clause *(xxiii)* of subsection *(1)* of section 5 of that Act; and that University shall be competent to award any degrees, diplomas, certificates or other academic distinctions in agriculture, ~~Veterinary Science~~ and Fisheries. |
| **CHAPTER III**<br>**MAHARASHTRA COUNCIL OF AGRICULTURAL EDUCATION AND RESEARCH**<br><br>**Constitution of State Council and its powers and functions**<br><br>12. *(1)* For the purpose of effective co-ordination, in the activities of all Agricultural Universities in the State, | **CHAPTER III**<br>**MAHARASHTRA COUNCIL OF AGRICULTURAL EDUCATION AND RESEARCH**<br><br>**Constitution of State Council and its powers and functions**<br><br>12. *(1)* For the purpose of effective co-ordination, in the activities of all Agricultural Universities in the State, particularly in |

| | |
|---|---|
| particularly in relation to teaching, research, extension education and other matters of common interest and for having periodical evaluation of the functioning of Universities and supervision over the Universities and their academic and financial ~~activities~~ and programmes, the State Government shall constitute a Council to be called "the Maharashtra Council of Agricultural Education and Research". | relation to teaching, research, extension education and other matters of common interest and for having periodical evaluation of the functioning of Universities and supervision over the Universities in academic and financial matters. The State Government shall constitute a Council to be called "the Maharashtra Council of Agricultural Education and Research". |
| (2)*(a)* The Minister for Agriculture, Maharashtra State, shall be the Chairman of the State Council. | (2)*(a)* The Minister for Agriculture, Maharashtra State, shall be the Chairman of the State Council. |
| (b) The State Government may appoint a person who in its opinion has expertise in any aspect of agricultural development, to be the Vice-Chairman of the Council. [1][and the Vice-Chairman shall, subject to the provisions of this Act, hold office for a period of three years from the date of appointment. The Vice-Chairman shall hold office during the pleasure of the State Government may, if it appears to it to be necessary and expedient so to do in the public interest, by order remove him from office at any time: | (b) The State Government may appoint a person who in its opinion has expertise in any aspect of agricultural development, to be the Vice-Chairman of the Council. [1][and the Vice-Chairman shall, subject to the provisions of this Act, hold office for a period of three years from the date of appointment. The Vice-Chairman shall hold office during the pleasure of the State Government may, if it appears to it to be necessary and expedient so to do in the public interest, by order remove him from office at any time: |
| Provided that, the Vice-Chairman of the Council holding the office on the date of commencement of the Maharashtra Agricultural Universities (*Krishi Vidyapeeth*) (Second Amendment) Act, 2013 shall vacant such office with immediate effect.] | Provided that, the Vice-Chairman of the Council holding the office on the date of commencement of the Maharashtra Agricultural Universities (*Krishi Vidyapeeth*) (Second Amendment) Act, 2013 shall vacant such office with immediate effect.] |
| (c) the Council shall consist of the following other members, namely: | *(c)* the Council shall consist of the following other members, namely: |
| *(i)* the Vice-Chancellors of the Agricultural Universities in the State as *ex-officio* members; | *(i)* the Vice-Chancellors of the Agricultural Universities in the State as *ex-officio* members; |
| *(ii)* the ~~Chief Secretary to Government and the~~ Agriculture, ~~Finance and Planning Secretaries~~ to Government as *ex-officio* member; | *(ii)* the Additional Chief Secretary/ Principal Secretary / Secretary Agriculture and the Commissioner of Agriculture in the state as *ex-officio* member; |
| *(iii)* one representative of the Indian Council of Agricultural Research to be appointed by the State Government ; | *(iii)* one representative of the Indian Council of Agricultural Research to be appointed by the State Government ; |

| | |
|---|---|
| *(iv)* four non-official members of the Executive Councils concerned to be appointed by the State Government, one from each Agricultural University area ; | *(iv)* Not Proposed as per ICAR model Act |
| *(v)* one member to be appointed by the Chancellor<br>*(vi)* two agricultural scientists to be appointed by the State Government; | *(v)* one member to be appointed by the Chancellor<br>*(vi)* two agricultural scientists to be appointed by the State Government;<br>1. one retired Vice-Chancellor from Agriculture university<br>2. one retired IAS officer having degree in Agriculture or allied Sciences |
| *(vii)* the member-secretary, a whole-time officer, to be appointed by the State Government. | *vii)* the Director General and member-secretary, a whole-time officer, to be appointed by the State Government. |
| *(3)* Without prejudice to the generality of the provisions of sub-section (1), the Council shall have the following powers and functions, namely :- | *(3)* Without prejudice to the generality of the provisions of sub-section (1), the State Council shall have the following functions, namely:- |
| *(a)* to approve the annual plans of the Universities and the schemes forming part of such plans ; | *(a)* to approve the annual plans of the Universities and the schemes forming part of such plans ; |
| (b) subject to the provisions of section 54, to approve the annual financial estimates of the Universities ; | (b) subject to the provisions of section 54, to approve the annual financial estimates of the Universities ; |
| (c) to grant approval to any proposals by the Universities for reappropriation of budget grants ; | (c) to grant approval to any proposals by the Universities for reappropriation of budget grants ; |
| (d) to grant permission to the Universities for starting any new faculties, courses or disciplines or departments, as well as introduction of additional elective subjects for any curriculum ; | (d) to grant permission to the Universities for starting any new colleges, faculties, courses or disciplines or departments, polytechnics as well as introduction of additional elective subjects for any curriculum ; |
| (e) to grant administrative approval to any building proposed to be constructed by any University, the cost of which is estimated to be ~~three~~ lakhs rupees or more ; | (e) to grant administrative approval for any buildings proposed to be constructed by any University, the cost of which is estimated to be 100 lakhs rupees or more |
| | कृषि महाविद्यालय, पुणे | १. कृषि पदवी व पदव्युत्तर<br>२. उद्यानविद्या पदवी व पदव्युत्तर<br>३. एम.बी.ए.(कृषि व्यवसाय व्यवस्थापन) पदव्युत्तर पदवी | १. कृषि आचार्य पदवी<br>२. उद्यानविद्या आचार्य पदवी<br>३. कृषि व्यवसाय व्यवस्थापन पदवी<br>४. कृषि जैवतंत्रज्ञान पदव्युत्तर पदवी |
| | कृषि महाविद्यालय, नंदुरबार | कृषि पदवी | कृषि पदव्युत्तर पदवी |
| डॉ. पंदेकृवि, अकोला | कृषि महाविद्यालय, नागपूर | १.कृषि पदवी<br>२. पदव्युत्तर एम.बी.ए. कृषि व्यवसाय व्यवस्थापन | १. कृषि आचार्य पदवी<br>२. कृषि व्यवसाय व्यवस्थापन पदवी |
| | कृषि महाविद्यालय, गडचिरोली | कृषि पदवी | कृषि पदव्युत्तर पदवी |
| वनामकृवि, परभणी | कृषि व्यवसाय व्यवस्थापन संस्था, चाकुर, जि. लातूर | एम.बी.ए. कृषि व्यवसाय व्यवस्थापन | कृषि व्यवसाय व्यवस्थापन पदवी |
| | कृषि महाविद्यालय, लातूर | कृषि पदवी व पदव्युत्तर | कृषि आचार्य पदवी |
| | कृषि महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड | कृषि पदवी | कृषि पदव्युत्तर पदवी |
| डॉ. बासाकोकृवि, दापोली | उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे, जि. सिंधुदुर्ग | उद्यानविद्या पदवी | उद्यानविद्या पदव्युत्तर पदवी |
| | काढणी पश्चात तंत्रज्ञान महाविद्यालय, रोहा, जि. रायगड | काढणी पश्चात तंत्रज्ञान पदव्युत्तर पदवी | अन्नतंत्रज्ञान पदवी |

**टीप -** भाकृअप, नवी दिल्ली यांचेकडून अधिस्विकृती प्राप्त पदव्युत्तर पदवी महाविद्यालयात आचार्य पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात यावा.

२. राज्य शासनाच्या धोरणानुसार जिल्हास्तरावर किमान एक शासकीय कृषि महाविद्यालय असणे आवश्यक आहे. सध्या मफुकृवि, राहुरी अंतर्गत सांगली व सोलापुर, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत वाशिम, यवतमाळ, वर्धा, भंडारा व गोंदिया, आणि डॉ. बासाकोकृवि, दापोली अंतर्गत रायगड, पालघर, सिंधुदुर्ग व ठाणे या जिल्हयात एकही शासकीय कृषि महाविद्यालय कार्यरत नसल्याने या जिल्ह्यात शासनाने किमान एक कृषि महाविद्यालय स्थापन करण्यास प्राधान्य द्यावे.

### २.१.२ बहुविद्याशाखीय (Multidisciplinary) कृषि शिक्षण

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० च्या अनुषंगाने प्रत्येक विद्यापीठाकडून स्वत:च्या संरचनेत आवश्यकतेनुसार बदल करुन आंतरशाखीय अभ्यासक्रमास प्राधान्य देवून त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात यावी. सध्या राज्यातील कृषि विद्यापीठांमध्ये प्रामुख्याने कृषि, उद्यानविद्या, कृषि अभियांत्रिकी, अन्नतंत्रज्ञान, कृषि जैवतंत्रज्ञान, कृषी व्यवसाय व्यवस्थापन, मत्स्यविज्ञान, सामुदायिक विज्ञान, वनशास्त्र व काढणी पश्चात तंत्रज्ञान अशी विविध शासकीय किंवा खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये आहेत. तथापि, काही विद्यापीठात काही विषयांची फक्त खाजगी महाविद्यालये असून त्याविषयांची विद्याशाखा किंवा शासकीय महाविद्यालये विद्यापीठात उपलब्ध नाहीत. ज्या ज्या विद्याशाखेची खाजगी महाविद्यालये विद्यापीठ कार्यक्षेत्रात आहेत त्या शाखेचे किमान एक तरी शासकीय महाविद्यालय विद्यापीठात असणे आवश्यक आहे.

### २.१.३ रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेती व्यवसायातुन ५० टक्के पेक्षा जास्त लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण झालेल्या आहेत. औद्योगिकदृष्टया प्रगत महाराष्ट्र राज्यात देखील जवळपास निम्मी लोकसंख्या उपजीविकेसाठी शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. मात्र राज्याच्या अर्थव्यवस्थेत कृषि आणि संलग्न क्षेत्रांचा वाटा केवळ ११.९ टक्के आहे. वाढती लोकसंख्या, झपाट्याने होणारे शहरीकरण, ऱ्हास होणारी नैसर्गिक संसाधने, बेरोजगारी आणि हवामान बदल या समस्यांमुळे कृषि आणि संबंधीत क्षेत्रांवर सतत ताण येत आहे. सध्याच्या अन्न उत्पादन प्रणालींना शाश्वत अन्न प्रणालींमध्ये रुपांतरित करण्यासाठी तसेच कृषि क्षेत्रातील समस्यांना सामोरे जाण्यासाठी आणि भविष्यकालीन परिस्थितीत अधिक रोजगारक्षमता निर्माण करण्यासाठी कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे आवश्यक आहे.

सद्य परिस्थितीमध्ये कृषि विद्यापीठांमधून शिक्षण घेणाऱ्या फार कमी पदवीधारकांना (२० टक्के) शासकीय व खाजगी क्षेत्रात प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होत आहे. उर्वरित पदवीधारकांमध्ये कृषि विद्यापीठांनी कृषि शिक्षणाच्या माध्यमातून किमान कौशल्य गुण विकसित करुन त्यांना उद्यमशील बनविणे व स्वयं रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी उपयुक्त विषयावर प्रमाणपत्र /पदविका अभ्यासक्रम सुरु करावेत. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या सहाव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशीनुसार कृषि व संलग्न पदवी अभ्यासक्रमातील पहिल्या व दुसऱ्या वर्षासाठी या विषयांचा समावेश करावा. कृषि विद्यापीठातील विविध महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी रोजगार निर्मिती केंद्र स्थापन करावे व त्यासाठी आवश्यक असलेल्या सोयी सुविधा, मनुष्यबळ व अर्थसहाय्य मिळविण्यासाठी राज्य शासन / केंद्र शासन यांच्याकडे प्रस्ताव सादर करावेत.

प्रत्येक विद्यापीठाने शासकीय / खाजगी कंपन्याच्या मदतीने Incubation Centre स्थापन करण्यासाठी प्रयत्न करावेत. त्याद्वारे विद्यार्थ्यांसाठी संबंधीत विषयामध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवावा.

| विद्याशाखा | प्रस्तावित कौशल्य आधारित प्रमाणपत्र / पदविका / पदवी / पदव्युत्तर पदविका / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्र' |
|---|---|
| Agriculture (कृषि) | Sericulture, Natural / Organic Farming, Dairy Technology / Dairy Farming / Livestock Management, Environmental Science, Agro. Meteorology, Rainfed Agriculture, Agriculutre Insu rance, Secondary Agriculture; Modern Irrigation Method; Climate Change; Risk Management, Agro Chemicals, Organic Certification, Seed Production, Mushroom Cultivation. |
| Agril. Engineering (कृषि अभियांत्रिकी) | Use of Robotics and Drone Technology in Agriculture; Use of remote sensing in agriculture; Artificial Intellegence, Machine Learing, Use of IoT in Agriculture, Energy and Environment Engineering; Block chain Technology, New and Renewable Sources, Bio Degradble Gas, Compressed Natural Gas, Green Energy, Construction and Maintanance of Protected Cultivation, Bamboo Engineering |

| | |
|---|---|
| Food Technology **(अन्नतंत्रज्ञान)** | Sugar Technology; Alcohol Technology; Wine Technology; Food Safety and Quality Assurance; Food Nutrition and Dietetics; Nutraceuticals |
| Agriculture Business Management **(कृषि व्यवसाय व्यवस्थापन)** | International Trade, Import - Export, e-Marketing & Logistic Management, Seed Industry, Pestiside Industry, Bio Fertilizer Industry; Sugar and allied Industries, Co-operation and Banking; Microfinance, Agriculture Input Management, |
| Horticulture **(उद्यानविद्या)** | Landscaping and Gardening, Post Harvest Technology of Fruits and Vegetables, Nursery Management, Processing of fruits and vegetables, Medicinal and Aromatic Plants |
| Community Science **(सामुदायिक विज्ञान)** | Textile Technology |
| Fisheries Science **(मत्स्य विज्ञान)** | Fish farming; Fisheries Science, Fish Processing, Fish Engineering, Aquaculture |
| Biotechnology **(जैव तंत्रज्ञान)** | DNA Fingerprinting, Tissue culture Technics, Molecular Diagnostics , Bioinformatics |
| Forestry **(वन विद्या)** | Forest Products and Utilization, Bio -Diversity, Forest Nursery, Forest Tourism, Bamboo Engineering |
| Post Harvest Management **(काढणी पश्चात तंत्रज्ञान)** | Fruits and Vegetables Processing, Fish and Meat Processing, Milk and Milk Processing, Grading and Packaging of Agriculture Commodities, Medicinal and Aromatic Plants Processing |

### २.१.४ कृषि अभ्यासक्रमांची पुनर्रचना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार कृषि विद्यापीठांतील सर्व शैक्षणिक अभ्यासक्रमांची पुनर्रचना करुन अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. यासाठी भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी डॉ. तेजप्रताप सिंह यांच्या अध्यक्षतेखाली सहावी अधिष्ठाता समिती गठीत केली आहे. या समितीने कृषि व संलग्न विषयातील अभ्यासक्रमांची पुनर्रचना केली असुन याबाबतचा अहवाल भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांना सादर केला आहे. यासंदर्भात भारतीय कृषि अनुसंधान परिषदेकडून प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार राज्यातील कृषि विद्यापीठांच्या शिक्षण संचालक समन्वय समितीने कृषि व संलग्न विषयाच्या अभ्यासक्रमांची पुनर्रचना करावी.

### २.१.५ आचार्य पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा अध्यापनात सहभाग

कृषि व संलग्न विषयातील आचार्य पदवी अभ्यासक्रमात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे अध्यापन कौशल्य विकसित करण्यासाठी एकूण श्रेयांकातील (Credits) किमान पाच श्रेयांक अध्यापन कार्यासाठी अनिवार्य करण्यात यावेत. त्यामुळे कृषि व संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापकांना अध्यापनात सहाय्य तसेच विद्यार्थ्यांना अध्यापनाचा अनुभव मिळेल.

### २.१.६. श्रेयांक (क्रेडिटस) आणि दुहेरी पदवी

शिक्षण हे विद्यार्थी- केंद्रित, अनुभवात्मक, शोध-आधारित, एकात्मिक, लवचिक आणि आनंददायक बनवण्यासाठी कृषि शिक्षणशास्त्र विकसित करणे आवश्यक आहे. यासाठी विविध विद्याशाखा आणि विषय यांचे सर्जनशील संयोजन करुन बहुविध प्रवेश आणि निर्गमन पध्दती (Multiple entry and Multiple exit) सुविधा उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. तसेच, शिक्षणाच्या बाबतीत प्रचलित असणाऱ्या कठोर सीमा दूर करुन आंतरशाखीय विषयांच्या समावेशाने विद्यार्थ्यांना आयुष्यभर शिक्षणाच्या संधी निर्माण करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

## अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडीट्स (Academic Bank of Credits)

अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडीट्स (ABC) प्लॅटफॉर्म हा एक क्रेडीट डेटाबेस आहे. जो नॅशनल अकॅडेमिक डिपॉझीटरीच्या (NAD) धर्तीवर तयार केला जातो. अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटस ही सुविधा अभ्यासक्रमाच्या रचनेतील लवचिकता आणि योग्य श्रेयांक (क्रेडिट) हस्तांतरण यंत्रणेसह संपूर्ण देशातील उच्च शैक्षणिक संस्थामधील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय /आंतरराष्ट्रीय स्तरावरील आंतरविद्याशाखीय / बहुशाखीय शैक्षणिक गतिशीलता प्रदान करु शकेल. यामध्ये विद्यार्थ्यांना पदवी / पदविका / प्रमाणपत्रासाठी त्यांचा स्वत:चा शिक्षणाचा मार्ग निवडण्याची सोय करण्यासाठी तसेच बहुविध प्रवेश आणि निर्गमन व्यवस्थेमुळे कधीही, कुठेही आणि कोणत्याही स्तरावरील शिक्षणाच्या तत्वावर कार्य करण्याची ही एक यंत्रणा असेल. अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडीट विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाची विस्तृत निवड, अभ्यासक्रमातील लवचिकता, नाविन्यता आणि अनेक उच्च शिक्षण शाखा / संस्थामध्ये आकर्षक अभ्यासक्रमाचे पर्याय उपलब्ध करुन महत्वपूर्ण स्वायतत्ता प्रदान करेल.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या विविध विषयांमध्ये मिळविलेले क्रेडीट स्कोअर अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट या ऑनलाईन प्लॅटफॉर्ममध्ये जमा करण्यात येणार आहेत. ज्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांचे डिजिटल खाते, ABC-ID व डॅशबोर्ड असेल आणि विद्यार्थी त्यांचे क्रेडीट जमा, हस्तांतरण आणि क्रेडीट इतिहासाचा मागोवा घेऊ शकतील.

राज्यातील कृषि विद्यापीठांनी नॅशनल अकॅडेमिक डिपॉझीटरी पोर्टलअंतर्गत Digilocker प्लॅटफॉर्मवर विद्यार्थ्यांची नोंदणी केलेली आहे. यासाठी विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर नोडल अधिकाऱ्यांची नेमणुक केलेली आहे. कृषि विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय तसेच खाजगी महाविद्यालयांना विद्यार्थ्यांचे ABC-ID काढण्याकरीता मार्गदर्शन व प्रोत्साहीत करण्यात येत आहे. तसेच विद्यापीठांच्या वेबसाईटवर या विषयाची माहिती सांगणारे व्हिडीओ उपलब्ध करुन देण्यात आलेले असुन विद्यार्थ्यांना ABC-ID नोंदणी करण्याकरीता विद्यापीठांच्या वेबसाईटवर लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

या सर्वांचा परिणाम म्हणुन आज रोजी २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षातील राज्यातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये प्रवेशीत ५४७११ विद्यार्थ्यांपैकी ३१२९३ विद्यार्थ्यांनी पोर्टलवर नोंदणी केलेली असुन ती एकूण प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या ५७.१९ टक्के आहे. विद्यार्थ्यांचे सत्रनिहाय ग्रेडकार्ड Digilocker व्दारा अपलोड करण्याकरीता आवश्यक असणाऱ्या सत्रनिहाय ग्रेडकार्डचा मसुदा अंतिम टप्प्यात असून लवकरच विद्यार्थ्यांचे सत्रनिहाय ग्रेडकार्ड Digilocker व्दारा अपलोड करण्याचे काम सुरु होईल. तसेच विद्यार्थ्यांना त्यांचे सत्रनिहाय ग्रेडकार्ड www.abc.gov.in या पोर्टलवर त्यांच्या ABC-ID लॉग-इन होवून पाहता येतील व त्याचा उपयोग पदवी प्रदान करण्याच्या पर्यायासह बहुविध प्रवेश आणि निर्गमनाच्या नाविन्यपूर्ण प्रणालीचा लाभ घेण्यात येत आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची विद्यापीठनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

कृषि व संलग्न महाविद्यालयात Academic Bank of Credits मध्ये नोंदणीकृत विद्यार्थी संख्या (पदवी, पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी) सन-२०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४

| विद्यापीठ | अभ्यासक्रमाचे नाव / पदवी | सन २०२१-२२ | | सन २०२२-२३ | | सन २०२३-२४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विद्यार्थी संख्या | ABC मध्ये नोंदणी कृत विद्यार्थी संख्या | विद्यार्थी संख्या | ABC मध्ये नोंदणीकृत विद्यार्थी संख्या | विद्यार्थी संख्या | ABC मध्ये नोंदणीकृत विद्यार्थी संख्या |
| मफुकृवि, राहुरी | पदवी | ४८६९ | ४२६९ | ५२१९ | ४६२८ | ५१६४ | ३५३१ |
| | पदव्युत्तर | २७५ | २०० | ३१९ | २४१ | ३३५ | १८३ |
| | आचार्य | ७४ | ६६ | ७२ | ६५ | ०० | ०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| डॉ.पंदेकृवि, अकोला | पदवी | ३२५९ | ३१६ | ४१०३ | ४६० | ३१२६ | ३०१६ |
| | पदव्युत्तर | ०० | ०० | ८७१ | ०६ | ८९२ | ८९२ |
| | आचार्य | ०० | ०० | ०० | ०० | ३५२ | ०० |
| वनामकृवि परभणी | पदवी | ३१७८ | ३०३५ | ३४२३ | ३२१९ | ३५०८ | ३२४४ |
| | पदव्युत्तर | ३४९ | ३३५ | २०१ | २०० | २२२ | २०८ |
| | आचार्य | ४२ | ४० | ४४ | ४३ | ०० | ०० |
| डॉ. बासाको कृवि, दापोली | पदवी | १३४७ | ८९९ | १३१४ | ९१० | १५४९ | ११४७ |
| | पदव्युत्तर | ८१ | ४५ | १३१ | ५४ | २६२ | ३१ |
| | आचार्य | २४ | ०६ | ३१ | ०४ | ७५ | ०० |
| | एकुण | १३४९८ | ९२१११ | ५७२८९ | ८३०२५ | २५४८५ | ४८५१२ |

**बहुविध प्रवेश व निर्गमन** (MEME - Multiple Entry and Multiple Exit)

देशभरातील विद्यार्थ्यांसाठी उघडलेल्या शैक्षणिक क्रेडीट बँक खात्यामध्ये अॅकेडमीक बँक ऑफ क्रेडीट योजनेद्वारे श्रेयांक (क्रेडिट) जमा करणे सुलभ होणार आहे. उच्च शैक्षणिक संस्थामधील (HEIs) कोणत्याही अभ्यासक्रमांतर्गत त्यांनी मिळवलेले श्रेयांक (क्रेडिटस) हस्तांतरित आणि एकत्रित करण्यासाठी, प्रमाणपत्र, पदविका किंवा पदवी कालावधीतील विद्यार्थ्यांने प्राप्त केलेले सर्व श्रेयांक (क्रेडिटस) संबंधित खात्यात नोंद केले जातील. कृषि विद्यापीठांतील पदवी आणि पदव्युत्तर पदवी स्तरावर विद्यार्थ्यांसाठी बहुविध प्रवेश आणि निर्गमनाचे पर्याय उपलब्ध करून देण्यात यावेत.

**२.१.७. मुक्त आणि दूरस्थ शिक्षण** (Online and Distant Learning)

उच्च शिक्षणाच्या मागणीत होणारी वाढ आणि नियमित प्रवाहातील जागांची मर्यादित उपलब्धता यामुळे काही उच्च शिक्षण संस्थांनी (HEIs) विद्यार्थ्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी मुक्त आणि दूरस्थ शिक्षण (Online and Distant Learning) माध्यमाद्वारे अनेक अभ्यासक्रम सुरु केले आहेत. शैक्षणिक धोरणाची तीन मुख्य तत्वे प्रवेश, समानता आणि गुणवत्ता साध्य करण्यासाठी Study Webs of Active – Learning for Young Aspiring Minds (SWAYAM : www.swayam.gov.in) हे राष्ट्रीय मॅसिव्ह ओपन ऑनलाइन कोर्स (MOOC) व्यासपीठ निर्माण केलेले आहे.

राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्पाव्दारे (NAHEP) कृषि विद्यापीठांनी निर्माण केलेल्या विविध ICT सुविधा यापुढील काळात शाश्वत आणि अद्यावत ठेवण्याकरीता तसेच डिजिटल ई-कंटेंट विकसित करण्याकरिता (e-content development) एक समर्पित ICT केंद्र (Dedicated ICT Cell) स्थापन करण्याची आवश्यकता आहे. तसेच, शैक्षणिक व्हिडीओ निर्मितीकरीता प्रत्येक कृषि विद्यापीठात दोन स्वतंत्र अद्ययावत प्रसार माध्यम स्टुडिओ (Media Studio / Virtual classroom) सुविधा निर्माण करावी. त्यासाठी शासनाने विद्यापीठास आवश्यक निधी उपलब्ध करुन द्यावा.

## २.१.८ विविध शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने राबविण्याचे अभ्यासक्रम

### २.१.८.१ दुहेरी पदवी कार्यक्रम

शैक्षणिक आणि व्यक्तीमत्व विकास या दोन्ही क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षकांना तसेच पालकांना संवेदनशील करुन, विद्यार्थ्यांच्या क्षमता ओळखून त्या वृध्दींगत करण्याकरिता दुहेरी पदवी कार्यक्रमाची तरतूद करण्यात आलेली आहे. दुहेरी पदवी अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थी दोन पदव्या एकाच विद्यापीठातून किंवा वेगवेगळया राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांमधून एकाच वेळी प्राप्त करु शकेल आणि त्यांच्या अभ्यासाचा एकूण कालावधी कमी करुन वेळ वाचवू शकतात.

अ) विद्यार्थ्यांनी दोनही संस्थेतील प्रवेशाचे निकष व अटी पूर्ण करणे आवश्यक आहे तसेच त्यांनी वेगवेगळ्या सत्रात प्रवेश घेणे आवश्यक आहे.

ब) दुहेरी पदवी अभ्यासक्रमात दोन्ही संस्थांनी एकत्र ठरविलेला अभ्यासक्रम असावा.

क) पुर्ण केलेल्या श्रेयांकानुसार प्रत्येक संस्था वेगवेगळे पदवी प्रमाणपत्र प्रदान करु शकते.

ड) विद्यार्थ्यांनी या दोन्ही संस्थात किमान एक सत्र पूर्ण करणे आवश्यक आहे.

उपरोक्त मार्गदर्शक सूचना विचारात घेवून सर्व विद्यापीठांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्था / विद्यापीठे यांचेशी खालीलप्रमाणे सामंजस्य करार केले आहेत.

| मफुकृवि, राहुरी | |
|---|---|
| **आंतरराष्ट्रीय** | **राष्ट्रीय** |
| 1. Van Hall Larenstein University, Netherland | 1. ICAR Institutes |
| 2. Asian Institute of Technology, Bangkok | 2. NCDC, New Delhi |
| 3. Murdoch University, Australia | 3. India Private Ltd., Mumbai |
| 4. ECOCERT, France | 4. Mukul Madhav Foundation, Pune |
| | 5. Bayer Crop Science Ltd., Pune |
| | 6. Dr. Babasaheb Ambedkar Technology University, BATU Lonere (Maharashtra) |
| **डॉ.पंदेकृवि, अकोला** | |
| 1. Wolkite University, Ethiopia | 1. ICAR Institutes |
| 2. Ethopia university of Debrecen, Hungary | 2. Dhanuka Agri. Tech Ltd.,Pune |
| 3. University of Copenhagen, Denmark, | 3. Mahindra & Mahindra Company |
| 4. Ecocert France | |
| 5. Institute of Organic Farming, Switzerland | |
| **वनामकृवि, परभणी** | |
| 1. Western Sydeny University, Australia | 1. ICAR Institutes |
| 2. UPA, Spain | 2. Mahyco, Jalna |
| 3. AIT, Bangkok | 3. ICRISAT, Hyadrabad |
| | 4. Bejo sheetal seeds, Jalna |
| **डॉ. बासाकोकृवि, दापोली** | |
| 1. Western Sydeny University, Australia | 1. IIT, Mumbai |
| 2. Putra University,Malaysia | 2. MAFSU, Nagpur |
| 3. Michigan state University, USA | 3. RGSTC, New Delhi |
| 4. Chalalonkorn University, Thiland | 4. Nichem solution Pvt.Ltd. Mumbai |
| 5. HUE University, Vietnam | 5. ICAR Institutes |

### २.१.८.२ सामाईक पदवी अभ्यासक्रम

अ) सामाईक पदवी अभ्यासक्रमासाठी दोन संस्थांनी एकत्र येऊन सदर अभ्यासक्रम तयार करावा. अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर दोन्ही संस्था मिळून एकच प्रमाणपत्र देण्यात येईल.

ब) आचार्य पदवी अभ्यासक्रमात प्रबंध सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांने किमान एक सत्र दोन्ही विद्यापीठात पूर्ण करणे तसेच संशोधनासाठी दोन्ही संस्थाचे एक-एक तज्ञ संशोधन सल्लागार असणे आवश्यक आहे.

सध्या राज्यातील कृषि विद्यापीठांनी भाकृअप, नवी दिल्ली अधिनस्त विविध केंद्रीय संशोधन संस्थांसोबत सामंजस्य करार करून पदव्युत्तर व आचार्य पदवीसाठी आवश्यक संशोधन प्रकल्प संबंधित संस्थांमध्ये पूर्ण करून विद्यापीठाकडून पदवी दिली जात आहे.

### २.१.८.३. एकसारखे अभ्यासक्रम (Twining Degree Programme)

अ) हा अभ्यासक्रम दोनही देशात एक सारखा (Twining) असतो व भारतीय विद्यापीठाचीच पदवी प्राप्त होण्यासाठी विद्यार्थी त्यांचा काही काळ भारतात व काही काळ परदेशातील विद्यापीठात खर्च करतो.

ब) या अभ्यासक्रमात विद्यार्थी परदेशातील अभ्यासक्रमाचे जास्तीत जास्त ३० श्रेयांक घेऊ शकतात.

क) सदर श्रेयांक हे पारंपारिक पध्दतीने शिकविलेले असावेत ते दुरशिक्षण पध्दतीने नसावेत.

ड) हा अभ्यासक्रम विद्यार्थ्याने पूर्ण न केल्यास त्याच्या मुळ पदवीला कोणतीही बाधा येत नाही.

सध्या मफुकृवि, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, बारामती यांनी Van Hall Larenstein University, Netherland या परदेशी विद्यापीठासोबत सामंजस्य करार करून कृषि पदवी अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे.

उपरोक्त मार्गदर्शक सूचना विचारात घेवून सर्व विद्यापीठांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्था / विद्यापीठे यांचेशी सामंजस्य करार केले आहेत.

### २.१.९ कृषि शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण

वैदिक काळापासुन भारत हा जागतिक स्तरावर उच्च शिक्षणाचे महत्वपुर्ण केंद्र म्हणुन ओळखला जातो. प्राचीन काळातील तक्षशिला व नालंदा या भारतीय विद्यापीठांचा जागतिक स्तरावर नावलौकिक होता आणि जगभरातील अनेक विद्वान उच्च शिक्षण घेण्यासाठी या विद्यापीठांमध्ये येत असत. भारतीय उच्च शिक्षणाच्या विकासासाठी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात विविध उच्च शिक्षण आयोगांची स्थापना करण्यात आली आहे ज्यामध्ये, भारतीय विद्यापीठ आयोग (१९०२), सालदार कमिशन (१९१७), राधा कृष्ण समिती (१९४८), कोठारी आयोग (१९६४), राष्ट्रीय शैक्षणिक आयोग (१९८६), ज्ञान आयोग (२०००) आणि सद्य:स्थितीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) या विविध समिती व आयोगांमार्फत भारतीय उच्च शिक्षणाच्या विकासासाठी वेळोवेळी उपयुक्त मार्गदर्शक सुचना निर्गमित झालेल्या आहेत. भारतात परदेशातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आकर्षित करण्याची क्षमता असून भारताला पुन्हा एकदा विश्वगुरु होण्याची संधी आहे.

विद्यार्थ्यांना व्यावसायिक संधी उपलब्ध होण्यासाठी खाजगी संस्थांकडून अधिकाधिक निधी, उच्च शिक्षित प्राध्यापक, आंतरराष्ट्रीय दर्जाची शैक्षणिक सुविधा, उत्तम प्रकारचे आंतरशाखीय अभ्यासक्रम तयार केल्यास भारतीय विद्यार्थी जागतिक दर्जा प्राप्त करू शकतील.

भारतीय शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण विकसित करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

### २.१.९.१ समकक्ष शैक्षणिक व्यवस्थेअंतर्गत श्रेयांकास अधिकृत मान्यता

१) समकक्ष शैक्षणिक व्यवस्थेअंतर्गत श्रेयांक मान्यता व हस्तांतरणासाठी भारतीय व विदेशी विद्यापीठांनी परस्परांमध्ये करारनामा अथवा सामंजस्य करार करावा. तसेच आवश्यकता असल्यास पुरवणी अभ्यासक्रम किंवा संयुक्त अभ्यासक्रम विकसित करावा.

२) समकक्ष शैक्षणिक व्यवस्थेअंतर्गत कृषि विद्यापीठात अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांने त्याच्या अभ्यासक्रमाचा काही भाग भारतीय उच्च शिक्षण संस्थेशी भागीदारी असणाऱ्या परदेशातील उच्च शिक्षण संस्थेमध्ये पूर्ण केल्यास अशा विद्यार्थ्यांनी बाहेरच्या देशातील प्राप्त केलेले श्रेयांक कृषि विद्यापीठाने ग्राह्य धरण्यासाठी त्यास मान्यता द्यावी. अशा परिस्थितीमध्ये प्रदान केलेली पदवी ही पूर्णत: कृषि विद्यापीठाने दिलेली असावी. श्रेयांक मान्यता व श्रेयांक हस्तांतरण प्रक्रियेमध्ये परदेशी विद्यापीठाने निश्चित केलेले श्रेयांक कृषि विद्यापीठाने समतुल्य ठरवावेत.

३) कृषि विद्यापीठांनी राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय शिक्षण संस्था, माजी विद्यार्थी संघटना व औद्योगिक क्षेत्रांशी समन्वय साधून अभ्यासक्रम तयार करावा.

४) विदेशात राज्यातील विद्यापीठांची चांगली प्रतिमा निर्माण करून तेथील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता भारतात आकर्षित करण्यासाठी समाज माध्यमांचा व माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करुन विशिष्ट प्रकारची मोहिम राबविणे आवश्यक आहे. यासाठी राज्य शासनाने धोरण निश्चित करावे.

५) भारतीय कृषि विद्यापीठांची शैक्षणिक क्षमता दाखविण्याकरीता परदेशी वंशाचे माजी विद्यार्थी किंवा परदेशात राहणारे भारतीय माजी विद्यार्थी यांना राजदूत म्हणुन नियुक्त करावे.

६) कृषि विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतलेल्या परदेशी विद्यार्थ्यांच्या समस्या निराकरण करण्यासाठी कृषि विद्यापीठांनी स्वतंत्र आंतरराष्ट्रीय विद्यार्थी कक्ष स्थापन करुन विद्यार्थ्यांची नोंदणी आणि त्यांच्या सर्व शैक्षणिक व इतर बाबींमध्ये सहकार्य करावे.

७) भारतीय उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या विविध घटकांच्या प्रगतीचा विषयांकित आढावा जसे की परफॉर्मन्स इंडिकेटर (KPI) च्या अनुषंगाने घेण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार कृषि विद्यापीठांनी आंतरराष्ट्रीयकरणासाठी विविध संकेत स्थळावर कृषि विद्यापीठाचे पोर्टल, नियमित आढावा बैठक, (KPI) वर आधारित वार्षिक अहवाल, संख्यात्मक व गुणात्मक परीक्षण, आतंरराष्ट्रीय समपुदेशन, शैक्षणिक संस्थाशी सामंजस्य करार, विद्यापीठात कार्यरत सर्व अभ्यासक्रमाची माहिती, गुणवत्ता प्रवेश प्रक्रिया, शैक्षणिक शुल्क इत्यादी शैक्षणिक माहिती व उपलब्ध सुविधा, प्रशिक्षण आणि क्षमता वृध्दी कार्यक्रम, पुरस्कृत अभ्यासक्रम, अभ्यास दौरे, कौशल्य विकास याबाबतची सखोल माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावी.

८) विद्यार्थ्यांमध्ये परस्परावलंबन, सहानुभूती आणि जागतिकीकरणाचा दृष्टिकोन रुजविण्यासाठी कृषि विद्यापीठांनी प्रयत्न करावेत. तसेच अभ्यासक्रमात पर्यावरण आणि निती मुल्य आधारित बाबींवर काही श्रेयांक आधारित प्रकल्पांचा समावेश करावा. शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी भविष्यात अल्प कालावधीचे खालील अभ्यासक्रम विकसित करावेत.

अ) प्रवेशित आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या निकडीनुसार भारतीय भाषा, स्थानिक इतिहास व भूगोल, स्थानिक संस्कृती आणि विद्यार्थ्यांच्या गरजा यावर आधारित अभ्यासक्रम.

ब) अभ्यासक्रमाशी थेट संबंधीत नसणाऱ्या विषयावर जसे योगा/आयुर्वेद /भारतीय तत्वज्ञान यावर प्रशिक्षण कार्यक्रम.

### २.१.१०. भारतीय ज्ञान प्रणाली (Indian Knowledge System)

भारतीय ज्ञान प्रणाली (Indian Knowledge System) हा शैक्षणिक मंत्रालयाचा अभिनव प्रकल्प असून याचे मुख्यालय अखिल भारतीय तंत्रज्ञान परिषद, नवी दिल्ली येथे आहे. याद्वारे आंतर विद्या शाखीय संशोधनाला चालना देऊन भारतीय ज्ञानाचा व संशोधनाचा उपयोग करुन त्याचे सामाजिक उपयोजन करणे अभिप्रेत आहे. या प्रणालीमध्ये सक्रियपणे भारताचा उच्च वारसा, कला आणि साहित्य, कृषि, मुलभुत विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, व्यवस्थापन, अर्थशास्त्र आणि वास्तुकलेचे प्राचीन ज्ञान यांचा प्रसार करण्यात येणार आहे.

भारतीय ज्ञान पध्दतीचा समृध्द वारसा आणि त्याचा जागतिक संशोधनावर झालेला परिणाम यावर संशोधन करून त्याचा नवीन शैक्षणिक धोरणात शालेय शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत अंतर्भाव करणे आवश्यक आहे. गेल्या दोन शतकापासुन पाश्चात्य संस्कृतीचा आपल्या शिक्षण प्रणालीवर मुख्य प्रभाव दिसुन येतो. त्यामुळे मुख्य प्रवाहातील शिक्षणात भारतीय मुळ ज्ञान दुर्लक्षित केले गेले. ही वस्तूस्थिती विचारात घेता, कृषि विद्यापीठांनी भारतीय ज्ञान पध्दतीचे संशोधन कृषि शिक्षण अभ्यासक्रमात नव्याने समाविष्ट करावे.

उपरोक्त संदर्भात भाकृअप, नवी दिल्ली यांच्या सहाव्या अधिष्ठाता समितीने भारतीय ज्ञान पध्दतीवर अभ्यासक्रमाचे श्रेयांक निश्चित केल्यानुसार राज्यातील कृषि विद्यापीठांमध्ये अंमलबजावणी करण्यात यावी.

### २.२ उच्च कृषि शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा (ICT) वापर

राज्यातील कृषि विद्यापीठांकडून मिश्रीत शिक्षण पध्दतीचा (Blended Learning Model) वापर करणे अभिप्रेत आहे. यामध्ये पारंपारिक पध्दतीव्दारे किमान ६० ते ७० टक्के अभ्यासक्रम पुर्ण करुन उर्वरित ३० ते ४० टक्के अभ्यासक्रम ऑनलाईन प्लॅटफॉर्म वापरुन पुर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे. सध्याच्या माहिती तंत्रज्ञानातील प्रगती पाहता, पारंपारिक व वैयक्तिक शैक्षणिक पध्दतीस पूरक, प्रेरक आणि समृध्द करण्यासाठी पर्यायी दर्जेदार शिक्षण पध्दती आणि आधुनिक साधने व संसाधनांचा अवलंब करणे आवश्यक आहे. दर्जेदार कृषि शिक्षण प्रदान करण्याच्या दृष्टीने कृषि क्षेत्रातील सध्याच्या आणि भविष्यातील येणाऱ्या आव्हानांची पूर्तता करण्यासाठी विद्यमान डिजिटल प्लॅटफॉर्म आणि चालु असलेल्या माहिती तंत्रज्ञान आधारित शैक्षणिक उपक्रमांना अधिक अनुकुलीत आणि विस्तारीत करणे गरजेचे आहे.

सद्यस्थितीत भाकृअपच्या सुचनेनुसार राज्यातील कृषि विद्यापीठ स्तरावर मिश्रीत शिक्षणासाठी व्यासपीठे (Blended Learning Model) व नोडल अधिकारी यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

सध्या उपलब्ध असलेले ई-लर्निंग प्लॅटफॉर्म जसे की, SWAYAM, AGRI DIKSHA, SWAYAM PRABHA यावर उपलब्घ असलेल्या विविध विषयांचा (Syllabus & Content) अभ्यास करुन त्यांचा कृषि व संलग्न विषयातील पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्याचे काम प्रगतीपथावर आहे

प्रत्येक महाविद्यालयाने National Programme on Technology Enhanced Learning (NPTEL) / SWAYAM या प्लॅटफॉर्मवर स्थानिक केंद्र (Local Chapter) स्थापन केले आहेत. आणि त्याद्वारे काही विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीप्रमाणे विविध कोर्सेस पुर्ण केलेले आहेत.

कृषि विद्यापीठांनी सध्याच्या ई-लर्निंग प्लॅटफॉर्मचे व्हर्च्युअल मेडिया लॅब मध्ये रुपांतर करुन त्याद्वारे दर्जेदार प्रात्यक्षिक आणि प्रत्यक्ष प्रयोग-आधारित शिक्षण अनुभवामध्ये सर्व विद्यार्थ्यांना समान संधी देण्यात येणार आहे. भारत सरकारने स्थापन केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच (National Education Technology Forum-NETF) यावर नोंदणी करुन डिजीटल सामग्री तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

भाकृअपने देशभरातील सर्व कृषि विद्यापीठांना ई-लर्निंग (SWAYAM) प्लॅटफॉर्मचा जास्तीत जास्त वापर करण्याचा सल्ला दिला आहे. तसेच, ऑनलाईन शिक्षण प्रक्रियेसाठी भाकृअपने राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प (NAHEP) या अंतर्गत व्हर्च्युअल क्लासरुम, ऑगमेंटेड रिॲलीटी आणि व्हर्च्युअल रिॲलीटी (AR-VR) प्रयोगशाळा आणि डिजीटल साक्षरता संसाधने कृषि विद्यापीठांना वितरीत केली आहेत. तसेच भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी नाहेप प्रकल्पांतर्गत भारतातील कृषि विद्यापीठांच्या विविध शैक्षणिक प्रक्रियांच्या व्यवस्थापनासाठी सक्षम शैक्षणिक व्यवस्थापन प्रणाली (Academic Management System –AMS) विकसित केलेली आहे. राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांनी यावर नोंदणी केलेली असुन शैक्षणिक कार्याचे व्यवस्थापन त्याद्वारे केले जात आहे. कृषि विद्यापीठांनी Agri-DIKSHA या ऑनलाईन पोर्टलवर २१३५ व्हीडीओ व्याख्याने अपलोड केली असुन त्यांचा महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठांच्या विविध महाविद्यालयाव्दारे उपयोग करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठाकडुन अपलोड झालेले १५० शैक्षणिक व्हिडीओ Agri-DIKSHA या पोर्टलवर उपलब्ध आहेत.

| विद्यापीठाचे नाव | एकूण उपलब्ध शैक्षणिक व्हिडीओ (Open Source) |
|---|---|
| मफुकृवि, राहुरी | ३३ |
| डॉ.पंदेकृवि, अकोला | ५६ |
| वनामकृवि, परभणी | ४८ |
| डॉ.बासाकोकृवि,दापोली | १३ |
| एकुण उपलब्ध शैक्षणिक व्हिडीओ | १५० |

कृषि विद्यापीठांच्या शासकीय महाविद्यालयातील सर्व व्याख्यान कक्षांचे रुपांतर डिजीटल क्लासरुम मध्ये करणे आवश्यक आहे व त्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे प्रत्येक विद्यापीठास आवश्यक निधी उपलब्ध करुन द्यावा. प्रति डिजिटल क्लास रुम रु. २५ लाख याप्रमाणे २९० क्लास रुमसाठी रु. ७२.५० कोटी रुपये राज्य शासनाकडून प्राप्त होणे आवश्यक आहे.

| विद्यापीठाचे नाव | उपलब्ध व्याख्यान गृहांची संख्या | सद्या कार्यरत Digital Classroom ची संख्या | आवश्यक Digital Classroom व्याख्यान गृहांची संख्या | विद्यापीठास लागणारा एकुण निधी (कोटी) |
|---|---|---|---|---|
| मफुकृवि, राहुरी | १०३ | १ | १०२ | २५.५० |
| डॉ. पंदेकृवि, अकोला | ६४ | १ | ६३ | १५.७५ |
| वनामकृवि, परभणी | ९४ | १ | ९३ | २३.२५ |
| डॉ. बासाकोकृवि, दापोली | ३३ | १ | ३२ | ८.०० |
| एकुण | २९४ | ४ | २९० | ७२.५० |

## २.३. विद्यापीठ संलग्नता आणि महाविद्यालयांचे मुल्यांकन

राज्यातील सर्व कृषि विद्यापीठे आणि शासकीय कृषि व संलग्न महाविद्यालयांना भाकृअप नवी दिल्ली यांची अधिस्विकृती प्राप्त आहे. तथापि, राज्यातील एकूण १५८ कृषि व संलग्न विनाअनुदानित खाजगी महाविद्यालयांपैकी केवळ कृषि महाविद्यालय, बारामती, जि. पुणे या महाविद्यालयास अधिस्वीकृती प्राप्त आहे.

सद्यस्थितीत राज्यातील खाजगी कृषि व संलग्न महाविद्यालयांची संलग्नता नूतनीकरण करण्यासाठी त्यांचे मूल्यांकन संबंधित कृषि विद्यापीठांमार्फत करण्यात येते. तथापि, सदर मूल्यांकनास राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर अधिकृत मान्यता व समतूल्यता नाही. त्यामुळे सर्व खाजगी महाविद्यालयांना देखील भाकृअप, नवी दिल्ली यांचेकडून अधिस्विकृती प्राप्त करून घेणे बंधनकारक करण्यात यावी आणि अधिस्विकृती प्राप्त महाविद्यालयांचेच संलग्नतेचे नूतनीकरण करण्यात यावे.

### २.३.१. कृषि विद्यापीठाशी संलग्न खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांमार्फत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ची अंमलबजावणी

राज्यातील कृषि विद्यापीठातील कृषि व संलग्न विषयातील पदवी अभ्यासक्रमाची एकूण प्रवेश क्षमता १८,१२६ असून त्यापैकी विद्यापीठाशी संलग्न खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता १४,४४० (८० टक्के) आहे. या सर्व खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये देखील नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची प्रभावी अंमलबजावणी होणे अनिवार्य आहे. त्याअनुषंगाने कृषि परिषद आणि कृषि विद्यापीठांनी त्यांच्याशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांना याबाबत अवगत करून यासाठी आवश्यक सोयीसुविधा विकसित करून घेण्याबाबत पाठपुरावा करावा. यासाठी त्यांच्या मुल्यांकन पध्दतीमध्ये सुधारणा करून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी अनुकूल गुणांक निश्चित करण्यात यावेत. अपेक्षित गुणांकापेक्षा कमी गुणांक असल्यास संबंधित महाविद्यालयाची संलग्नता रद्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

## २.४. संशोधन मार्गदर्शकांच्या उपलब्धतेनुसार पदव्युत्तर/आचार्य पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश

राज्यातील कृषि विद्यापीठात १३८८ पदव्युत्तर आणि २५४ आचार्य पदवी प्रवेश क्षमता आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांला एक मुख्य संशोधन मार्गदर्शक आवश्यक आहे. पदव्युत्तर शैक्षणिक नियमावली नुसार सध्या एका मार्गदर्शकाला

एकूण जास्तीत जास्त सहा पदव्युत्तर आणि चार आचार्य पदवी अशा एकूण दहा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची क्षमता निश्चित करण्यात आली आहे. ही संख्या कमी करून एका मार्गदर्शकाकडे एका वेळी जास्तीत जास्त सहाच विद्यार्थी असावेत.

पदव्युत्तर व आचार्य पदवीच्या माध्यमातून होणाऱ्या संशोधनाची गुणवत्ता व विद्यार्थ्यांचा दर्जा हा त्याला उपलब्ध झालेल्या मान्यता प्राप्त अनुभवी संशोधन मार्गदर्शकावर अवलंबून असतो. कृषि विद्यापीठातील प्राध्यापक व उच्च संवर्गातील रिक्त पदे लक्षात घेता प्रवेश क्षमतेनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांना मार्गदर्शक उपलब्ध होत नाहीत. यासाठी दरवर्षी उपलब्ध मार्गदर्शकांच्या संख्येनुसारच प्रवेश क्षमता निश्चित करण्यात यावी.

अनुभवी व नामांकित संशोधक मार्गदर्शकांची उपलब्धता वाढविण्यासाठी संबंधीत विषयातील निवृत्त आणि इच्छुक सक्षम प्राध्यापकांना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची संधी देण्यात यावी. तसेच पदव्युत्तर शैक्षणिक नियमावली नुसार विद्यापीठातील संशोधन केंद्रावर आणि राज्यातील भाकृअपच्या संशोधन केंद्रावरील शास्त्रज्ञांना सह मार्गदर्शक म्हणून मान्यता देण्याची तरतूद आहे. त्यानुसार विद्यापीठाने काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्य विकसित करण्यासाठी कृषि, कृषि पणन, कृषि उद्योग, कृषि आभियांत्रिकी, कृषि व्यवसाय व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनुभवी व यशस्वी व्यावसायिकांना कृषि विद्यापीठे / महाविद्यालयांमध्ये Professor of Practice म्हणुन सेवा देण्याची संधी देण्यात यावी.

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीच्या धर्तीवर राज्यातील कृषि विद्यापीठांत सेवानिवृत्तीच्या जवळ असलेल्या प्राध्यापकांना ख्यातनाम प्राध्यापक (Professor of Eminence) शास्त्रज्ञ म्हणुन नियुक्ती देण्याची कार्यपध्दती व त्यांची किमान संख्या ठरवावी. अशा प्राध्यापकांना पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमांमध्ये अध्यापनासाठी व संशोधन कार्यासाठी सहभागी करुन घेता येऊ शकेल.

शैक्षणिक योग्यता व तीन वर्षे किंवा त्याहून अधिक काळ विद्यापीठात प्राध्यापक/ ख्यातनाम प्राध्यापक / शास्त्रज्ञ पदाचा अनुभव आहे अशा सक्षम सेवानिवृत्त प्राध्यापकांना पदव्युत्तर आणि आचार्य पदवी विद्यार्थ्यांसाठी संशोधन मार्गदर्शक / सल्लागार समिती सदस्य म्हणून मार्गदर्शन करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात यावी.

## २.५. पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवीसाठी संशोधन प्रकल्पांची निवड

पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या संशोधनाच्या प्रकल्पाची निवड ही महत्त्वाची बाब आहे. हवामानातील बदल तसेच जैविक-अजैविक ताण, शेतीमालाचे मूल्यवर्धन, कृषि पणन, कृषि मालाची आयात-निर्यात, मजूरांची कमतरता, निविष्ठांचा कार्यक्षम वापर, वाढता उत्पादन खर्च यासारख्या शेतकऱ्यांना दररोज भेडसावणाऱ्या समस्यांवर पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्प हाती घेवून त्यावर उपाययोजना सुचविणे अभिप्रेत आहे.

कृषि क्षेत्राच्या दिर्घकालीन शाश्वत विकासासाठी उपयोजित तंत्रज्ञानासोबतच मूलभूत संशोधनाचीही आवश्यकता आहे. यासाठी आचार्य पदवी विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषयाशी संबंधित मूलभूत बाबींवर सखोल संशोधन हाती घेण्याची गरज आहे.

पदव्युत्तर संशोधनामार्फत संशोधनाचा दर्जा सुधारण्यासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञ यांनी संशोधनामध्ये सातत्य (Consistency/ Continum) ठेवून साखळी संशोधन धोरणाचा अवलंब करावा.

कृषि क्षेत्रातील उद्योजकांना कृषि विद्यापीठांमधील संशोधन प्रकल्प पूरक राहण्याच्या दृष्टीने शास्त्रज्ञांनी कृषि व संलग्न विषयातील राष्ट्रीय समस्यांवर किमान ३० टक्के व प्रादेशिक किंवा राज्य स्तरावरील समस्यांवर कमाल ७० टक्के भर देण्यात यावा.

राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांमध्ये हवामान बदल, अन्न सुरक्षा, उर्जा सुरक्षा, जल सुरक्षा आणि 'संपूर्ण आरोग्य (मृदा आरोग्य, वनस्पती आरोग्य, प्राणी आरोग्य व मानवाचे आरोग्य) अशा व्यापक संकल्पनेवर संशोधन करावे.

## २.६. राज्यातील निम्न कृषि शिक्षण सद्यस्थिती व अपेक्षित बदल.

राज्यातील चारही कृषि विद्यापीठात दोन स्तरांमध्ये निम्नस्तर कृषि शिक्षण दिले जाते. यात कृषि तंत्रनिकेतन हा तीन वर्षाचा इंग्रजी माध्यमाचा अभ्यासक्रम आणि दोन वर्षाचा मराठी कृषि पदविका अभ्यासक्रम राबविण्यात येतो. शेतकऱ्यांच्या पाल्यांना मातृभाषेतून कृषि शिक्षण घेता यावे व कृषि क्षेत्रात कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यादृष्टीने दोन वर्षाचा कृषि पदविका अभ्यासक्रम राबविण्यात येत असून यामध्ये १० वी पास विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. राज्यात सद्यस्थितीत खालीलप्रमाणे कृषि तंत्र विद्यालये आणि तंत्रनिकेतन कार्यरत आहेत.

| विद्यापीठ | कृषि तंत्र विद्यालयांची संख्या (२ वर्षे कालावधी) | | | कृषि तंत्रनिकेतन संख्या कृषि / मत्स्य पदविका (३ वर्षे कालावधी) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | शासकीय | खाजगी | एकूण | शासकीय | खाजगी | एकूण |
| मफुकृवि, राहुरी | ८ | ५४ | ६२ | १ | १४ | १५ |
| डॉ. पंदेकृवि, अकोला | ९ | ४७ | ५६ | - | - | - |
| वनामकृवि, परभणी | ६ | ५१ | ५७ | - | - | - |
| डॉ.बासाकोकृवि, दापोली | ४ | २३ | २७ | १ | - | १ |
| एकूण | २७ | १७५ | २०२ | २ | १४ | १६ |

कृषि पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याकरिता १२ वी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. पदवी प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना एक वर्षाचे शिक्षण पुर्ण केल्यानंतर पदवी अभ्यासक्रमातून निर्गमण करावयाचे असल्यास एक वर्षाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम गृहित धरुन त्यांना 'प्रमाणपत्र' देण्यात येणार आहे. त्याचप्रकारे दोन वर्षे पदवी अभ्यासक्रम पुर्ण केल्यास सदर विद्यार्थ्यांना दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम पुर्ण झाल्याने त्यांना 'पदविका' प्रमाणपत्र देण्यात येणार आहे व चार वर्षे अभ्यासक्रम पुर्ण केल्यास सदर विद्यार्थ्यांना 'पदवी' प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

वरीलप्रमाणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ला अनुसरून महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठात सध्या राबविण्यात येणाऱ्या मराठी माध्यमाच्या दोन वर्ष कालावधीच्या पदविका अभ्यासक्रमाचे व इंग्रजी माध्यमाच्या तीन वर्ष कालावधीच्या कृषि तंत्र निकेतन (Agri. Polytechnique) अभ्यासक्रमाचे रूपांतर करणे आवश्यक आहे. म्हणजेच, राज्यात उच्च शिक्षण व निम्न शिक्षण यांच्या समांतर शिक्षण कार्यप्रणाली सुरू राहतील.

सद्यस्थितीत १० वी नंतर कृषितंत्र निकेतन यांच्यामार्फत कार्यरत इंग्रजी माध्यमातील तीन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम हा पूर्ववत सुरू ठेवावा. तथापि, राज्यातील इतर तांत्रिक व्यावसायिक अभ्याक्रमांप्रमाणे, १२ वी नंतर पदवी अभ्यासक्रमातून दोन वर्ष पूर्ण केलेल्या किंवा कृषि तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण होवून पदवी अभ्यासक्रमातील थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश घेवून उत्तीर्ण होण्याऱ्या विद्यार्थ्यांना 'प्रगत पदविका' (Advance Diploma) प्रदान करण्यात यावी. कृषि तंत्रनिकेतन पदवीकाधारक विद्यार्थी कृषि महाविद्यालयात नियमानुसार दुसऱ्या वर्षात प्रवेश घेऊन पदवी अभ्यासक्रमाच्या तीन वर्षातील सर्व विषय यशस्वीरित्या पूर्ण केल्या नंतर असे विद्यार्थी कृषि पदवी घेण्यास पात्र राहतील.

## २.७. कृषि विद्यापीठांना शिक्षण विषयक मार्गदर्शक सूचना

१. भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या मार्गदर्शक सूचना व मान्यतेनुसार नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत कृषि व संलग्न विषयातील पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षी प्रमाणपत्र, दुसऱ्या वर्षाअखेर पदविका व चौथ्या वर्षाअखेर व्यावसायिक / संशोधनासह पदवी देण्याचे प्रस्तावित आहे. पदवी आणि पदव्युत्तर पदवी स्तरावर विद्यार्थ्यांसाठी बहुविध प्रवेश आणि निर्गमणाचे पर्याय उपलब्ध करावेत. विद्यार्थ्यांना महाविद्यालयात आकर्षित करण्यासाठी किमान कौशल्यावर आधारीत विविध प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यात यावेत.

२. कृषि विद्यापीठांनी 'संस्थात्मक विकास आराखडा' (Institutional Development Plan) तयार करुनच भविष्यातील विकास कार्याचे नियोजन करावे. यासाठी सर्व विद्यापीठांनी शासकीय व खाजगी संस्थांकडुन विद्यापीठाच्या विकासासाठी निधीचे स्त्रोत शोधावेत व मिळण्यासाठी प्रयत्न करावा.

३. कृषि क्षेत्रासमोरील नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कृषि विद्यापीठांनी आवश्यक असलेल्या नवीन विद्याशाखा व त्याअनुषंगाने आंतरशाखीय आणि इतर विषयांचे आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम सुरु करावेत.

४. कृषि विद्यापीठातील विविध महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या अंतीम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी रोजगार निर्मिती केंद्र स्थापन करावे व त्यासाठी आवश्यक असलेल्या सोयी सुविधा व मनुष्यबळ यासाठी आवश्यक असलेले अर्थ सहाय्य विविध स्त्रोतातून मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत.

५. कृषि विद्यापीठांनी शासकीय / खाजगी कंपन्याच्या मदतीने Incubation Centre स्थापन करण्यासाठी प्रयत्न करावेत. त्याद्वारे विद्यार्थ्यांसाठी संबंधीत विषयामध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवावा.

६. कृषि क्षेत्रात कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास, उद्योजकता आणि स्वंयरोजगाराच्या संधींना चालना देण्याकरिता कृषि हवामान प्रदेश, उपलब्ध संसाधने, पायाभूत सुविधा आणि उपलब्ध तज्ञ मनुष्यबळ यांचा विचार करुन प्रत्येक कृषि विद्यापीठाने प्रस्तावित केल्याप्रमाणे कृषि व संलग्न विषयातील अभ्यासक्रम तयार करावेत.

७. पदवी अभ्यासक्रमात कृषि व संलग्न विषयांशी संबंधीत भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने शिफारशीत केलेल्या भारतीय ज्ञान पध्दतीचा विषय (तीन ते पाच श्रेयांक) अनिवार्य म्हणून समावेश करावा.

८. विविध प्लॅटफार्मवर AgMOOC, SWAYAM, NPTEL, etc.) अनेक कृषि व संलग्न संस्थांद्वारे ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेले आहे. यामधील काही अभ्यासक्रम कृषि विद्यापीठांमधील अभ्यासक्रमांशी निगडीत असल्याने कृषि विद्यापीठांनी अशा अभ्यासक्रमांची समतुल्यता निश्चित करून विद्यार्थ्यांना असे अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहीत करावे.

९. विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्य विकसित करण्यासाठी कृषि, कृषि पणन, कृषि उद्योग, कृषि आभियांत्रिकी, कृषि व्यवसाय व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनुभवी व यशस्वी व्यावसायिकांना महाविद्यालयांमध्ये Professor of Practice म्हणुन सेवा देण्याची संधी देण्यात यावी.

१०. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीच्या धर्तीवर राज्यातील कृषि विद्यापीठांत सेवानिवृत्तीच्या जवळ असलेल्या प्राध्यापकांना ख्यातनाम प्राध्यापक (Professor of Eminence) शास्त्रज्ञ म्हणुन नियुक्ती देण्याची कार्यपध्दती व त्यांची किमान संख्या ठरवावी. अशा प्राध्यापकांना पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमांमध्ये अध्यापनासाठी व संशोधन कार्यासाठी सहभागी करुन घेता येऊ शकेल.

११. प्रत्येक विद्यापीठाने कृषि शिक्षण व संशोधनामध्ये सातत्यपूर्ण व उच्च दर्जाचे मार्गदर्शन प्राप्त होण्यासाठी कृषि विद्यापीठांचे कुलगुरू किंवा किमान संचालक या पदावरून सेवानिवृत्त झालेले आतंरराष्ट्रीय व राष्ट्रीय ख्याती प्राप्त शास्त्रज्ञांसाठी मानद प्राध्यापकाचे (Professor Emeritus) एक पद निर्माण करावे आणि अशा मानद प्राध्यापकांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा विद्यापीठाच्या शिक्षण व संशोधन कार्यात मार्गदर्शक (Mentor) म्हणून लाभ घ्यावा.

१२. शैक्षणिक योग्यता व तीन वर्षे किंवा त्याहून अधिक काळ विद्यापीठात प्राध्यापक/ ख्यातनाम प्राध्यापक / शास्त्रज्ञ पदाचा अनुभव आहे अशा सक्षम सेवानिवृत्त प्राध्यापकांना पदव्युत्तर आणि आचार्य पदवी विद्यार्थ्यांसाठी संशोधन मार्गदर्शक / सल्लागार समिती सदस्य म्हणून मार्गदर्शन करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात यावी.

१३. पदव्युत्तर संशोधनामार्फत संशोधनाचा दर्जा सुधारण्यासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञ यांनी संशोधनामध्ये सातत्य (Consistency/ Continuity) ठेवून साखळी संशोधन धोरणाचा अवलंब करावा.

१४. कृषि क्षेत्रातील उद्योजकांना कृषि विद्यापीठांमधील संशोधन प्रकल्प पूरक राहण्याच्या दृष्टीने शास्त्रज्ञांनी कृषि व संलग्न विषयातील राष्ट्रीय समस्यांवर किमान ३० टक्के व प्रादेशिक किंवा राज्य स्तरावरील समस्यांवर कमाल ७० टक्के भर देण्यात यावा.

१५. कृषि विद्यापीठांनी त्यांच्या अधिनस्त कार्यरत शिक्षकवर्गीय कर्मचारी यांना संबंधीत विषयातील नवीन संकल्पना व तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी पोस्ट डॉक्टरल फेलोशिप तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित प्रशिक्षण कार्यक्रम, उन्हाळी / हिवाळी कार्यशाळा इ. मध्ये नियमितपणे सहभाग नोंदविण्यास प्रोत्साहीत करावे.

१६. प्रत्येक विद्यापीठात शिक्षण व परिक्षा कार्यांचे नियमन करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व सोई-सुविधासह परिक्षा नियंत्रकासह कक्ष स्थापन करण्यात यावा.
१७. विविध कृषि उद्योग व उपक्रम यासाठी लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाची निर्मिती करण्यासाठी दहावी नंतर दोन वर्षाचा मराठी पदविका अभ्यासक्रम सुधारित करून कालसुसंगत करावा.
१८. दहावी नंतर कृषि तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण होवून पदवी अभ्यासक्रमातील थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश घेवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना 'प्रगत पदविका' प्रदान करण्यात यावी.
१९. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना विशेषत: आशियाई, आफ्रिकन, दक्षिण अमेरिका व ऑस्ट्रेलिया या देशांतील कृषि व संलग्न विषयाच्या अभ्यासक्रमातील प्रवेशासाठी आकर्षित करावे.
२०. कृषि विद्यापीठांतील सर्व खाजगी कृषि व संलग्न महाविद्यालयांना देखील भाकृअप, नवी दिल्ली यांचेकडून अधिस्विकृती प्राप्त करून घेणे बंधनकारक करण्यात यावे आणि अधिस्विकृती प्राप्त महाविद्यालयांच्याच संलग्नतेचे नूतनीकरण करण्यात यावे.

### २.८. राज्य शासनास कृषि शिक्षण विषयक शिफारसी

१. राज्यातील कृषि विद्यापीठांमध्ये सध्या ५० टक्के पेक्षा जास्त शिक्षकवर्गीय पदे रिक्त आहेत. तसेच प्राध्यापक आणि उच्च संवर्गातील ८० टक्के पदे रिक्त आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकवर्गीय ८० टक्के पदे कार्यरत असणे अपेक्षित आहे. ही बाब विचारात घेता सर्व कृषि विद्यापीठांतील रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत.
२. राज्यातील बहुतांश खाजगी विनाअनुदानित कृषि व संलग्न महाविद्यालयातील शैक्षणिक सुविधा अपुऱ्या असून शिक्षक वर्गाचा दर्जा अपेक्षेप्रमाणे नाही. त्यात गुणात्मक सुधारणा होण्यासाठी त्यांना भाकृअप, नवी दिल्ली यांचेकडून अधिस्विकृती (Accreditation) बंधनकारक करण्यात यावी. अधिस्विकृत महाविद्यालयांच्या संलग्नतेचे नूतनीकरण करण्यात यावे.
३. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार मनुष्यबळाचा कार्यक्षम वापर होण्यासाठी शक्य तेथे पदवी, पदव्युत्तर, आचार्य पदवी अभ्यासक्रम एकाच ठिकाणी सुरू करण्यात यावेत.
४. राज्य शासनाच्या धोरणानुसार ज्या जिल्हयात एकही शासकीय कृषि महाविद्यालय कार्यरत नाही त्या जिल्ह्यात शासनाने कृषि महाविद्यालय स्थापन करण्यास प्राधान्य द्यावे.
५. प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये कृषि हा विषय शिकविण्यासाठी कृषि व संलग्न विषयातील पदवीधारक शिक्षक अनिवार्य करावा.
६. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी पदवी अभ्यासक्रमाच्या पात्रतेबाबत केलेले निकष राज्यातील कृषि व संलग्न पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेसाठी स्विकारण्यात यावेत.
७. कृषि विद्यापीठांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांनुसार कृषि व संलग्न विषयातील नवनवीन कौशल्य आधारित प्रमाणपत्र / पदविका पदवी अभ्यासक्रम राबविण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक मूलभूत सोयीसुविधांसाठी शासनाने आवश्यक निधी उपलब्ध करुन द्यावा.
८. महाविद्यालयातील प्राध्यापकांना प्रगत व आधुनिक तंत्रज्ञानासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षण व प्रशिक्षणासाठी प्रोत्साहीत करावे. शासनाने प्राध्यापकांना परदेश दौरे व शिक्षण, प्रशिक्षणासाठी मान्यता देण्याचे अधिकार संबंधित कृषि विद्यापीठांचे कुलगुरू यांना प्रदान करण्यात यावेत.
९. कृषि महाविद्यालयांमधील डिजीटल पायाभुत सुविधांचे त्वरीत बळकटीकरण करुन ई-लर्निंग प्लॅटफॉर्मचा वापर वाढविणे आवश्यक आहे. कृषि विद्यापीठांनी एकत्रित प्रयत्नाव्दारे प्रभावी शिक्षण (Education Delivery), मूल्यमापन (Evaluation) आणि महाविद्यालयातील शिक्षकांना डिजिटल संसाधनाचा वापर करण्यासंदर्भात प्रशिक्षण (Training) आयोजित करण्यासाठी शासनाने प्रत्येक विद्यापीठास आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा.
१०. राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्पाव्दारे (NAHEP) कृषि विद्यापीठांनी निर्माण केलेल्या विविध ICT सुविधा यापुढील काळात शाश्वत आणि अद्यावत ठेवण्याकरीता तसेच डिजिटल ई-कंटेंट विकसित करण्याकरिता (e-content development) एक समर्पित ICT केंद्र (Dedicated ICT Cell) स्थापन करण्याची आवश्यकता आहे. तसेच,

शैक्षणिक व्हिडीओ निर्मितीकरीता प्रत्येक कृषि विद्यापीठात दोन स्वतंत्र अद्ययावत प्रसार माध्यम स्टुडिओ (Media Studio / Virtual classroom) सुविधा निर्माण करावी. त्यासाठी शासनाने विद्यापीठास आवश्यक निधी उपलब्ध करुन द्यावा.

११. कृषि विद्यापीठात शिक्षण घेतलेल्या होतकरू व नाविन्यपूर्ण कल्पना असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या संकल्पनेचे व्यावसायिकीकरण करण्याकरिता सुविधा केंद्र (Innovation , Incubation and Linkages Incubation Centre) स्थापन करण्यासाठी शासनाने सर्व कृषि विद्यापीठांतर्गत निवडक महाविद्यालयांना आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा.

१२. सर्व शासकीय कृषि व संलग्न महाविद्यालयातील व्याख्यान कक्षांचे डिजीटल क्लासरुम मध्ये रुपांतर करणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने प्रत्येक विद्यापीठास आवश्यक निधी उपलब्ध करुन द्यावा.

# ३. कृषि संशोधन व विकास

**कार्यकक्षा :** कृषि विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या संशोधन केंद्रांचा संक्षिप्त आढावा घेऊन त्यांचे बळकटीकरणे करणे तसेच राज्यात नव्याने लागवडीखाली आलेल्या व प्रस्थापित होत असलेल्या पिकावरील संशोधनासाठी उपाययोजना सुचविणे...

शासनाने ठरवून दिलेल्या कार्यकक्षेनुसार सदर विषयाबाबत सविस्तर माहिती संकलित करून अभ्यास करण्यासाठी डॉ. शरद गडाख, कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे उपसमिती स्थापन करण्यात आली.

| अ.क्र. | उपसमिती | पदनाम |
|---|---|---|
| १. | डॉ. शरद गडाख, कुलगुरु, डॉ.पंदेकृवि, अकोला | अध्यक्ष |
| २. | डॉ.हरिहर कौसडीकर, संचालक संशोधन, कृषि परिषद, पुणे | सदस्य |
| ३. | डॉ. संजय वानखेडे, सेवानिवृत्त प्राध्यापक, डॉ. पंदेकृवि, अकोला | सदस्य |
| ४. | संशोधन संचालक, मफुकृवि, राहुरी | सदस्य |
| ५. | संशोधन संचालक, वनामकृवि, परभणी | सदस्य |
| ६. | संशोधन संचालक, डॉ. बासाकोकृवि, दापोली | सदस्य |
| ७. | डॉ.विलास खर्चे ,संशोधन संचालक, डॉ. पंदेकृवि, अकोला | सदस्य सचिव |

महाराष्ट्र क्षेत्रफळाच्या दृष्टीने देशातील तिसरे मोठे राज्य असून नऊ कृषि हवामान विभागात विभागले आहे. राज्यातील जमीन, हवामान, पर्जन्यमान आणि पीक रचना विचारात घेता, राज्याच्या कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार विषयक गरजांच्या पुर्ततेसाठी विविध विभागात कृषि विद्यापीठांर्तगत खालीलप्रमाणे संशोधन केंद्र / प्रकल्प कार्यान्वित आहेत.

| विद्यापीठाचे नाव | संशोधन केंद्र | अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प |
|---|---|---|
| मफुकृवि, राहुरी | २७ | ४६ |
| डॉ.पंदेकृवि, अकोला | १७ | २४ |
| वनामकृवि, परभणी | १८ | २३ |
| डॉ.बासाकोकृवि, दापोली | १५ | १४ |
| **एकूण** | **७७** | **१०७** |

स्वातंत्र्योत्तर काळात कृषि विद्यापीठांमार्फत विकसित केलेल्या कृषि संशोधन व तंत्रज्ञानाचा अवलंब शेतकरी आणि उद्योजकांनी मोठया प्रमाणात केल्यामुळे राज्याच्या सर्व प्रकारच्या कृषि उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे, महाराष्ट्र हे देशातील कृषि क्षेत्रातील निर्यातक्षम उत्पादन करणारे अग्रेसर राज्य म्हणून उदयास आले आहे. तसेच, कृषि उत्पादनावर प्रक्रिया करणारे उद्योग उदा. साखर व उपपदार्थ, वस्त्रोद्योग, अन्न प्रक्रिया, खाद्यतेल उद्योग, दुग्धोत्पादन इत्यादी उत्तम प्रकारे विकसित झाले असून त्याचा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर दूरगामी व सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून येते.

विविध संशोधन केंद्र आणि प्रकल्पांतर्गत होणाऱ्या संशोधनावर सांगोपांग चर्चा होवून त्यावर आधारीत शिफारशी देण्यासाठी राज्यामध्ये दर वर्षी कृषि परिषद, कृषि विद्यापीठे आणि कृषि व संलग्न विभाग यांची संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीची बैठक (Joint Agresco) आयोजित करण्याची अभिनव पध्दत राज्यात रूढ आहे. या बैठकांमध्ये सन १९७३ पासून आतापर्यंत शिफारशीत पिकांचे वाण, सुधारित अवजारे आणि पीक उत्पादन व प्रक्रिया तंत्रज्ञान यासंबंधीचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| विद्यापीठ | संशोधन शिफारशी / तंत्रज्ञान | | | |
|---|---|---|---|---|
| | सुधारित वाण | कृषी यंत्रे /अवजारे | सुधारित तंत्रज्ञान | एकुण |
| मफुकृवि, राहुरी | २९५ | ४६ | १७७९ | २१२० |
| डॉ.पंदेकृवि, अकोला | १८१ | ५२ | १५७८ | १८११ |
| वनामकृवि, परभणी | १५४ | ५६ | १०४१ | १२५१ |
| डॉ.बासाकोकृवि,दापोली | १०० | २५ | १३०४ | १४२९ |
| एकुण | ७३० | १७९ | ५७०२ | ६६११ |

राज्यातील कृषि विद्यापीठांनी सन १९७३ ते २०२३ या कालावधीत संशोधित केलेल्या तंत्रज्ञानापैकी १२ संशोधनांना पेटंट मिळाले असून ८० तंत्रज्ञानाची पेटंटसाठी नोंदणी झालेली आहे. राज्यातील कृषि विद्यापीठांमधील २३२ पिकांच्या वाणांची वनस्पती वाणांचे संरक्षण आणि शेतकरी हक्क प्राधिकरण (Protection of Plant Varieties and Farmer's Rights Authority) यांचेकडे नोंदणी झाली आहे. विविध संशोधन केंद्रामार्फत संशोधन होवून शिफारशीत काही निवडक वाण, यंत्र आणि तंत्रज्ञान याबाबतची विद्यापीठनिहाय माहिती परिशिष्ट क्र. ४ मध्ये नमूद करण्यात आली आहे.

राज्याच्या कृषि विषयक गरजा आणि त्या त्या विभागातील शेतकऱ्यांना आवश्यक असलेले तंत्रज्ञान, शेतकऱ्यांचे ज्वलंत प्रश्न तसेच याविषयी कृषि विभागाकडून मिळालेले प्रत्याभरण आणि देशपातळीवरील संशोधन कार्याचा आढावा घेऊन संशोधनाची उद्दिष्टिये लक्षात घेवून अल्प आणि दीर्घ मुदतीच्या संशोधन कार्याचे नियोजन कृषि विद्यापीठ पातळीवर आणि संयुक्त कृषि संशोधन व विकास समिती आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या कार्यशाळांद्वारे करण्यात येते. कृषि विद्यापीठांव्यतिरिक्त संशोधन क्षेत्रात कार्यरत असलेल्या इतर शासकीय व खाजगी संस्था यांचेशी विद्यापीठे सामंजस्य करार करून नवनवीन मुद्यांवर गरजेनुसार संशोधन प्रकल्प हाती घेतात. त्याचबरोबर, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील ख्यातनाम संशोधन संस्थाशी देखील सामंजस्य करार करून संशोधन प्रकल्प राबविण्यात येतात.

राज्यातील कृषि विद्यापीठांचा राष्ट्रीय बियाणे प्रकल्पात सहभाग असून सदर प्रकल्पांतर्गत विविध पीक वाणांच्या केंद्रक (Nucleus) आणि पैदासकार (Breeder), बिजोत्पादनाची संपूर्ण जबाबदारी कृषि विद्यापीठांवर सोपविण्यात आली आहे. याशिवाय, राज्यातील कृषि विद्यापीठांचे राष्ट्रीय बियाणे साखळीमध्ये सक्रिय व महत्वपूर्ण योगदान असून विद्यापीठात विविध पीक वाणांच्या पायाभूत (Foundation), प्रमाणित (Certified) आणि सत्यप्रत (Truthful) बिजोत्पादनाचा कार्यक्रम देखील राबविला जातो. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (MSSCL), राष्ट्रीय बियाणे महामंडळ (NSC), खाजगी बियाणे उत्पादक कंपन्या व शेतकरी उत्पादक संस्था (FPO) अशा सर्व बियाणे उत्पादन क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थांची मागणी पूर्ण करून उर्वरित बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले जाते. राज्यातील कृषि विद्यापीठांमध्ये त्या त्या विभागातील मागणीनुसार फळ पिकांच्या दर्जेदार कलमे व रोपांची मोठया प्रमाणात निर्मिती करून शेतकऱ्यांना पुरविण्यात येतात.

हवामानातील बदलानुसार संशोधनामध्ये आवश्यक ते बदल करून हवामान बदलास पूरक, जैविक-अजैविक ताण सहन करू शकणारे कीड व रोग प्रतिकारक वाण विकसित करणे यावर कालानुरुप संशोधन करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती, एकात्मिक कीड व अन्नद्रव्य व्यवस्थापन, मत्स्य संवर्धन, कमी श्रमामध्ये वापरता येतील अशी अवजारे

याबाबत संशोधन कार्य कृषि विद्यापीठांनी हाती घेतले असून संशोधन कार्याचे बळकटीकरण केल्यास निश्चितपणे महाराष्ट्रातील शेतीमध्ये कालानुरुप बदलत्या आव्हांनाचा सामना करण्यासाठी उपयोग होणार आहे.

## ३.१ संशोधन केंद्रात कालसुसंगत सुधारणा

सध्या राज्यात कार्यरत असलेल्या संशोधन केंद्रांची प्रमुख तीन भागात विभागणी करता येईल.

१. प्रमुख संशोधन केंद्र (Main Research Station)

२. उप / सहाय्यकारी संशोधन केंद्र (Strategic Research Station)

३. पडताळणी संशोधन केंद्र (Verification Research Center)

सर्व उपकेंद्रांवर त्यांच्या मुख्य पिकांशिवाय आवश्यकतेनुसार इतर पिकांच्या बहुस्थळीय / पडताळणी चाचण्या घेणे अपेक्षित आहे.

सदर उपसमितीने राज्यातील सर्व संशोधन केंद्रांचा आढावा घेवून कृषि क्षेत्रातील समस्यांची सोडवणूक करण्यासाठी खालीलप्रमाणे संशोधन केंद्रात सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

अ. कार्यरत संशोधन केंद्राचे बळकटीकरण

ब. आवश्यक नवीन संशोधन केंद्रांची स्थापना

### ३.१.१ कार्यरत संशोधन केंद्राचे बळकटीकरण

राज्यातील चारही कृषि विद्यापीठांमधील संशोधन केंद्रांची सध्यस्थिती तसेच गरजेनुसार करावयाचे बळकटीकरण याबाबतचा विद्यापीठनिहाय प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.

**अ. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

| अ. क्र. | संशोधन केंद्र | संशोधनाची सद्यस्थिती | वर्गीकरण | प्रस्तावित सुधारणा (अतिरिक्त संशोधन कार्यक्रम) | बळकटीकरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मध्यवर्ती परिसर, मफुकृवि, राहुरी, जि. अहमदनगर | रब्बी ज्वारी, कापूस, कडधान्ये, उन्हाळी भुईमूग, फळपिके, भाजीपाला, चारापिके, औषधी व सुगंधी वनस्पती पिके, बियाणे तंत्रज्ञान संशोधन, जैव तंत्रज्ञान, एकात्मिक शेती पध्दती, सेंद्रिय शेती, काटेकोर शेती, सिंचन व्यवस्थापन, मृद परीक्षण व पीक प्रतिसाद, यंत्रे व अवजारे, दुर्मिळ व दुर्लक्षित पीके, कृषि वानिकी, शेळी, मेंढी व गो संशोधन | मुख्य केंद्र | हवामान अनुकूल वाण, तंत्रज्ञान व एकात्मिक पीक पध्दती विकसित करणे काढणी पश्चात तंत्रज्ञानाचा वापर करून मूल्यसाखळी विकसित करणे. कृषि अर्थशास्त्र तसेच पणन व निर्यात यासंबंधी संशोधन हाती घेणे, त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे. | पायाभूत सुविधांसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर | मृद-जल संधारण व संवर्धन संशोधन, कोरडवाहू शेती तंत्रज्ञान, कृषि हवामान संशोधन, ज्वारी, मटकी, कुलथी, सूर्यफूल, करडई, एरंडी, कोरडवाहू फळपिके इत्यादी | मुख्य केंद्र | बदलत्या हवामानाविषयी संशोधन आणि त्यास अनुकूल पीक पध्दती विकसित करणे व त्यासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करणे | मंजूर पदे प्राधान्याने भरावीत तसेच पायाभूत सोयीसुविधांसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता |
| ३ | विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे | पपई, आंबा, पेरु, चिकू, निर्यातक्षम भाजीपाला पिके, बटाटा, घेवडा, फूलपिके | मुख्य केंद्र | बदलत्या हवामानाविषयी संशोधन आणि त्यास अनुकूल पीक पध्दती विकसित करणे व त्यासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करणे तसेच पपई संशोधनावर अधिक भर देणे | मंजूर पदे प्राधान्याने भरावीत तसेच पायाभूत सोयीसुविधांसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता |
| ४ | विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडापार्क, कोल्हापूर | भात, मका, नाचणी व दुय्यम भरडधान्य (Minor Millets) भुईमूग, पंढरपुरी म्हैस | मुख्य केंद्र | बदलत्या हवामानाविषयी संशोधन आणि त्यास अनुकूल पीक पध्दती / एकात्मिक शेती पध्दती विकसित करणे व त्यासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करणे | मंजूर पदे प्राधान्याने भरावीत तसेच पायाभूत सोयीसुविधांसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता |
| ५ | विभागीय कृषि संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक | भात, कारळा, नाचणी व दुय्यम भरडधान्य (Minor Millets) | मुख्य केंद्र | भात, भाजीपाला पीक पद्धती विकसित करणे, बदलत्या हवामानाविषयी संशोधन आणि त्यास अनुकूल पीक पध्दती विकसित करणे व त्यासाठी पायाभूत सोयी सुविधा निर्माण करणे | मंजूर पदे प्राधान्याने भरावीत तसेच पायाभूत सोयीसुविधांसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता |
| ६ | मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगांव, जि. सातारा | ऊस आणि ऊस आधारित पीक पध्दती | मुख्य केंद्र (ऊस विशेषज्ञ) | जैवइंधन (इथेनॉल, बायोगॅस व ग्रीन हायड्रोजन) निर्मितीसाठी ऊस, गोड ज्वारी (Sweet Sorghum), नेपिअर गवत व तत्सम पिकांवर संशोधन आणि तंत्रज्ञान विकसित करणे | जैवइंधन निर्मिती तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, अतिरिक्त तांत्रिक मनुष्यबळ व निधी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | कृषि संशोधन केंद्र, निफाड, जि. नाशिक | गहू | मुख्य केंद्र (गहू विशेषज्ञ) | गहू आधारित पीक पध्दती विकसित करणे | या ठिकाणी कार्यरत असलेल्या मनुष्यबळाचा इतर प्रकल्पांसाठी वापर करण्यासाठी विचार व्हावा. |
| ८ | तेलबिया संशोधन केंद्र, जळगाव | भुईमूग, करडई, तीळ, मोहरी, कडधान्य पिके, कोरडवाहू कापूस | मुख्य केंद्र (तेलबिया विशेषज्ञ) | हवामान अनुकूल वाण, तंत्रज्ञान व तेलबिया आधारित पीक पध्दती विकसित करणे आणि त्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे | पायाभूत सुविधांसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता |
| ९ | केळी संशोधन केंद्र, जळगाव | केळी, पपई | उप केंद्र (मुख्य केंद्रात रुपांतरीत करण्याचे प्रस्तावित) | सध्या अस्तित्वात असलेल्या जळगाव येथील उपकेंद्राचे मुख्य केंद्रात रुपांतर करावे व नवीन वाण विकसित करणे एकात्मिक कीड-रोग व अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि सिंचन व्यवस्थापन याबाब संशोधन प्रकल्प हाती घेण्यात यावे. मौजे शेलगाव (जेऊर), ता. करमाळा जि. सोलापूर येथील कोरडवाहू ज्वारी संशोधन केंद्राचे रुपांतर निर्यातक्षम केळी उत्पादन संशोधन व प्रशिक्षण केंद्रात करण्यात यावे. | मुख्य केंद्रासाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधा व अतिरिक्त निधीची तरतूद |
| १० | प्रादेशिक ऊस व गूळ संशोधन केंद्र, कोल्हापूर | ऊस, गूळ आणि गूळासाठी ऊसाचे वाण विकसित करणे | उप केंद्र | गूळ आणि गूळाचे मूल्यवर्धन संशोधन व प्रशिक्षण केंद्र | शेतकरी प्रशिक्षण केंद्रासाठी इमारत व अतिरिक्त निधीची आवश्यकता |
| ११ | प्रादेशिक गहू गेरवा (Wheat Rust)संशोधन केंद्र, महाबळेश्वर जि. सातारा | गहू, स्ट्रॉबेरी | उपकेंद्र | शीत कटीबंधीय पीके लिची, सफरचंद, पीच, पियर, प्लम, चेरी, रसबेरी, गुजबेरी, मलबेरी इत्यादी पिकांवर संशोधन करणे | तांत्रिक मनुष्यबळ व निधीची आवश्यकता |
| १२ | कृषि महाविद्यालय, पुणे | उच्च उद्यानविद्या प्रशिक्षण केंद्र, जिवाणू खते, जैविक नत्रस्थिरीकरण (BNF), जैविक कीड आणि तण नियंत्रण, अळिंबी उत्पादन, देशी गाय संशोधन व प्रशिक्षण | उपकेंद्र | उच्च उद्यानविद्या (हायड्रोपोनिक्स, ऐरोपोनिक्स व व्हर्टिकल फार्मिंग) संशोधन प्रस्तावित | उच्च तंत्रज्ञानावर आधारीत संशोधनासाठी आवश्यक सुविधा व अतिरिक्त निधीची तरतूद |
| १३ | अंजिर आणि सीताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी, जि.पुणे | अंजिर, सीताफळ | उप केंद्र | -- | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | कृषि संशोधन केंद्र, शेलगाव (जेऊर), जि. सोलापूर | ज्वारी व कोरडवाहू पीके | सदर पडताळणी केंद्राचे रुपांतर केळी संशोधन उपकेंद्रात करण्याचे प्रस्तावित | उजनी धरणाचे पाणी सिंचनासाठी उपलब्ध झाल्यामुळे संपूर्ण परिसर बागायती झाला असून केळी खालील क्षेत्रात लक्षणीय वाढ झालेली आहे. त्यामुळे या केंद्राचे निर्यातक्षम केळी उत्पादन संशोधन व प्रशिक्षण केंद्रात रुपांतर करण्यात यावे | केळी पिकाच्या निर्यातक्षम उत्पादन संशोधनासाठी आवश्यक पायाभूत सुविधा व तांत्रिक मनुष्यबळ यासाठी निधीची तरतूद |
| १५ | डाळिंब संशोधन व तंत्रज्ञान प्रसार केंद्र, लखमापूर, जि. नाशिक | डाळिंब | उपकेंद्र | -- | डाळिंब पिकाच्या संशोधनासाठी मनुष्यबळ व निधीची आवश्यकता |
| १६ | कृषि संशोधन केंद्र, कसबे डिग्रज, जि. सांगली | सोयाबीन, भुईमूग, हळद,आले,क्षारपड जमीन सुधारणा | उपकेंद्र | क्षारपड जमीन सुधारणेसाठी तंत्रज्ञान विकसित करणे | आवश्यक सोयीसुविधा, तांत्रिक मनुष्यबळ व निधीची तरतूद |
| १७ | कृषि संशोधन केंद्र, लोणावळा, जि. पुणे | भातावरील रोगप्रतिकार क्षमता तपासणे | उपकेंद्र | -- | -- |
| १८ | कृषि संशोधन केंद्र, राधानगरी, जि.कोल्हापूर | भात | उपकेंद्र | -- | -- |
| १९ | कृषि संशोधन केंद्र, वडगांव मावळ जि. पुणे | भात | उपकेंद्र | भात आधारित पीक पध्दती विकसित करणे. | -- |
| २० | कांदा व द्राक्ष संशोधन केंद्र, पिंपळगांव बसवंत, जि. नाशिक | कांदा, लसूण, द्राक्ष | उपकेंद्र | -- | -- |
| २१ | कृषि संशोधन केंद्र, मोहोळ, जि.सोलापूर | रब्बी ज्वारी | उपकेंद्र | -- | -- |
| २२ | कृषि संशोधन केंद्र, धुळे | चारापिके, बाजरी, कापूस, कडधान्य, औषधी व सुगंधी वनस्पती पिके | उपकेंद्र | -- | -- |
| २३ | कडधान्य, तेलबिया पिके संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, पंढरपूर | कडधान्ये, सूर्यफूल, करडई, भुईमूग | पडताळणी केंद्र | -- | -- |
| २४ | कृषि संशोधन केंद्र, सावळीविहीर, जि. अहमदनगर | कापूस, तेलबिया, कडधान्ये | पडताळणी केंद्र | -- | -- |
| २५ | कृषि संशोधन केंद्र, चास, जि.अहमदनगर | रब्बी ज्वारी व इतर कोरडवाहू पीके | पडताळणी केंद्र | -- | -- |
| २६ | कृषि संशोधन केंद्र, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | ज्वारी, मिरची, कडधान्ये | पडताळणी केंद्र | -- | -- |
| २७ | कृषि संशोधन केंद्र, कराड, जि. सातारा | भात, ज्वारी, भुईमूग, कडधान्ये | पडताळणी केंद्र | -- | -- |

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.**

| अ. क्र. | संशोधन केंद्र | संशोधनाची सद्यस्थिती | वर्गीकरण | प्रस्तावित सुधारणा (अतिरिक्त संशोधन कार्यक्रम) | बळकटीकरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मध्यवर्ती संशोधन केंद्र, अकोला. | कापूस, कडधान्य, तेलबिया, ज्वारी, गहू, औषधी व सुगंधी वनस्पती, फळपिके, कोरडवाहू शेती, एकात्मिक शेती पध्दती, सेंद्रिय शेती, कृषि शक्ती व अवजारे, काढणी पश्चात तंत्रज्ञान, कृषि पध्दती व पर्यावरण, भाजीपाला पीके, बियाणे तंत्रज्ञान, दीर्घकालीन खत प्रयोग, तण व्यवस्थापन | मुख्य केंद्र | हवामान अनुकूल वाण, तंत्रज्ञान व एकात्मिक पीक पध्दती विकसित करणे, काढणी पश्चात तंत्रज्ञानाचा वापर करून मूल्यसाखळी विकसित करणे. कृषि अर्थशास्त्र तसेच पणन व निर्यात यासंबंधी संशोधन हाती घेणे, त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे. ओवा, जिरे, धने या पिकांवर संशोधन सुरू करणे | पायाभूत सुविधांसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता |
| २ | विभागीय कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही, जि. चंद्रपूर | धान, तेलबिया, कडधान्य | मुख्य केंद्र | बदलत्या हवामानाविषयी संशोधन आणि त्यास अनुकूल पीक पध्दती विकसित करणे व त्यासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करणे | पायाभूत सोयी सुविधांसाठी अतिरिक्त निधीची तरतुद करणे |
| ३ | विभागीय कृषि संशोधन केंद्र, यवतमाळ | कापूस, ज्वारी, सोयाबीन, कडधान्य, तेलबिया | मुख्य केंद्र | बदलत्या हवामानाविषयी संशोधन आणि त्यास अनुकूल पीक पध्दती विकसित करणे व त्यासाठी पायाभूत | पायाभूत सोयीसुविधांसाठी अतिरिक्त निधीची तरतुद करणे |
| ३ | विभागीय कृषि संशोधन केंद्र, यवतमाळ | कापूस, ज्वारी, सोयाबीन, कडधान्य, तेलबिया | मुख्य केंद्र | बदलत्या हवामानाविषयी संशोधन आणि त्यास अनुकूल पीक पध्दती विकसित करणे व त्यासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करणे | पायाभूत सोयीसुविधांसाठी अतिरिक्त निधीची तरतुद करणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावती | सोयाबीन, ज्वारी, कडधान्ये | मुख्य केंद्र | सोयाबीन व कडधान्य आधारीत पीक पध्दती विकसित करणे व मूल्यवर्धनासाठी संशोधन करणे. सिताफळ पिकावर संशोधन सुरू करणे | पायाभूत सोयी सुविधांसाठी अतिरिक्त निधीची तरतुद करणे |
| ५ | प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, काटोल, जि. नागपूर | संत्रावर्गीय फळे, पेरु, चिकू. | मुख्य केंद्र | संत्रा पीकाचे परदेशी वाण (Exotic Germplasm) आयात करून त्यांचे अनुकूलन तपासणे व त्या आधारे नवीन वाणांचा शोध घेणे तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून संत्रा बागेचे व्यवस्थापन करणे व मूल्यवर्धन तंत्रज्ञान विकसित करणे | पायाभूत सोयी सुविधांसाठी अतिरिक्त निधीची तरतुद करणे. |
| ६ | कृषि संशोधन केंद्र, एकार्जुना, जि. चंद्रपूर | कापूस, जवस, मोहरी, रब्बी, ज्वारी, सोयाबीन | उपकेंद्र | भाजीपाला पिकांवर संशोधन सुरू करणे | पायाभूत सोयी सुविधांसाठी अतिरिक्त निधीची तरतुद करणे. |
| ७ | कृषि संशोधन केंद्र, बुलढाणा | कापूस, सोयाबीन, ज्वारी, मका, तेलबिया, भरडधान्य, कडधान्य | पडताळणी केंद्राचे उपकेंद्रात रुपांतर करणे | मका व भरड धान्य पिकांवर संशोधन सुरू करणे | मूलभूत सोयीसुविधांसाठी निधीची तरतुद तसेच तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे |
| ८ | कृषि संशोधन केंद्र, वाशिम | कडधान्ये, सोयाबीन, कापूस, गहू, ज्वारी | पडताळणी केंद्राचे उपकेंद्रात रुपांतर करणे | हळद व पपई पिकांवर संशोधन सुरू करणे | मूलभूत सोयीसुविधांसाठी निधीची आणि तांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता |
| ९ | कृषि संशोधन केंद्र, अचलपूर, जि. अमरावती | कापूस, तेलबिया, हळद, सोयाबीन | पडताळणी केंद्राचे उपकेंद्रात रुपांतर करणे | केळीचे वाढते क्षेत्र लक्षात घेता केळी पिकावर संशोधन सुरू करणे | मूलभूत सोयी सुविधांसाठी निधीची आणि तांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता |
| १० | कृषि संशोधन केंद्र, साकोली, जि. भंडारा | धान | उपकेंद्र | लाखोळी पिकावर संशोधन सुरू करणे तसेच भात आधारित पीक पध्दती विकसित करणे | -- |
| ११ | कृषि संशोधन केंद्र/ ऊस संशोधन केंद्र, थारसा, जि. नागपूर | धान, गहू, ज्वारी, जवस, ऊस | उप केंद्र | ऊस पिकावरील संशोधन करण्यासाठी सिंचन सुविधा विकसित करण्यात याव्यात | सिंचन सुविधांसाठी आवश्यक निधीची तरतूद |
| १२ | पानवेली संशोधन केंद्र, दिवठाणा, जि. अकोला | विडयाची पाने (पानवेली, पानपिंपरी) | उप केंद्र | -- | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | पानवेली संशोधन केंद्र, रामटेक, जि. नागपूर | विडयाची पाने (पानवेली) | उप केंद्र | -- | -- |
| १४ | कृषि संशोधन केंद्र, सोनापूर, जि. गडचिरोली | धान, फळे व भाजीपाला. | पडताळणी केंद्राचे उप केंद्रात रुपांतर करणे | आंबा, जांभूळ, काजू, चारोळी या पिकांवर संशोधन सुरू करणे | मूलभूत सोयी सुविधांसाठी निधीची आवश्यकता |
| १५ | कृषि संशोधन केंद्र, आमगाव (म्हाली), गोंदिया | धान, तेलबिया, कडधान्य. | पडताळणी केंद्र | -- | -- |
| १६ | कृषि संशोधन केंद्र, नवेगावबांध, जि. गोंदिया | धान, ऊस. | पडताळणी केंद्र | -- | -- |
| १७ | कृषि संशोधन केंद्र, कुटकी, जि. वर्धा | कडधान्य, तेलबिया, सोयाबीन. | पडताळणी केंद्र | -- | -- |

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी**

| अ.क्र. | संशोधन केंद्र | संशोधन केंद्राची सद्यस्थिती | वर्गीकरण | प्रस्तावित सुधारणा (अतिरिक्त संशोधन कार्यक्रम) | बळकटीकरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मध्यवर्ती परिसर, वनामकृवि, परभणी | गहू, मका, सोयाबीन, करडई, शुष्क कडधान्ये, भाजीपाला पिके, कोरडवाहू शेती, एकात्मिक शेती पध्दती, सेंद्रीय शेती, पाणी व्यवस्थापन, हवामान शास्त्र, दीर्घकालीन खत प्रयोग, जैविक खत, सामुदायिक विज्ञान, पशु शक्ती अवजारे, बिजतंत्र, काढणी पश्चात तंत्रज्ञान व अन्नप्रक्रिया, रेशीम, पेरसाळ, ऊती संवर्धन, गो पैदास, परोपजिवी किटक, पीक हवामान, वनशेती | मुख्य केंद्र | हवामान अनुकूल वाण, तंत्रज्ञान व एकात्मिक पीक पध्दती विकसित करणे, काढणी पश्चात तंत्रज्ञानाचा वापर करून मूल्यसाखळी विकसित करणे. कृषि अर्थशास्त्र तसेच पणन व निर्यात यासंबंधी संशोधन हाती घेणे, त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे. खजूर, ड्रॅगन फ्रुट व तत्सम अपारंपारिक पिकांवर संशोधन सुरू करणे | पायाभूत सुविधांसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता |
| २ | कापूस संशोधन केंद्र, नांदेड | कापूस | मुख्य केंद्र (कापूस विशेषज्ञ) | -- | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | ज्वार संशोधन केंद्र, परभणी | ज्वारी | मुख्य केंद्र (भरडधान्य विशेषज्ञ) | -- | -- |
| ४ | कृषि संशोधन केंद्र, बदनापूर, जि. जालना | कडधान्य पिके | मुख्य केंद्र | -- | -- |
| ५ | मोसंबी संशोधन केंद्र, बदनापूर, जि. जालना | मोसंबी | मुख्य केंद्र | -- | -- |
| ६ | फळ संशोधन केंद्र, हिमायतबाग, जि. छत्रपती संभाजीनगर | आंबा, चिंच, चिकू, संत्रा, मोसंबी | मुख्य केंद्र | अंजीर व पेरू या फळ पिकांवर संशोधन सुरू करणे | -- |
| ७ | राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प (NARP), छत्रपती संभाजीनगर | बाजरी व इतर पिके | मुख्य केंद्र (सदर संशोधन केंद्राचे नामाभिधान विभागीय कृषि संशोधन केंद्र, मध्य महाराष्ट्र पठारी प्रदेश) असे करण्यात यावे | बदलत्या हवामानाविषयी संशोधन आणि त्यास अनुकूल पीक पध्दती विकसित करणे व त्यासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करणे | पायाभूत सोयीसुविधांसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता |
| ८ | गळीतधान्ये संशोधन केंद्र, लातूर | सूर्यफूल, भुईमूग, जवस | मुख्य केंद्र | -- | -- |
| ९ | मका संशोधन केंद्र, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर | मका | मुख्य केंद्र | मका पिकाचे सुधारीत वाण व पीक पध्दती विकसित आणि मूल्यवर्धन करणे | मूलभूत सुविधांसाठी निधीची तरतूद करणे |
| १० | कृषि संशोधन केंद्र, तुळजापूर, जि. धाराशिव | पेरसाळ | उपकेंद्र | हवामान बदलाचा विचार करता पेरसाळ ऐवजी भरडधान्ये, कडधान्ये, भाजीपाला व फुलशेती आधारीत पीक पध्दती विकसित करणे | तांत्रिक मनुष्यबळ व मूलभूत सुविधांसाठी निधीची आवश्यकता |
| ११ | सीताफळ संशोधन केंद्र, अंबाजोगाई, जि. बीड | सीताफळ | उपकेंद्र | सिताफळ पिकाचे वाण विकसित करणे व मूल्यवर्धन शीतसाखळी विकसित करणे. | मूल्यवर्धन शीतसाखळी विकसित करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा व तांत्रिक मनुष्यबळासाठी निधीची तरतूद |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | केळी संशोधन केंद्र, नांदेड | केळी | उप केंद्र | निर्यातक्षम केळी उत्पादन तंत्रज्ञान विकसित करणे | निर्यातक्षम केळी उत्पादन तंत्रज्ञानासाठी आवश्यक मूलभूत सुविधांसाठी निधीची आवश्यकता |
| १३ | कापूस संशोधन केंद्र, मेहबूब बाग, जि. परभणी | देशी कापूस | उपकेंद्र | देशी कापसात जैव तंत्रज्ञानाचा वापर करून सुधारित वाण विकसित करणे. | जैव तंत्रज्ञान संशोधनासाठी निधीची तरतूद |
| १४ | बाजरा संशोधन केंद्र, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर | बाजरी, मका | उपकेंद्र | -- | -- |
| १५ | प्रादेशिक ऊस संशोधन केंद्र, वसमत, जि. हिंगोली | ऊस | उपकेंद्र | हवामान अनुकूल ऊसाच्या वाणांची पडताळणी करणे तसेच ऊस आधारीत पीक पध्दती विकसित करणे | तांत्रिक मनुष्यबळ व मूलभूत सुविधांसाठी निधीची आवश्यकता |
| १६ | सोयाबीन संशोधन, प्रशिक्षण व प्रक्रिया उपकेंद्र, धर्मापुरी, परळी वैजनाथ, जि. बीड | सोयाबीन | उपकेंद्र | सोयाबीन पिकाचे सुधारीत वाणांची पडताळणी, पीक पध्दती विकसित करणे आणि मूल्यवर्धन तसेच प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे | मूलभूत सुविधांसाठी निधीची तरतूद करणे |
| १७ | गळीतधान्ये संशोधन उपकेंद्र, अंबाजोगाई, जि. बीड. | तेलबिया पिके | पडताळणी केंद्र | -- | -- |
| १८ | कृषि संशोधन केंद्र, सोमनाथपूर, उदगीर, जि. लातूर | ज्वारी, बाजरी, कापूस, तूर, मूग, उडीद, सोयाबीन गहू, हरभरा व करडई | पडताळणी केंद्र | -- | -- |

## डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

| अ. क्र. | संशोधन केंद्र | संशोधन केंद्राची सद्यस्थिती | वर्गीकरण | प्रस्तावित सुधारणा (अतिरिक्त संशोधन कार्यक्रम) | बळकटीकरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मध्यवर्ती परिसर, दापोली/ वाकवली , जि. रत्नागिरी | मसाला पिके, कंदपिके, भात, आंबा, काजू, चिकू परदेशी व दुय्यम फळपिके, भाजीपाला पिके, कृषि वानिकी व सिंचन व्यवस्थापन | मुख्य केंद्र | हवामान अनुकूल वाण, तंत्रज्ञान व एकात्मिक पीक पध्दती विकसित करणे, काढणी पश्चात तंत्रज्ञानाचा वापर करून मूल्यसाखळी विकसित करणे. कृषि अर्थशास्त्र तसेच पणन व निर्यात यासंबंधी संशोधन हाती घेणे, त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे. तसेच, रान भाज्या (मायाळू, भारंगी, करटोली), मका, नेपियर, पॅराग्रास इत्यादी चारापिकांवर आणि त्याचबरोबर अननस व तत्सम फळ पिकावर संशोधन सुरु करणे | पायाभूत सुविधांसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता |
| २ | खार जमीन संशोधन केंद्र, पनवेल, जि. रायगड | भात, मत्स्य संवर्धन, खार जमीन सुधारणा, भाजीपाला | मुख्य केंद्र | व्हर्टीकल फार्मिंग, भात, मत्स्य, खार जमीनीवर संशोधन करणे | मूलभूत सोयीसुविधांसाठी तसेच तांत्रिक मनुष्यबळासाठी निधीची आवश्यकता |
| ३ | प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड | भात | मुख्य केंद्र | भात आधारित पीक पद्धती विकसित करणे | -- |
| ४ | प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग | आंबा, काजू, पेरु, आवळा, जांभूळ, कोकम, फणस, लिंबू | मुख्य केंद्र | हापूस आंब्यातील साका (Spongy tissue) व काजू मधील पिठया ढेकूण या समस्यांवर सखोल संशोधन करणे | -- |
| ५ | कृषि संशोधन केंद्र, पालघर | भात, गवत, चिकू, भाजीपाला (मिरची) | उपकेंद्र | चिकू पिकाच्या संशोधनावर अधिक भर देणे. ताडगोळे या फळपीकवर संशोधन हाती घेणे | -- |
| ६ | सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन, जि. रायगड | सुपारी | उपकेंद्र | -- | -- |
| ७ | आंबा संशोधन उपकेंद्र, गिर्ये (रामेश्वर), जि.सिंधुदुर्ग | आंबा | उपकेंद्र | -- | -- |
| ८ | कृषि संशोधन केंद्र, शिरगांव, जि. रत्नागिरी | भात, भुईमूग | उपकेंद्र | -- | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र, भाटये, जि.रत्नागिरी | नारळ, मसाला पिके | उपकेंद्र | -- | -- |
| १० | कृषि संशोधन केंद्र, फोंडाघाट, जि. सिंधुदुर्ग | भात, नागली, चवळी, मूग | उपकेंद्र | भरडधान्य संशोधन सुरु करणे | अतिरिक्त निधीची तरतूद |
| ११ | सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, झाडगांव, पेठकिल्ला जि. रत्नागिरी | गोडया व निम खाऱ्या आणि सागरी पाण्यातील मत्स्य संवर्धन | उपकेंद्र | -- | -- |
| १२ | कृषि संशोधन केंद्र, मुळदे कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | तेलताड, मत्स्य | उपकेंद्र | रंगीत मासे संदर्भात संशोधन करणे | अतिरिक्त निधीची तरतूद |
| १३ | कृषि संशोधन केंद्र, आवाशी, ता. खेड, जि. रत्नागिरी | आवळा, चिकू, भाजीपाला | पडताळणी केंद्राचे उपकेंद्रात रुपांतर करणे | केळी पिकावर संशोधन सुरु करणे. | अतिरिक्त निधीची तरतूद |
| १४ | कृषि संशोधन केंद्र, रेपोली, ता. माणगांव, जि. रायगड | भात, वाल, मूग, चवळी, भाजीपाला | पडताळणी केंद्र | -- | -- |
| १५ | तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, बांद्रा, मुंबई. | शोभीवंत मासे, उत्तर कोकण विभाग, सागरी मत्स्य संपदा | पडताळणी केंद्र | -- | -- |

### ३.१.२ नवीन संशोधन केंद्रांची स्थापना

राज्यातील कृषि क्षेत्राची कालानुरुप गरज विचारात घेवून कृषि विद्यापीठांमध्ये खालीलप्रमाणे नवीन संशोधन केंद्र प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | विषय | संशोधन केंद्राचे ठिकाण | विद्यापीठ | संशोधन केंद्राची कार्यकक्षा / आवश्यकता |
|---|---|---|---|---|
| १. | कृषि हवामान अनुकूल तंत्रज्ञान संशोधन केंद्र | राहुरी, अकोला, परभणी, दापोली | चारही कृषि विद्यापीठे | राज्यामध्ये अलिकडच्या काळात हंगामनिहाय वातावरणात बदल आढळून येत आहेत. परिणामी पिकांवर जैविक व अजैविक ताण पडत असून त्याचे पीक उत्पादकतेवर आणि उत्पादन स्थिरतेवर विपरित परिणाम होत आहेत. त्यामुळे सर्वच पिकांच्या बाबतीत जोखीम व्यवस्थापन तंत्रज्ञान विकसित करण्याची गरज आहे. सध्या राज्यातील सर्व महसूल मंडळामध्ये स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. या केंद्रातील विविध हवामान विषयक घटकांच्या माहितीचे विश्लेषण करुन त्याआधारे शेतक-यांना मार्गदर्शक संदेश पाठविणे तसेच पीक विमा योजनाविषयक धोरण ठरविण्यासाठी शासनास सहाय्य करणे यासाठी विद्यापीठनिहाय स्वतंत्र |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | संशोधन केंद्राची आवश्यकता आहे. विविध कृषि हवामान विभागांच्या हवामानात होणारे बदल, त्यांचे पिकांवर होणारे परिणाम यांचा अभ्यास करून पीक नुकसानीची जोखीम कमी करण्याविषयी तंत्रज्ञान व पीक पध्दती विकसित करणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यापीठात कार्यरत असलेल्या सर्व पीक सुधार संशोधन प्रकल्पांबरोबर विद्यापीठातील कृषि हवामान शास्त्र विभागाने समन्वय साधून हवामान अनुकूल तंत्रज्ञान विकसित करणे गरजेचे आहे. |
| २ | काटेकोर शेती उत्कृष्टता संशोधन केंद्र (Center of Excellence for Research on Precision Farming) | राहुरी, अकोला, परभणी, दापोली | चारही कृषि विद्यापीठे | यांत्रिकीकरण, स्वयंचलन (Automation) अंकरुपण (Digitisation), आंतरजाल (Internet of Things), कृत्रिम बुद्धीमत्ता, ड्रोन तंत्रज्ञान, यंत्र मानव, इत्यादी अत्याधुनिक तंत्रज्ञानांचा अवलंब करुन कृषि उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या निविष्ठांचा इष्टतम वापर करणे, उत्पादन खर्च कमी करणे, गुणवत्तापूर्ण उत्पादकता वाढविणे आणि ग्राहकांच्या बदलत्या गरजा विचारात घेता मुल्यवर्धन साखळी विकसित करण्यासाठी कृषि विद्यापीठनिहाय काटेकोर शेती उत्कृष्टता संशोधन केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. |
| ३ | जैव वस्तुमान (Biomass) उत्पादन व जैव इंधन (Biofuel) तंत्रज्ञान संशोधन व विकास केंद्र | परभणी, राहुरी, अकोला, दापोली | चारही कृषि विद्यापीठे | आपला देश ८५ टक्के जीवाश्म इंधन (Fossil fuel) आयात करतो. हरित व जैव इंधन यासारख्या नवीनीकरणीय इंधनावर यथायोग्य संशोधन व विकास करुन तेल/नैसर्गिक वायू आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यास महाराष्ट्र राज्याच्या कृषि क्षेत्रात फार मोठा वाव आहे. त्यानुषंगाने ऊस, नेपियर गवत, गोड ज्वारी, मका इत्यादी भरपूर जैवभार असणाऱ्या पिकांचे उत्पादन व जैवइंधन निर्मितीचे तंत्रज्ञान विकसीत करण्याच्या अनुषंगाने विद्यापीठनिहाय जैवभार उत्पादन व जैव इंधन तंत्रज्ञान संशोधन व विकास केंद्र स्थापन झाल्यास शेतक-यांसाठी शाश्वत उत्पन्नाचे साधन उपलब्ध होऊ शकेल. |
| ४ | चारा पिके संशोधन केंद्र | राहुरी, अकोला, परभणी, दापोली | चारही कृषि विद्यापीठे | शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी पुरक व्यवसाय म्हणून पशुधनाचे अनन्य साधारण महत्व आहे. पशुपालनासाठी चाऱ्याची गरज आहे. पशुधनाच्या चाऱ्याचे संवर्धन व संशोधन करणे अत्यंत महत्वाचे आहे. यासाठी विविध चारा पिकांवर संशोधन करुन हवामान अनुकूल वाण व पीक पद्धती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | विकसीत करणे तसेच, त्याचा शेतकऱ्यांपर्यंत विस्तार करणे यासाठी राहुरी येथील संशोधन केंद्राचे बळकटीकरण आणि परभणी, अकोला व दापोली येथे नवीन संशोधन केंद्र प्रस्तावित करण्यात येत आहेत. |
| ५ | उच्च तंत्रज्ञानयुक्त भाजीपाला संशोधन व प्रशिक्षण केंद्र | पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर, दापोली | चारही कृषि विद्यापीठे | भाजीपाला पिकामध्ये अधिक उत्पादकता, रोग व किडीस प्रतिकारक्षमता आणि साठवणूक व प्रक्रियेसाठी सुयोग्य असे सुधारित वाण विकसित करणे तसेच, हायड्रोपोनिक्स, एरोपोनिक्स, व्हर्टीकल फार्मिंग, ॲक्वापोनीक्स, प्लान्टस्केपर्स, मॉडयूलर फार्म, क्युबिक फार्मिंग सिस्टम यासारख्या विविध तंत्रज्ञानांचा वापर करुन भाजीपाला उत्पादन करणे. यासाठी कृषि विद्यापीठनिहाय उच्च तंत्रज्ञानयुक्त भाजीपाला संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. |
| ६ | खारपाणपट्टा क्षेत्रातील समस्यायुक्त चोपण जमीन संशोधन केंद्र | विद्यापीठ अंतर्गत खारपाण पट्यातील योग्य त्या ठिकाणी | डॉ. पंदेकृवि, अकोला | डॉ. पंदेकृवि च्या कार्यक्षेत्रात पूर्णा नदीच्या खोऱ्यामध्ये अकोला, अमरावती व बुलडाणा जिल्हयातील अंदाजे ४.५ लाख हेक्टर क्षेत्र खारपाण पट्टयाचे आहे. या क्षेत्रातील जमिनी खोल काळया आणि उपजाऊ आहेत. परंतु, सदर क्षेत्रामध्ये नैसर्गिक क्षारता असल्यामुळे जमिनी चोपण स्वरुपाच्या आहेत. या जमिनीतून निचरा होत नसल्यामुळे पिकाच्या उत्पादकतेवर विपरीत परिणाम होतो. खारपाण पट्टयातील जमिनींची सुधारणा करण्यासाठी कृषि विद्यापीठांमार्फत संशोधन हाती घेण्यात यावे अशी लोकप्रतिनिधींकडून सातत्याने मागणी होत आहे. त्यानुषंगाने संशोधन केंद्र प्रस्तावित करण्यात येत आहे. |
| ७ | परदेशी व दुय्यम फळपिके संशोधन केंद्र | वाकवली | डॉ. बासाकोकृवि, दापोली | ॲव्होकॅडो, रंबुतान, लोंगान व तत्सम परदेशी फळपिके आणि फणस, कोकम, करवंद, जांभूळ, आवळा इत्यादी पिकांखालील क्षेत्रात वाढ होत आहे. तसेच, त्यांची मागणी वाढत आहे. तथापि, त्यावर अपेक्षित संशोधन झालेले नाही. त्यामुळे नवीन संशोधन केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. |

## ३.२ कृषि संशोधन व विकासाची भावी दिशा

१. हरितक्रांतीच्या दरम्यान आणि त्यानंतरच्या ५० वर्षांत कृषि संशोधनाची दिशा प्रामुख्याने उत्पादन वाढ केंद्रीत होती. ती आता बदलण्याची वेळ आलेली आहे. याची दोन मुख्य कारणे आहेत ती म्हणजे कृषि उत्पादनात भरीव वाढ झाली आहे, परंतु त्याबरोबरच उत्पादन खर्चातही भरमसाठ वाढ झाली आहे. त्यामुळे वैयक्तिक शेतकऱ्यांच्या निव्वळ उत्पन्नात वाढ झाली नाही, शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्येस प्रवृत्त होऊ लागले आहेत. दुसरे कारण म्हणजे अधिक उत्पादनासाठी मोठया प्रमाणावर रसायनांचा वापर झाल्याने पर्यावरणास हानी पोहोचली आणि अन्नाची प्रत देखील खालावली आहे.

२. याचबरोबर जागतिक तापमान वाढीमुळे हवामानात बदल होऊन दुष्काळ, अतिवृष्टी, पावसाचा दीर्घ खंड, गारपीट, अवेळी पडणारा पाऊस, तापमान आणि आर्द्रतेतील चढ-उतार यासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. हे सर्व टाळण्यासाठी राज्यातील कृषि संशोधनाची दिशा बदलण्याची गरज आहे.

### अ) अल्पकालीन उपाययोजना

१. राज्यात आजपर्यंत अनेक वाण प्रसारित करण्यात आलेले आहेत. पीक पैदासकारांनी यातील त्यांच्या पिकांतील सर्व कालीन १५ उत्कृष्ट वाण निवडावेत आणि त्यांच्या ते पीक जेथे घेतले जाते अशा सर्व हवामान विभागात लवकर, योग्य वेळी आणि उशिरा पेरणीसाठी चाचण्या घ्याव्यात.

२. या सर्व वाणांची महत्वाच्या रोग आणि किडी विषयक प्रतिकार क्षमता तपासून पाहावी हे काम संबंधित वनस्पती रोग आणि किटकशास्त्रज्ञांनी योग्य ते तंत्रज्ञान/सुविधा (Controlled conditions) वापरुन करावे.

३. शक्यतो पीक शरीरक्रिया शास्त्रज्ञांमार्फत या वाणांची महत्वाच्या अजैविक ताण उदा. पाण्याचा ताण, पिकांत साचलेले पाणी किंवा गरजेपेक्षा जास्त ओलावा, गारपीट, कमी आणि जास्त तापमान, काढणीस उशीर झाल्यास पीक लोळणे, शेंगा तडकणे, किंवा दाणे गळणे (Shattering of pods) इत्यादीसाठी प्रतिकार क्षमता तपासावी.

४. जैविक आणि अजैविक ताणास जास्तीत-जास्त प्रतिकारक्षम, बदलत्या हवामानात स्थिर उत्पादकता आणि अधिक उत्पादन क्षमता असणाऱ्या वाणांची शिफारस करावी.

५. कृषि विद्यापीठांनी शिफारस केलेल्या हवामान अनुकूल वाणांना कृषि विभागाने बियाणे साखळीत प्राधान्य देऊन दरवर्षी सर्वसाधारणपणे २५ ते ३० टक्के क्षेत्रास पुरेसे नव्याने शिफारस केलेल्या वाणांचे बियाणे तयार करावे. रोग व किडीस तसेच अजैविक ताणास बळी पडणारे वाण बियाणे साखळीतून वगळण्यात यावेत. हा निकष बियाणे महामंडळ आणि खाजगी बियाणे उत्पादक कंपन्यांना देखील लागू करावा.

### ब) दीर्घकालीन उपाययोजना

१. सर्व पीक पैदासकारांनी जैविक व अजैविक ताणास बळी पडणारे, अधिक उत्पादन देणारे वाण विकसीत करु नयेत, त्याऐवजी महत्वाच्या जैविक व अजैविक ताणास प्रतिकारक्षम आणि विविध हवामानात व हंगामात स्थिर उत्पादन देणारे वाण विकसित करावेत.

२. उच्च दर्जाचे पौष्टिक गुणधर्म असणारे, जास्तीत-जास्त टिकवण क्षमता असणारे आणि प्रक्रियेस योग्य असेच फळांचे आणि भाजीपाल्यांचे वाण विकसित करावेत.

३. रासायनिक निविष्ठांचा वापर न करता उपलब्ध जैविक निविष्ठांना जास्तीत-जास्त प्रतिसाद देणारे सेंद्रीय व नैसर्गिक शेतीस योग्य वाण विकसित आणि प्रसारित करावेत.

४. पीक पध्दतीत विविध पिकांचा समावेश करुन हवामानास अनुकूल आणि पर्जन्य आधारीत / संरक्षित सिंचनावर कमीत-कमी जोखीम असणाऱ्या आणि जास्तीत-जास्त आर्थिक उत्पन्न देणाऱ्या एकात्मिक शेती पद्धती / पीक पद्धती विकसित कराव्यात.

५. मृदशास्त्रज्ञांनी सेंद्रीय कर्ब वाढवून जमिनीची सुपीकता सुधार व संवर्धन यावर संशोधन केंद्रीत करण्याची गरज आहे. रासायनिक खतांचा वापर कमीत-कमी करुन उत्पादनात वाढ कशी करता येईल, याविषयी कृषिविद्यावेत्ता आणि उद्यानविद्यावेत्ता यांनी विचारपूर्वक संशोधन हाती घ्यावे.

६. जमिनीतील उपयुक्त सूक्ष्म जीवाणूंवर सखोल संशोधनाची गरज आहे. रसायनांच्या वापरामुळे त्यांच्यावर होणारे दुष्परिणाम टाळणे आवश्यक आहे.

७. जैविक रोग व किटकनाशकांचा आणि मित्रकिडींचा शोध घेऊन त्यांचे उत्पादन वाढवून शेतक-यांना योग्यवेळी उपलब्ध करुन द्यावेत.

८. रसायन अवशेषमुक्त फळे व भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देण्यात यावा.

९. उत्पादन खर्च कमी करण्यासाठी कृषि अभियंत्यांनी आवश्यकतेनुसार अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना परवडतील आणि वापरता येतील अशी यंत्रे व अवजारे विकसित करावीत.

१०. कृषिविद्यावेत्ता आणि उद्यानविद्यावेत्ता यांनी पूर्व मशागत, पीक लागवड, आंतरमशागत, पीक संरक्षण, पीक काढणी व काढणी पश्चात प्राथमिक प्रक्रिया पर्यंतची सर्व कामे मशीनद्वारे करण्याचे तंत्रज्ञान विकसित करावे आणि त्यानुषंगाने कृषि अभियंत्यांनी कृषिविद्यावेत्ता व उद्यानविद्यावेत्ता यांच्या समन्वयाने पूर्व मशागत ते प्रक्रिया या शृंखलेतील सर्व स्तरावरील यांत्रिकीकरणासाठी आवश्यक यंत्रे व अवजारे विकसित करावीत.

११. पीक काढणी पश्चात शेतकरी ते ग्राहक अशी कृषिमूल्यवर्धन साखळी तंत्रज्ञान विकसित करण्यावर अधिक भर देण्याची गरज आहे.

१२. कृषि अर्थशास्त्रज्ञांनी कृषि शास्त्रज्ञांनी विकसित केलेल्या सर्व तंत्रज्ञानाची आर्थिक व्यवहार्यता तपासून पाहावी आणि विकसित केलेले तंत्रज्ञान वापरणे आर्थिकदृष्ट्या वर्धनक्षम असेल तरच ते तंत्रज्ञान प्रसारित करावे.

१३. कृषि अर्थशास्त्र विभाग आणि कृषि विस्तार शिक्षण विभाग यांनी कृषि विद्यापीठांमार्फत प्रसारीत करण्यात आलेल्या संशोधन व तंत्रज्ञानाचे नियतकालीन मूल्यमापन करुन सामाजिक-आर्थिक परिणामकारकता तपासण्यात यावी.

१४. उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करत असताना कृषि शिक्षण व संशोधनात उपयोजित (Applied) संशोधनावर भर देण्यात आला. परंतु, मूलभूत संशोधनाकडे दुर्लक्ष झाले. दीर्घकालीन उपयुक्त संशोधनासाठी मूलभूत शास्त्र जसे की, मॉलिक्यूलर बॉयोलॉजी आणि जेनेटिक इंजिनिअरींग, सूक्ष्म जीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान, वनस्पती शरीरक्रियाशास्त्र, बीजशास्त्र, सूत्रकृमी शास्त्र, कृषि हवामानशास्त्र या विषयांचे वेगळे पदव्युत्तर विभाग सुरु करुन त्या विषयांतील संशोधनाला प्राधान्य देण्यात यावे.

### ३.३ कृषि विद्यापीठांना संशोधन व विकास विषयक मार्गदर्शक सूचना

१. सद्यस्थितीत कृषि विद्यापीठांमध्ये विविधांगी संशोधन होत असते. तथापि, या सर्वच संशोधनाचे रुपांतर तंत्रज्ञान विकासात आणि विकसित तंत्रज्ञानाचे व्यवसायीकरण (Commercialisation) होतेच असे नाही. त्यामुळे झालेल्या सर्व संशोधनाचा पूर्णपणे व्यवहारात वापर होत नाही. यासाठी कृषि संशोधनाची व्याप्ती वाढवून झालेल्या संशोधनाचा प्रत्यक्ष वापर शेतकरी, उद्योजक व व्यावसायिक करू शकतील अशा तंत्रज्ञानात विकसित करण्याच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावर Incubation Centre सारख्या सुविधा उपलब्ध कराव्यात आणि खाजगी उद्योजक / व्यावसायिक यांच्या समन्वयाने संशोधनाचे उपयोजन व्यवहार्य तंत्रज्ञानात करण्यात यावे. कृषि विद्यापीठातील संशोधन संचालनालयाचे नामकरण संशोधन व विकास संचालनालय असे करण्यात यावे.

२. कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांना आंतरराष्ट्रीय संशोधनाचा अनुभव घेण्यासाठी उद्युक्त करावे. तसेच, शास्त्रज्ञांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन शिष्यवृत्तीसाठी प्रयत्न करावेत.

३. संशोधन लेखाबरोबरच शास्त्रज्ञांनी विकसित केलेले वाण, यंत्रे, औजारे यासारख्या नाविन्यपूर्ण शिफारशींना त्यांच्या बढती / निवडीमध्ये पुरेसे गुणांकन देण्यात यावे.

४. संशोधन ही दीर्घकालीन व निरंतर चालणारी प्रक्रिया असल्याने संशोधन केंद्रावरील शास्त्रज्ञांच्या विशिष्ट कारणाशिवाय किंवा वारंवार बदल्या करू नयेत.

५. प्रत्येक शास्त्रज्ञ / प्राध्यापकाला बाहय संस्था सहाय्यित प्रकल्प प्राप्त करून घेण्यासाठी प्रोत्साहीत करावे.

६. प्रत्येक विद्यापीठात भाजीपाला पिकांचे प्रतिकारक्षम, लवकर पक्वता, उच्च पोषणमूल्य, ग्राहकाची आवड, टिकवण क्षमता, प्रक्रियाक्षम इत्यादी गुणधर्म असलेले वाण विकसित करण्याविषयी संशोधन प्रकल्प हाती घेण्यात यावेत.

७. सर्व पिकांमध्ये जैविक व अजैविक ताणास प्रतिकारक्षम वाण विकसित करण्यास प्राधान्य देण्यात यावे.

८. राज्यातील पर्जन्याधारीत व कोरडवाहू शेती क्षेत्रासाठी हवामान अनुकूल तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देण्यात यावा.
९. निविष्ठांचा कार्यक्षम वापर करून पीक उत्पादन खर्च कमी करणे, पिकांची उत्पादकता व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे यासाठी आगामी काळात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून जीपीएस, सेन्सर, कृत्रिम बुध्दिमत्ता, यंत्र मानव, ड्रोन यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे सिंचन व्यवस्थापन, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन व पीक संरक्षण व्यवस्थापन यासाठी मोबाईल ॲप्स् विकसित करावेत.
१०. राज्यात कृषि हवामान विभागनिहाय एकात्मिक शेती पध्दती तंत्रज्ञान विकसित करावे.
११. राज्यातील धानाच्या क्षेत्रामध्ये शून्य मशागतीय संवर्धित शेती पध्दतीचा विकास करावा.
१२. शेतीतील समस्या आणि सामाजिक गरजावर आधारित व लक्ष्याभिमुख नवीन संशोधनावर अधिक भर द्यावा. विद्यापीठांमध्ये योग्य तो समन्वय साधून संशोधनाची पुनरावृत्ती (Duplication) टाळावी.
१३. पीक सुधारणेमध्ये जैव तंत्रज्ञान आणि / किंवा डशिशव ङीशशवळपस पध्दतीचा योग्य वापर करून नवीन वाण विकसित करण्याचा कालावधी कमी करावा.
१४. सातत्याने बदलणाऱ्या हवामानास सामोरे जाण्यासाठी वनस्पती पैदासकारांनी वेगवेगळया हवामानातील तीव्र घटकांमुळे बाधित झालेल्या क्षेत्रांचे सर्वेक्षण करून अशा वातावरणास सहनशील असणाऱ्या झाडांची किंवा वाणांची निवड करावी आणि त्यांचा नवीन वाण विकसित करण्यासाठी वापर करावा.
१५. कोकण व पूर्व विदर्भात धानाच्या संशोधनामध्ये नवीन वाणाच्या निर्मितीबरोबरच पीक पध्दती विकसित करण्यावर व यांत्रिकीकरणावर भर देण्याची गरज आहे.
१६. भाजीपाल्याचे बियाणे अतिशय उच्च मूल्याचे असल्यामुळे या पिकांचे सुधारीत व संकरीत वाण विकसित करून त्यांचे बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे.
१७. केंद्र / राज्य शासन पुरस्कृत विविध योजनांमध्ये दहा वर्षापेक्षा जास्त जुन्या वाणांना अनुदान अनुज्ञेय नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी स्विकारलेले व स्थिर उत्पादन देणारे वाण शेतकऱ्यांना उपलब्ध होत नाहीत. शासनाच्या या धोरणाचा पुनर्विचार व्हावा यासाठी कृषि विद्यापीठांनी योग्य त्या समर्थनासह शासनास प्रस्ताव पाठवावा.
१८. चारा पिकाचे वाण विकसित करणे व चारा पिकाबाबत इतर संशोधनाला बळकटी देण्याची गरज आहे.
१९. पीक संरक्षण हे सेंद्रिय शेतीमध्ये उत्पादन वाढीचा महत्वाचा घटक आहे. यासाठी कृषि विद्यापीठांने जैविक कीटकनाशके उत्पादित करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात यावीत.
२०. चारही कृषि विद्यापीठांतील सर्व पीक पैदासकारांनी ते संशोधन करत असलेल्या पिकांचा वाण संग्रह (Germplasam) जतन करणे व त्यात सातत्यपूर्ण वाढ करत राहणे आवश्यक आहे. तसेच उपलब्ध वाण संग्रहाचे मूल्यमापन, शुध्दीकरण आणि वैशिष्टीकरण / गुणवर्णन करून त्यांच्या नोंदीची सूची तयार करावी.

## ३.४. राज्य शासनास संशोधन व विकास विषयक शिफारशी

१. हवामान बदल आणि राज्यातील कृषि क्षेत्राची तीव्र निकड विचारात घेवून सर्व कृषि विद्यापीठांमध्ये पुढीलप्रमाणे नवीन संशोधन केंद्र स्थापन करण्यात यावीत.
१. कृषि हवामान अनुकूल तंत्रज्ञान संशोधन केंद्र,
२. काटेकोर शेती उत्कृष्टता संशोधन केंद्र (Center of Excellence for Research on Precision Farming),
३. जैव वस्तूमान (Biomass) उत्पादन व जैव इंधन (Biofuel) तंत्रज्ञान संशोधन व विकास केंद्र,
४. चारा पिके संशोधन केंद्र,
५. उच्च तंत्रज्ञानयुक्त भाजीपाला संशोधन व प्रशिक्षण केंद्र.
२. डॉ. पंदेकृवि च्या कार्यक्षेत्रात पूर्णा नदीच्या खोऱ्यामध्ये अकोला, अमरावती व बुलडाणा जिल्हयातील अंदाजे ४.५ लाख हेक्टर क्षेत्र खारपाण पट्टयाचे आहे. या जमिनींची सुधारणा करणे व त्यास अनुकूल अशा पीक पध्दती विकसित करण्यासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत योग्य त्या ठिकाणी संशोधन केंद्र सुरू करण्यात यावे.
३. कोकण विभागात ॲव्होकॅडो, रंबुतान, लोंगान व तत्सम परदेशी फळपिके आणि फणस, कोकम, करवंद, जांभूळ, आवळा इत्यादी पिकांखालील क्षेत्रात वाढ होत आहे. या सर्व पिकांवर संशोधन करण्यासाठी डॉ. बाळासाहेब सावंत

कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत वाकवली, जि. रत्नागिरी येथे संशोधन प्रकल्प हाती घेण्यात यावेत. त्यासाठी पायाभुत सुविधा व मनुष्यबळ आणि निधी विद्यापीठास उपलब्ध करून द्यावा.

४. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कार्यरत केळी संशोधन केंद्र, जळगाव या उप केंद्राचे रुपांतर मुख्य केंद्रात करण्यात यावे. तसेच मौजे शेलगाव (जेऊर), ता. करमाळा जि. सोलापूर येथे निर्यातक्षम केळी उत्पादन संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावे.

५. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषि संशोधन केंद्र, बुलढाणा, वाशिम व अचलपूर, जि. अमरावती येथे सध्या कार्यरत असलेल्या पडताळणी केंद्राचे बळकटीकरण करून त्यांचे रुपांतर अनुक्रमे मका व भरड धान्य, हळद व पपई आणि केळी संशोधन केंद्रात करण्यात यावे.

६. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प (NARP), छत्रपती संभाजीनगर या मुख्य केंद्राचे नामाभिधान विभागीय कृषि संशोधन केंद्र, मध्य महाराष्ट्र पठारी प्रदेश असे करण्यात यावे.

७. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषि संशोधन केंद्र, तुळजापूर, जि. धाराशिव येथील पेरसाळ संशोधन पडताळणी केंद्राचे बळकटीकरण करून त्याचे रुपांतर भरडधान्य, भाजीपाला व फुलपिके संशोधन केंद्रात करण्यात यावे.

८. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत कृषि संशोधन केंद्र, फोंडाघाट, जि. सिंधुदुर्ग या उपकेंद्रात भरडधान्य संशोधन केंद्र सुरु करण्यात यावे.

९. प्रत्येक कृषि विद्यापीठात स्थानिक गरजेनुसार संशोधन प्रकल्प हाती घेण्यासाठी दरवर्षी राज्याच्या अर्थसंकल्पात किमान १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी व सदरचा निधी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेकडे ठेवण्यात यावा आणि कृषि विद्यापीठांकडून येणाऱ्या नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्पांसाठी हा निधी कृषि परिषदेने विद्यापीठांना उपलब्ध करुन द्यावा.

# ४. कृषि विस्तार शिक्षण

**कार्यकक्षा :** कृषि विद्यापीठांतर्गत चालू असलेल्या विस्तार शिक्षण कार्यक्रमांचा राज्याच्या कृषि विभागाच्या कृषि विस्तार योजनांशी पूर्वीच्या प्रशिक्षण व भेट योजनेप्रमाणे सांगड घालून आणि समन्वय व सहकार्य वाढवून अद्यावत तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषि विस्तार यंत्रणा सक्षम व परिणामकारक करण्यासाठी उपाय सुचविणे.

शासनाने निश्चित केलेल्या कार्यकक्षेनुसार अभ्यासगटामार्फत विस्तार शिक्षण विषयाबाबत सविस्तर माहिती संकलित करून अभ्यास करण्यासाठी डॉ. संजय भावे, कुलगुरू, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे उपसमिती स्थापन करण्यात आली.

| अ.क्र. | उपसमिती | पदनाम |
|---|---|---|
| १. | डॉ. संजय भावे, कुलगुरु, डॉ. बासाकोकृवि, दापोली | अध्यक्ष |
| २. | डॉ. सुदाम अडसूळ, माजी कृषि संचालक, कृषि विभाग, पुणे | सदस्य |
| ३. | डॉ. अशोक निर्बाण, माजी संचालक (विस्तार शिक्षण), डॉ.बासाकोकृवि, दापोली | सदस्य |
| ४. | डॉ.दिलीप झेंडे संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि विभाग, शिवाजीनगर, पुणे | सदस्य |
| ५. | संचालक (विस्तार शिक्षण), कृषि परिषद, पुणे | सदस्य |
| ६. | संचालक विस्तार शिक्षण, मफुकृवि, राहुरी | सदस्य |
| ७. | संचालक विस्तार शिक्षण, डॉ. पंदेकृवि, अकोला | सदस्य |
| ८. | संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी | सदस्य |
| ९. | डॉ.प्रमोद सावंत, संचालक विस्तार शिक्षण, डॉ. बासाकोकृवि, दापोली | सदस्य सचिव |

कृषि विद्यापीठांमध्ये झालेले कृषि आणि संलग्न क्षेत्रातील संशोधनावर आधारीत तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे, त्याची उपयुक्तता अजमाविणे व त्यावर शेतकऱ्यांकडून आलेल्या प्रतिसादानुसार संशोधनाचे नियोजन करणे तसेच कृषी विभागाचे विस्तार कार्याशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे, ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. सर्वच क्षेत्रातील संशोधन कालौघात विकसीत होत असतानाच तंत्रज्ञानात परिवर्तन होत असते, त्यास कृषि क्षेत्रसुद्धा अपवाद नाही.

कृषि क्षेत्रासमोरील आव्हाने विचारात घेवून महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठे, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली व संलग्न संस्थांनी केलेल्या संशोधनावर आधारीत विकसित झालेले तंत्रज्ञान कृषि विद्यापीठांमार्फत शासनाचा कृषि विभाग व अन्य विस्तार कार्यकर्त्यांद्वारे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येते.

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम, १९८३ आणि परिनियम, १९९० मधील तरतूदींनुसार कृषि परिषदेची विस्तार शिक्षण विषयक उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. कृषि विस्तार शिक्षण उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी कृषि विद्यापीठांना सूचना निर्गमित करणे,
२. कृषि विद्यापीठांच्या विस्तार शिक्षण संचालकांसोबत समन्वय साधून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांसाठी मनुष्यबळ विकास कार्यक्रम आयोजित करणे,

३. विस्तार विषयक कार्यक्रमाच्या बाबतीत कृषी विद्यापीठे, राज्य शासन, इतर संस्था व भारतीय कृषी अनुसंधान परिषद यामधील दुवा म्हणून काम करणे,

४. कृषि विद्यापीठांकडून कृषि विस्तार शिक्षण विषयक प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन राज्य शासन व भारतीय कृषी अनुसंधान परिषद यांच्याकडे शिफारशीसह मान्यतेसाठी सादर करणे

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम १९९० मधील परिनियम १५ अन्वये कृषि विस्तार शिक्षणाच्या बाबींवर कृषि विद्यापीठांना सल्ला देण्यासाठी कृषि विद्यापीठांतर्गत विस्तार शिक्षण परिषद कार्यरत असून संचालक, विस्तार शिक्षण यांचे मार्फत विस्तार शिक्षण उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येते.

कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण यासंदर्भात सातत्याने वृध्दींगत होत असलेली कार्याची व्याप्ती लक्षात घेता कृषि विद्यापीठांतील कृषि विस्तार शिक्षण यंत्रणा बळकट करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत संचालक विस्तार शिक्षण यांचे अधिनस्त विद्यापीठ मुख्यालयी ०५ विषयविशेषज्ञांचा चमू आणि कार्यक्षेत्रातील प्रत्येक दोन जिल्हयांसाठी एक कृषि विद्यावेत्ता एवढीच पदे मंजूर आहेत. सर्व कृषि विद्यापीठांमधील विस्तार शिक्षण संचालनालय सक्षम करण्यासाठी खालीलप्रमाणे अतिरिक्त पदे निर्माण करणे गरजेचे आहे.

## ४.१. कृषि विद्यापीठांतील विस्तार शिक्षण विषयक संस्था

### ४.१.१. विस्तार शिक्षण संचालनालय

संचालक, विस्तार शिक्षण यांना प्रशिक्षण, प्रचार साहित्य निर्मिती आणि विद्यापीठस्तरावरील विस्तार कार्यक्रमांचे नियोजन, कार्यक्षेत्रातील विस्तार शिक्षण कार्याचे संनियंत्रण तसेच राज्य शासनाच्या कृषि विभाग, कृषि विज्ञान केंद्र इत्यादी यंत्रणांशी समन्वय आणि दैनंदिन कामकाजात सहाय्य करण्यासाठी मुख्यालयी किमान एक उपसंचालक, कृषि विस्तार शिक्षण (सहयोगी प्राध्यापक समकक्ष) असे पद नव्याने निर्माण करण्यात यावे.

कृषि विद्यापीठांच्या विस्तार शिक्षण कार्यक्रमाची राज्याच्या कृषि विस्तार विभागाशी सांगड घालून पूर्वीच्या प्रशिक्षण व भेट योजनेच्या धर्तीवर विस्तार यंत्रणेची पुनर्रचना करण्याचे प्रस्तावित आहे. सध्या दोन जिल्हयांसाठी एक कृषि विस्तार विद्यावेत्ता (सहयोगी प्राध्यापक समकक्ष) कार्यरत आहे. तथापि, कृषि विद्यापीठाच्या विस्तार शिक्षण व कृषि विज्ञान केंद्राच्या कार्याची एकूण व्याप्ती लक्षात घेता, दोन जिल्हयास एक ऐवजी प्रत्येक जिल्हयासाठी एक कृषि विस्तार विद्यावेत्ता पद मंजूर करणे योग्य होईल.

### ४.१.२. कृषि विज्ञान केंद्र

भारतीय कृषि अनुसंधान परिषद पुरस्कृत १८ शासकीय व २९ खाजगी अशी एकूण ४७ कृषि विज्ञान केंद्र राज्यात कार्यरत आहेत. त्यांचा विद्यापीठनिहाय तपशील  खालीलप्रमाणे आहे.

| विद्यापीठाचे नाव | विद्यापीठांतर्गत | खाजगी | एकूण |
|---|---|---|---|
| मफुकृवि, राहुरी | ०४ | १३ | १७ |
| डॉ.पंदेकृवि, अकोला | ०८ | ०६ | १४ |
| वनामकृवि, परभणी | ०४ | ०८ | १२ |
| डॉ.बासाकोकृवि, दापोली | ०२ | ०२ | ०४ |
| **एकूण** | **१८** | **२९** | **४७** |

वरीलप्रमाणे कृषि विज्ञान केंद्र कार्यरत असले तरीही विद्यापीठांच्या कृषि विस्तार शिक्षण संचालनालयाकडे अत्यंत अपुरे मनुष्यबळ असल्याने त्यांच्याशी परिणामकारक समन्वय साधणे शक्य होत नाही. यासाठी कृषि विद्यापीठांच्या विस्तार शिक्षण संचालनालयाचे वर उल्लेख केल्याप्रमाणे बळकटीकरण करणे आवश्यक आहे.

### ४.१.३. कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र

राज्यातील सर्व कृषि विद्यापीठात कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्रे उभारण्यात आली आहेत. ही योजना शेतकऱ्यांसाठी अतिशय उपयुक्त असून त्यास शेतकऱ्यांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. याठिकाणी विद्यापीठ विकसित सर्व प्रकारचे कृषि तंत्रज्ञान एकाच ठिकाणी मिळते तसेच, विद्यापीठांमध्ये उत्पादीत झालेली बी-बियाणे, कलमे-रोपे, जैविक निविष्ठा, प्रकाशने, इत्यादी सेवा उपलब्ध होतात. या ठिकाणी दररोज शेकडो शेतकरी भेट देत असतात. तथापि, या योजनेसाठी कोणतेही मनुष्यबळ मंजूर नाही. त्याचबरोबर देखभाल दुरुस्ती व दैनंदिन आवर्ती खर्चासाठी निधी उपलब्ध नाही. सदर केंद्र सातत्यपूर्ण आणि परिणामकारकरित्या कार्यरत ठेवण्यासाठी खालील मनुष्यबळाची तीव्र निकड आहे.

| अ.क्र. | पदनाम | संख्या |
|---|---|---|
| १. | केंद्र व्यवस्थापक (सहयोगी प्राध्यापक समकक्ष) | १ |
| २. | जनसंपर्क अधिकारी (सहायक प्राध्यापक समकक्ष) | १ |
| ३. | माहिती तंत्रज्ञान अधिकारी (वरिष्ठ संशोधन सहायक समकक्ष) | १ |
| ४. | कृषि निविष्ठा विक्री अधिकारी (कनिष्ठ संशोधन सहायक समकक्ष) | १ |
| ५. | प्रक्षेत्र भेट समन्वयक (कृषि सहायक समकक्ष) | २ |
| ६. | लेखापाल / वरिष्ठ लिपिक | १ |
| | एकूण | ७ |

कृषि विद्यापीठांच्या विस्तार शिक्षण कार्यक्रमांसाठी अत्यल्प निधी उपलब्ध होतो. त्यामुळे विस्तार शिक्षणाचे कार्य प्रभावीपणे होत नाही, अशी भावना सर्वच समिती सदस्यांनी व्यक्त केली, त्यावर अभ्यासगटात सविस्तर विचारमंथन झाले. त्याअनुषंगाने प्रत्येक कृषि विद्यापीठाच्या वार्षिक अंदाजपत्रकातील किमान दोन टक्के निधी या संचालनालयास उपलब्ध करून देण्यात यावा.

## ४.२. कृषि विद्यापीठांच्या आणि शासनाच्या कृषि विस्तार कार्यक्रमांची सांगड

जोपर्यंत कृषि संशोधन शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत जाऊन सिद्ध होत नाही आणि त्याची शेतावर प्रत्यक्ष अंमलबजवणी होत नाही, तोपर्यंत संशोधनाला अर्थ प्राप्त होत नाही. म्हणूनच कृषि तंत्रज्ञान विस्ताराला कृषि विकासामध्ये अनन्यसाधारण महत्व आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले, तर कृषि विस्तार कार्यक्रम हा कृषि विकासाचा आत्मा आहे. काळाच्या ओघात तंत्रज्ञानात जसजसे नवनवीन बदल होत गेले, तसतसे कृषि तंत्रज्ञान विस्ताराच्या पद्धतीमध्येही बदल होत गेले. महाराष्ट्रातील कृषि विस्तार कार्याचा आढावा घेत असताना त्याची खालीलप्रमाणे चार टप्प्यांमध्ये विभागणी करता येईल.

१) स्वातंत्र्यपूर्व काळातील कृषि विभाग,
२) स्वातंत्र्योत्तर काळातील सन १९८१-८२ पर्यंतची कृषि विस्तार कार्यपद्धती,
३) सन १९८१-८२ ते १ जुलै १९९८ या कालखंडातील प्रशिक्षण व भेट योजना,
४) सन १९९८ते आजतागायत कृषि विस्ताराची कार्यपद्धती.

उपरोक्त कालखंडातील कृषि विस्तार कार्याच्या वाटचालीची संक्षिप्त माहिती परिशिष्ट '५' मध्ये नमूद केली आहे.

### ४.२.१. कृषि विस्तार प्रशिक्षण आणि कृषि तंत्रज्ञान प्रसार कार्यक्रमाची पुनर्रचना

कृषि विस्तार कार्याचे महत्व आणि पूर्वी शासनामार्फत राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण व भेट योजनेच्या यशस्वी अमंलबजावणीवर आता नव्याने विचार मंथन होऊन पुन्हा कालसुसंगत अशी सक्षम व परिणामकारक कृषि विस्तार यंत्रणा

उभारणे ही काळाची गरज आहे. तंत्रज्ञान प्रसाराच्या यशस्वीतेसाठी या कामांमध्ये सातत्य आणि एकाग्रतेची आवश्यकता असते. त्यामुळे या कामासाठी शेतकऱ्यांशी समरस होऊन समर्पित भावनेने काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समुहाची आवश्यकता आहे.

पूर्वीच्या प्रशिक्षण व भेट योजनेप्रमाणे अधिकची पद निर्मिती करून स्वतंत्र यंत्रणा उभारणे सद्यस्थितीत शक्य नसले तरी हे काम सध्या कृषि विभागाच्या मंजूर आकृतीबंधातील उपलब्ध काही अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे पूर्णवेळ सोपवून करणे शक्य आहे. त्यानुषंगिक खालीलप्रमाणे काही बदल प्रस्तावित करण्यात येत आहेत.

१) सध्या कृषि विभागात कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, उप-विभागीय कृषि अधिकारी, अधीक्षक कृषि अधिकारी, कृषि सह-संचालक आणि संचालक असे नऊ तांत्रिक संवर्ग कार्यरत आहेत.

२) जिल्हा ते ग्राम स्तरापर्यंत काम करणाऱ्या कर्मचारी अधिकाऱ्यांच्या संवर्गनिहाय कामाची विभागणी पाहिल्यास काही संवर्गावर कामाचा ताण वाढला आहे, तर काही संवर्गांकडे तुलनेने कमी काम राहिले आहे. तसेच दोन संवर्गातील कामाच्या विभागणीत फारसा फरक राहिलेला नाही. या कार्यपध्दतीत पर्यवेक्षीय स्तर आवश्यकतेपेक्षा जास्त आहेत. त्यामुळे कृषि विभागाच्या कामकाजाचे पुनर्वाटप करून कृषि विभागाची विविध कामे अधिक प्रभावीपणे करणे शक्य होईल.

४) ग्राम पातळीवर काम करणाऱ्या कृषि सहाय्यक आणि कृषि पर्यवेक्षकांपैकी कृषि सहाय्यकांकडे कृषि विस्ताराव्यतिरिक्त असणारी अन्य सर्व कामे सोपवून कृषि पर्यवेक्षकांकडे केवळ कृषि विस्तार कार्याची जबाबदारी सोपविण्यात यावी.

५) मंडळ कृषि अधिकारी आणि तालुका कृषि अधिकारी यांच्या संवर्गामध्ये बरेच साम्य आहे, तालुका कृषि अधिकारी हे तालुका प्रमुख म्हणून कार्यरत असल्याने त्यांच्याकडे सर्वच बाबींची जबाबदारी असते. त्यांच्यावर प्रशासकीय तसेच तांत्रिक कामाचा बोजा तुलनेने फारच जास्त आहे. कृषि विस्ताराचे संपूर्ण काम मंडळ कृषि अधिकाऱ्यांकडे सोपविल्यास तालुका कृषि अधिकाऱ्यांच्या कामाचा बोजा कमी होईल आणि मंडळ कृषि अधिकारी स्वतंत्रपणे कृषि विस्तार कामावर लक्ष केंद्रित करू शकतील.

६) उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय हे तालुका कृषि अधिकारी आणि जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयांमधील दुवा म्हणून कार्यरत असते. त्या कार्यालयाची सद्याच्या कार्यपद्धतीत फारशी उपयुक्तता नाही. काही ठराविक कामे सोडल्यास, त्या कार्यालय प्रमुखाच्या सेवा पूर्ण क्षमतेने वापरल्या जात नाहीत. कृषि विस्ताराचे काम पूर्णपणे उप-विभागीय कृषि अधिकाऱ्यांकडे सोपविल्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी आणि तालुका कृषि अधिकारी या दोन्ही कार्यालयांच्या कामाचा बोजा कमी होऊन ते कृषि विस्तार कामाव्यतिरिक्त इतर कामांवर प्रभावीपणे लक्ष केंद्रित करू शकतील.

७) जिल्हा स्तरावर सध्या जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आणि प्रकल्प संचालक, आत्मा हे अधिक्षक कृषि अधिकारी संवर्गातील दोन अधिकारी कार्यरत आहेत. या दोन्ही अधिकाऱ्यांमार्फत कृषि विस्ताराचे कार्य वेगवेगळ्या दिशेने आणि कार्यपद्धतीनुसार चालू आहे. त्यामुळे त्यात काही ठिकाणी द्विरूक्ती दिसून येते. यातील आत्मा योजनेचे काम पाहणाऱ्या प्रकल्प संचालक, आत्मा यांच्याकडे कृषि विस्ताराची संपूर्ण जबाबदारी सोपविण्यात यावी आणि कृषि विभागाची उर्वरित सर्व कामे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांचेकडेच ठेवल्यास कामात सुसूत्रता येऊ शकेल आणि कृषि विस्ताराच्या कामाला अधिक परिणामकारकरित्या सुत्रबद्ध पद्धतीने चालना मिळेल.

८) राज्य स्तरावरही कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) आणि कृषि संचालक (आत्मा) हे दोन कृषि संचालक संवर्गातील अधिकारी कार्यरत आहेत. त्यातील कृषि संचालक (आत्मा) यांच्याकडे संपूर्णपणे कृषि विस्तार व प्रशिक्षण कामाचे संनियंत्रण सोपविण्यात यावे आणि केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांच्या अंमलबजावणी आणि अनुषंगिक कामे कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांच्याकडे सोपविण्यात यावीत आणि त्यानुसार त्यांच्या पदनामात बदल करण्यात यावा. कृषि संचालक (आत्मा) यांचे पदनाम कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) असे करण्यात येवून कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांचे पदनाम कृषि संचालक (कार्यक्रम अंमलबजावणी) असे करण्यात यावे. कृषि विस्ताराच्या कामाला योग्य न्याय देण्याच्या दृष्टीने, कृषि विभागाच्या कामात सुसूत्रता येण्यासाठी आणि उपलब्ध मनुष्यबळाचा सुयोग्य वापर होण्याच्या दृष्टीने ही कार्यपद्धती प्रस्तावित करण्यात येत आहे.

९) प्रस्तावित कार्यपद्धतीसाठी राज्य ते ग्राम स्तरापर्यंतची सर्वसाधारण संरचना खालीलप्रमाणे सुधारित करण्यात यावी.

**राज्यस्तर - कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**

⬇

**विभागस्तर - विभागीय कृषि सह-संचालक**

⬇

**जिल्हास्तर - अधीक्षक कृषि अधिकारी (विस्तार व प्रशिक्षण)**

⬇

**उप-विभागीयस्तर - उप-विभागीय कृषि अधिकारी (विस्तार व प्रशिक्षण)**

⬇

**मंडळ स्तर - मंडळ कृषि अधिकारी (विस्तार व प्रशिक्षण)**

⬇

**ग्रामस्तर - कृषि पर्यवेक्षक (विस्तार व प्रशिक्षण)**

### ४.२.२ कृषि विद्यापीठे आणि कृषि विभागाचा समन्वय

कृषि विभागातील विस्तार कार्यात कार्यरत अधिकारी व कर्मचारी तसेच बिगर सरकारी क्षेत्रातील विस्तार कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देऊन मुख्य प्रशिक्षक तयार करणे हे कृषि विद्यापीठांमधील विस्तार शिक्षण संचालनालयाचे मुख्य कार्य आहे. प्रशिक्षित अधिकाऱ्यांमार्फत कृषि विस्तारकांना प्रशिक्षित करून त्यांच्या मार्फत शेतकऱ्यांपर्यंत कृषि तंत्रज्ञान प्रचार, प्रसार आणि विस्ताराचे कार्य केले जाते. हे कार्य प्रभावीपणे करण्यासाठी या दोन्ही यंत्रणांची योग्य सांगड घालून त्यांच्यात नव्याने समन्वय व सहकार्य प्रस्थापित करणे ही काळाची गरज आहे. यासाठी राज्य ते ग्रामस्तरापर्यंत खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

**राज्य स्तर..**

राज्य पातळीवरील कृषि विभागातील संचालक (विस्तार व प्रशिक्षण), विभागीय कृषि-सहसंचालक, चारही कृषि विद्यापीठातील संचालक (विस्तार शिक्षण) आणि सहयोगी संशोधन संचालक, राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प यांनी एकत्रितरित्या जिल्हा ते ग्राम पातळीपर्यंतचा विस्तार शिक्षण आणि तंत्रज्ञान प्रसाराचा वार्षिक आराखडा तयार करावा. त्यामध्ये जिल्हा मासिक चर्चासत्रे, उपविभाग स्तरावरील पंधरवडा प्रशिक्षण वर्ग आणि ग्राम पातळीवरील ग्राम कृषि विस्तारक यांच्या प्रशिक्षण आणि भेटींच्या कार्यपद्धतीचा अंतर्भाव असावा. राज्य स्तरावरून या सर्व कामांचा वेळोवेळी आढावा घेऊन त्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी विभागीय विस्तार संशोधन समिती (नठएअउ) मध्ये आयुक्त (कृषि) आणि कृषि विद्यापीठांचे कुलगुरू यांचा सहभाग असावा. विभागीय विस्तार संशोधन समितीद्वारे कृषि संशोधन आणि कृषि विस्तार कार्यक्रमाचा आढावा घेऊन पुढील कामकाजाची रुपरेषा निश्चित करण्यात यावी.

**विभाग स्तर...**

महाराष्ट्र राज्याची कृषि हवामान विभागानुसार नऊ विभागात विभागणी होते. त्या विभागातील विविध संशोधन केंद्रावर कार्यरत असलेले संशोधक यांनी संशोधन कार्याबरोबरच कृषि विस्तार शिक्षण कार्यक्रमातही सहभागी होणे अपेक्षित आहे. यासाठी विभागीय स्तरावरील शास्त्रज्ञांचा आणि कृषि विभागाच्या विस्तार कार्यकर्त्यांचा सहभाग आणि समन्वय वाढविणे आवश्यक आहे.

**जिल्हा स्तर...**

कृषि विभागाचे अधिक्षक कृषि अधिकारी (विस्तार व प्रशिक्षण) यांनी विद्यापीठांकडील विस्तार कृषि विद्यावेत्ता यांच्या समन्वयाने जिल्हास्तरीय मासिक चर्चासत्र आयोजित करावे. या चर्चासत्रास जिल्हयातील उपविभागीय कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, जिल्हास्तरावरील कृषि व संलग्न विभागाचे अधिकारी, कृषि विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ

जिल्हास्तरावरील कृषि संलग्न विभागाचे प्रतिनिधी (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्य, वन, जलसंधारण, जलसंपदा इ.) तसेच कृषि महाविद्यालय आणि कृषि संशोधन केंद्र येथील शास्त्रज्ञ यांना निमंत्रित करण्यात यावे.

**उपविभागीय स्तर...**

उपविभागीय स्तरावर महिन्यातून एक प्रशिक्षण वर्ग आयोजित करून त्यामध्ये कृषि व संलग्न विभागातील अधिकारी आणि कृषि विद्यापीठांतील शास्त्रज्ञ यांनी सहभागी होऊन कृषि पर्यवेक्षक व कृषि विस्तारक यांना प्रशिक्षण द्यावे आणि विशिष्ट समस्यांवर मार्गदर्शन करावे.

### ४.२.३. प्रशिक्षण संस्थांचे कार्य आणि संनियंत्रण...

कृषि विभागाच्या अखत्यारीत सात प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (RAMETI) प्रादेशिक स्तरावर आणि त्यांची शिखर संस्था वसंतराव नाईक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (VANAMATI) नागपूर येथे कार्यरत आहे. या संस्थांमार्फत कृषि विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी तज्ञ प्रशिक्षक व व्याख्याते कृषि विद्यापीठांकडून किंवा अन्य संस्थांकडून उपलब्ध करून घेतले जातात. वास्तविक पाहता, कृषि विस्तार शिक्षण म्हणजेच प्रशिक्षणाची जबाबदारी कृषि विद्यापीठांची आहे, तसेच विविध विषयांतील जाणकार तज्ञ मनुष्यबळ विद्यापीठांकडे उपलब्ध आहे. त्यामुळे रामेती ज्या कृषि विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रात आहेत त्या विद्यापीठांकडे मंजूर आस्थापनेसह वर्ग करण्यात याव्यात आणि वनामतीचे नियंत्रण महाराष्ट्र कृषि शिक्षण आणि संशोधन परिषदेकडे सोपविण्यात यावे. कृषि विस्तार प्रशिक्षण संस्थांच्या या प्रस्तावित बदलामुळे कोणत्याही नवीन आस्थापनेची अथवा फारशा नवीन पदनिर्मितीची गरज भासणार नाही. केवळ उपलब्ध मनुष्यबळाची सुयोग्य मांडणी करावी लागेल. अशा बदलांमुळे कृषि विस्तार प्रशिक्षण आणि कृषि तंत्रज्ञान प्रसार कार्यक्रमात सुसूत्रता येईल व हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे शक्य होईल.

## ४.३ कृषि विद्यापीठांना विस्तार शिक्षण विषयक मार्गदर्शक सूचना

१. कृषि विद्यापीठांमधील विस्तार शिक्षण संचालनालय सक्षम करण्यासाठी मुख्यालयी किमान एक उपसंचालक कृषि विस्तार शिक्षण (सहयोगी प्राध्यापक समकक्ष) असे पद नव्याने निर्माण करण्यात यावे. याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठांनी कृषि परिषदेमार्फत शासनास सादर करावा.
२. प्रभावी विस्तार शिक्षण कार्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या दोन जिल्हयासाठी एक कृषि विस्तार विद्यावेत्ता ऐवजी प्रत्येक जिल्हयासाठी एक कृषि विस्तार विद्यावेत्ता (सहयोगी प्राध्यापक समकक्ष) पद नव्याने मंजूर करण्यात यावे. याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठांनी कृषि परिषदेमार्फत शासनास सादर करावा.

## ४.४. राज्य शासनास विस्तार शिक्षण विषयक शिफारशी

१. कृषि विद्यापीठांतील कृषि विस्तार शिक्षण संचालनालयाचे कामकाज परिणामकारक होण्यासाठी विद्यापीठांच्या अंदाजपत्रकातील तरतूदीच्या किमान दोन टक्के निधी विस्तार व प्रशिक्षण कार्यासाठी राखीव ठेवण्यात यावा.
२. कृषि विद्यापीठ मुख्यालयी कार्यरत कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्रासाठी स्वतंत्र मनुष्यबळ निर्मितीस प्रस्तावित केल्याप्रमाणे मान्यता प्रदान करण्यात यावी.
३. कृषि विद्यापीठांमधील विस्तार शिक्षण संचालनालय सक्षम करण्यासाठी मुख्यालयी किमान एक उपसंचालक कृषि विस्तार शिक्षण (सहयोगी प्राध्यापक समकक्ष) असे पद नव्याने निर्माण करण्यात यावे.
४. कृषि तंत्रज्ञान विस्तार आणि प्रशिक्षणाचे कार्य प्रभावीपणे होण्यासाठी पूर्वीच्या प्रशिक्षण व भेट योजनेच्या धर्तीवर प्रस्तावित केल्यानुसार कृषि विभागातील उपलब्ध मनुष्यबळाची पुनर्रचना करण्यात यावी.
५. कृषि विभागाच्या विस्तार व प्रशिक्षण विभागाशी योग्यप्रकारे समन्वय व सहकार्य प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने कृषि विद्यापीठांतर्गत सध्या अस्तित्वात असलेल्या दोन जिल्हयासाठी एक कृषि विस्तार विद्यावेत्ता ऐवजी प्रत्येक जिल्हयासाठी एक कृषि विस्तार विद्यावेत्ता (सहयोगी प्राध्यापक समकक्ष) पद नव्याने मंजूर करण्यात यावे.

६. कृषि विभागाच्या अखत्यारीतील सात प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (RAMETI) ज्या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात आहेत त्यांचेकडे मंजूर आस्थापनेसह वर्ग करण्यात याव्यात.
७. कृषि विस्तार प्रशिक्षणासाठी कार्यरत असलेली वसंतराव नाईक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर; मंजूर आस्थापनेसह महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचेकडे वर्ग करण्यात यावी.

# ५. वित्त

**कार्यकक्षा :** अ) कृषि विद्यापीठांना मिळणारी अनुदाने, त्यांची स्व-उत्पन्नाची साधने आणि अन्य आर्थिक स्त्रोतांचा आढावा घेऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी उपाययोजना सुचविणे,
ब) विद्यापीठांचे शासनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद आणि कृषि विद्यापीठे यांचे कामकाज महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम, १९८३ आणि परिनियम १९९० मधील तरतूदींनुसार चालते. अधिनियमातील तरतूदीनुसार कृषि विद्यापीठांच्या अर्थ विषयक बाबीसंबंधी कृषि परिषदेची अधिकारिता खालीलप्रमाणे आहे.

१. कृषि विद्यापीठांच्या वार्षिक योजना व अशा योजनांचे भाग असणा-या योजनांना शासन मान्यतेसाठी शिफारस करणे,
२. अधिनियमातील कलम ५४ च्या अधिन राहून विद्यापीठांच्या वार्षिक वित्तीय अंदाजपत्रकास शासन मान्यतेसाठी शिफारस करणे,
३. अर्थसंकल्पीय अनुदानाचे पुनर्विनियोजन प्रस्तावास मान्यतेसाठी शासनास शिफारस करणे,
४. कृषि परिषदेने घेतलेल्या निर्णयाच्या आधारावर विद्यापीठास योजनांतर्गत व योजनेत्तर अशा दोन्ही प्रकारचे निधी, आवश्यक वाटेल अशा कालांतराने देण्याविषयी राज्य शासनास प्रस्ताव सादर करणे.

शासनाने ठरवून दिलेल्या अभ्यासगटाच्या कार्यकक्षेनुसार वित्त विषयक माहिती संकलित करून अभ्यास करण्यासाठी डॉ. पी.जी. पाटील, कुलगुरू, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे उपसमिती स्थापन करण्यात आली.

| अ.क्र. | उपसमिती | पदनाम |
|---|---|---|
| १. | डॉ. पी. जी. पाटील, कुलगुरु, मफुकृवि, राहुरी | अध्यक्ष |
| २. | डॉ. दिलीप अ. देशमुख, माजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, | सदस्य |
| ३. | सल्लागार (वित्त), कृषि परिषद, पुणे | सदस्य |
| ४. | संचालक, स्थानिक निधी लेखा विभाग, मुंबई | सदस्य |
| ५. | नियंत्रक, डॉ. पंदेकृवि, अकोला | सदस्य |
| ६. | नियंत्रक, वनामकृवि, परभणी | सदस्य |
| ७. | नियंत्रक, डॉ. बासाकोकृवि, दापोली | सदस्य |
| ८. | श्री. सदाशिव पाटील, नियंत्रक, मफुकृवि, राहुरी | सदस्य सचिव |

सदर उपसमितीने शासनस्तरावरून विद्यापीठांना मिळत असलेल्या अनुदानाविषयक बाबीं, विद्यापीठांकडे असलेले महसूलांचे स्त्रोत त्यातून विद्यापीठांना मिळणारा महसूल तसेच अन्य स्त्रोतांद्वारे मिळणारे अर्थसहाय्य या सर्व बाबींचा आढावा घेवून व सर्व संबंधितांशी विचार विनिमय करून अहवाल तयार केला आहे.

महाराष्ट्र हे कृषि प्रधान राज्य असून स्वातंत्र्य प्राप्ती नंतर राज्यात मोठया प्रमाणात शहरीकरण व औद्योगिकीकरण झाले असले तरी आजही राज्यातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास असून त्यांना उदरनिर्वाहासाठी शेतीवरच अवलंबून राहावे लागते. राज्यात कृषि क्षेत्रात घडून आलेल्या हरित क्रांतीमध्ये कृषि विद्यापीठांचे मोठे योगदान आहे.

राज्यातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या कृषि क्षेत्रावर अवलंबून असूनही एकूण स्थूल राज्य उत्पन्नापैकी (जी.डी.पी.) कृषि क्षेत्राचा हिस्सा दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर कृषि क्षेत्रातील त्या त्या देशांचे योगदान पाहता आपली या क्षेत्रातील गुंतवणूक खूपच कमी आहे. अन्न सुरक्षेच्या दृष्टिने राज्याला या क्षेत्रात भरीव गुंतवणुक करणे आवश्यक आहे किंबहूना अशी गुंतवणूक केली तरच या क्षेत्राचा सर्वांगीण विकास होईल. त्यासाठी कृषि क्षेत्राच्या विकासासाठी कटीबध्द असलेल्या या राज्यातील कृषि विद्यापीठांनी आर्थिकदृष्टया सक्षम होणे आवश्यक आहे.

## ५.१ कृषि विदयापीठ निहाय मिळालेल्या अर्थसंकल्पीय अनुदानाचा तपशील

### ५.१.१ कृषि विद्यापीठे व कृषि परिषदेचे वार्षिक अंदाजपत्रक (२०२०-२१)

(रुपये- कोटी)

| तपशील | मफुकृवि राहुरी | डॉ. पंदेकृवि अकोला | वनामकृवि, परभणी | डॉ.बासाकोकृवि दापोली | कृषि परिषद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय तरतूद | ४१०.३८ | ३२६.५० | २७१.५८ | २१४.७६ | ५८.५७ | १२८१.७९ |
| प्राप्त अनुदान व खर्च | ३५७.२३ | २८१.६३ | १९२.८४ | १६४.१२ | १५.५७ | १०११.३९ |
| अर्थ संकल्पीय तरतुदीपेक्षा कमी प्राप्त अनुदान | ५३.१५ | ४४.८७ | ७८.७४ | ५०.६४ | ४३.०० | २७०.४० |

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात एकूण अर्थसंकल्पीय तरतूद रु.१२८१.७९ कोटी असताना प्रत्यक्ष रु.१०११.३९ कोटी इतका निधी प्राप्त होवून खर्च झालेला आहे. म्हणजेच रु. २७०.४० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत असतानाही कमी प्राप्त झालेला आहे.

### ५.१.२ कृषि विद्यापीठे व कृषि परिषदेचे वार्षिक अंदाजपत्रक (२०२१-२२)

(रुपये- कोटी)

| तपशील | मफुकृवि राहुरी | डॉ. पंदेकृवि अकोला | वनामकृवि, परभणी | डॉ.बासाकोकृवि दापोली | कृषि परिषद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय तरतूद | ५०१.९४ | ३४०.०६ | २८१.६६ | २२६.३० | ४७.५६ | १३९७.५२ |
| प्राप्त अनुदान व खर्च | ४१८.२२ | ३०९.४१ | २२४.६० | २०४.७६ | ३८.४४ | ११९५.४३ |
| अर्थ संकल्पीय तरतूदी पेक्षा कमी प्राप्त अनुदान | ८३.७२ | ३०.६५ | ५७.०६ | २१.५४ | ९.१२ | २०२.०९ |

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात एकूण अर्थसंकल्पीय तरतूद रु. १३९७.५२ कोटी असताना प्रत्यक्ष रु. ११९५.४३ कोटी इतका निधी प्राप्त झालेला आहे. म्हणजेच रु.२०२.०९ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत असतानाही कमी प्राप्त झालेला आहे.

### ५.१.३ कृषि विद्यापीठे व कृषि परिषदेचे वार्षिक अंदाजपत्रक (२०२२-२३)

(रुपये- कोटी)

| तपशील | मफुकृवि, राहुरी | डॉ.पंदेकृवि, अकोला | वनामकृवि, परभणी | डॉ.बासाकोकृवि दापोली | कृषि परिषद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय तरतूद | ६६५.११ | ४७३.६२ | ३८३.५७ | ३०१.६७ | ५२.६२ | १८७६.५९ |
| प्राप्त अनुदान व खर्च | ६३९.०३ | ४१३.०९ | २९९.४५ | २११.८६ | ४५.०५ | १६०८.४८ |
| अर्थसंकल्पीय तरतूदी पेक्षा कमी प्राप्त अनुदान | २६.०८ | ६०.५३ | ८४.१२ | ८९.८१ | ७.५७ | २६८.११ |

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात एकूण अर्थसंकल्पीय तरतूद रु. १८७६.५९ कोटी असताना प्रत्यक्ष रु. १६०८.४८ कोटी इतका निधी प्राप्त झालेला आहे. म्हणजेच रु. २६८.११ कोटी इतका निधी कमी प्राप्त झालेला आहे.

राज्यातील सर्व कृषि विदयापीठांना मागील तीन वर्षांच्या अर्थसंकल्पीय तरतुदींचा विचार करता मंजुर अनुदानापेक्षा सुमारे १५ टक्के कमी अनुदान प्राप्त झाले आहे. त्यामुळे कृषि विदयापीठांमार्फत करण्यात येत असलेल्या शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण या कार्यांवर विपरीत परिणाम होत आहे.

### ५.२ स्थुल राज्य उत्पन्न व कृषि विदयापीठांना मिळणा-या अनुदानाचा तपशील

कृषि क्षेत्राच्या विकासासाठी राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांमध्ये शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण यावर भर देणे आवश्यक आहे. देशाची अन्नसुरक्षा आणि कृषि क्षेत्राचा शाश्वत विकास यासाठी देशातील स्थूल कृषि उत्पन्नाच्या (जी.डी.पी.) किमान एक टक्के रक्कम कृषि शिक्षण व संशोधनावर खर्च करणे अपेक्षित आहे, असे आंतरराष्ट्रीय स्तरावर तत्वत: मान्य करण्यात आले आहे.

**महाराष्ट्र राज्याचे स्थुल कृषि उत्पन्न व कृषि विदयापीठांना मिळणा-या अनुदानाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

(रुपये- कोटी)

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| स्थुल राज्य उत्पन्न (जी.डी.पी.) | २६,२७,५४२ | ३१,०८,०२२ | ३५,२७,०८४ | ३८,७९,७९२ (अपेक्षित) |
| राज्य जी.डी.पी. तील कृषि क्षेत्राचा हिस्सा (१२ टक्के गृहित धरून) | ३,१५,३०५ | ३,७२,९६२ | ४,२३,२५० | ४,६५,५७५ |
| कृषि क्षेत्र जी.डी.पी. च्या एक टक्केप्रमाणे कृषि विद्यापीठांना अपेक्षित निधी | ३१५३ | ३७२९ | ४२३२ | ४६५५ |
| प्राप्त अनुदान | १०११ | ११९५ | १६०८ | २०७२ |
| तफावत | २१४२ | २५३४ | २६२४ | २५८३ |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता, सद्यस्थितीत राज्यातील सर्व कृषि विदयापीठांना कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण कार्यासाठी राज्य शासनाच्या अर्थसंकल्पाद्वारे राज्याच्या स्थुल कृषि उत्पन्नाच्या ०.३७ टक्के निधी प्राप्त होत आहे. याबाबत गांभीर्याने विचार-मंथन होवून कृषि विद्यापीठांना राज्य स्थूल कृषि उत्पन्नाच्या किमान एक टक्का अनुदान देण्यात यावे.

### ५.३ कृषि विद्यापीठांच्या स्व-उत्पन्नांच्या साधनांचा मागील तीन वर्षाचा तपशील

#### ५.३.१ कृषि विद्यापीठांचा स्व-उत्पन्नांद्वारे प्राप्त महसूल (२०२०-२१)

(रुपये- कोटी)

| तपशील | मफुकृवि राहुरी | डॉ. पंदेकृवि अकोला | वनामकृवि परभणी | डॉ. बासाकोकृवि दापोली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| शैक्षणिक शुल्क | ७.५८ | ४.२४ | १२.५३ | २.७६ | २७.११ |
| बियाणे | ७.०६ | ३.१२ | ६.६४ | ०.३८ | १७.२० |
| कलमे व रोपे | २.२२ | १.१० | ०.८७ | ०.४१ | ४.६० |
| कृषि निविष्ठा | ०.९५ | ०.१७ | २.१९ | ० | ३.३१ |
| कृषि अवजारे | ०.११ | ० | ० | ० | ०.११ |
| उत्पादने चाचणी शुल्क | २.५२ | २.६५ | २.२५ | ०.३६ | ७.७८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| फळबाग लिलाव व फळे, फुले, भाजीपाला विक्री | ०.६५ | ०.०१ | ०.२८ | ४.०० | ४.९४ |
| बेकरी | ०.१२ | ० | ० | ०.०२ | ०.१४ |
| दुध व दुग्धजन्य पदार्थ | ०.९२ | ०.२४ | ०.२३ | ०.१८ | १.५७ |
| इतर सर्व उत्पन्न | ११.७० | ०.८४ | ४.८८ | २.७२ | २०.१४ |
| **एकूण** | **३३.८३** | **१२.३७** | **२९.८७** | **१०.८३** | **८६.९०** |

### ५.३.२ कृषि विद्यापीठांचा स्व-उत्पन्नांद्वारे प्राप्त महसूल (२०२१-२२)

(रुपये- कोटी)

| तपशील | मफुकृवि राहुरी | डॉ. पंदेकृवि अकोला | वनामकृवि परभणी | डॉ.बासाकोकृवि दापोली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| शैक्षणिक शुल्क | १०.६६ | ९.७३ | १५.३४ | ५.५३ | ४१.२६ |
| बियाणे | ११.५७ | २.०७ | ५.७४ | ०.७९ | २०.१७ |
| कलमे व रोपे | ५.६५ | ०.९० | ०.७२ | ०.३७ | ७.६४ |
| कृषि निविष्ठा | १.१७ | ०.६८ | ५.३५ | ० | ७.२० |
| कृषि अवजारे | ०.०७ | ० | ० | ० | ०.०७ |
| उत्पादने चाचणी शुल्क | ६.८० | २.७६ | ३.९५ | ०.९० | १४.४१ |
| फळबाग लिलाव व फळे, फुले, भाजीपाला विक्री | ०.९३ | ०.०१ | ०.२६ | ७.६१ | ८.८१ |
| बेकरी | ०.११ | ० | ० | ०.०२ | ०.१३ |
| दुध व दुग्धजन्य पदार्थ | ०.९२ | ०.२० | ०.३८ | ०.१३ | १.६३ |
| इतर उत्पादने , विक्री व सेवा | १९.५३ | १.८८ | ५.७३ | ३.८६ | ३१.०० |
| **एकूण** | **५७.४१** | **१८.२३** | **३७.४७** | **१९.२१** | **१३२.३२** |

### ५.३.३ कृषि विद्यापीठांचा स्व-उत्पन्नांद्वारे प्राप्त महसूल (२०२२-२३)

(रुपये- कोटी)

| तपशील | मफुकृवि राहुरी | डॉ. पंदेकृवि अकोला | वनामकृवि परभणी | डॉ.बासाकोकृवि दापोली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| शैक्षणिक शुल्क | १३.२६ | ९.७९ | १६.९४ | ६.७६ | ४६.७५ |
| बियाणे | १३.६९ | ३.५० | २.७१ | ०.५१ | २०.४१ |
| कलमे व रोपे | ४.८९ | ०.७२ | ०.५१ | ०.५५ | ६.६७ |
| कृषि निविष्ठा | १.३५ | १.१० | ३.२६ | ० | ५.७१ |
| कृषि अवजारे | ०.११ | ० | ० | ० | ०.११ |
| उत्पादने चाचणी शुल्क | ७.६४ | ४.३३ | ४.९२ | ०.९८ | १७.८७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| फळबाग लिलाव व फळे, फुले, भाजीपाला विक्री | १.३५ | ०.०१ | ०.३३ | ४.९० | ६.५९ |
| बेकरी | ०.१७ | ०.०१ | ० | ०.०२ | ०.२० |
| दुग्ध व दुग्धजन्य पदार्थ | १.१२ | ०.२१ | ०.४२ | ०.१४ | १.८९ |
| इतर उत्पादने, विक्री व सेवा | १८.०३ | १.२५ | ०.८८ | ५.४९ | २५.६५ |
| **एकूण** | **६१.६१** | **२०.९२** | **२९.९७** | **१९.३५** | **१३१.८५** |

वरील तक्त्यांचे अवलोकन केले असता, बियाणे, कलमे व रोपे, कृषि निविष्ठा, कृषि अवजारे या उत्पन्नांच्या स्त्रोतांमधून विद्यापीठांना कमी महसूल मिळत असून यामध्ये उत्पन्न वाढविण्यास विद्यापीठांना वाव आहे.

वरील तक्त्यात दर्शविलेले कृषि विदयापीठांना मिळणारे उत्पन्न हे स्थुल उत्पन्न असून सदरच्या उत्पन्नासाठी कृषि विदयापीठांना या उत्पन्नातून खर्चही मोठया प्रमाणात करावा लागतो. साधारणपणे, कृषि विदयापीठांना मिळणा-या स्व-उत्पन्नातील २० टक्के नफा गृहीत धरला तर हे स्व उत्पन्न खूपच कमी असल्याचे दिसून येते. बियाणे, कलमे व रोपे, कृषि निविष्ठा, कृषि अवजारे यामध्ये महसूल उत्पन्न वाढविण्यास खूप वाव आहे.

## ५.४ कृषि विद्यापीठांना अन्य स्त्रोताद्वारे मिळणारे अर्थसहाय्य

### ५.४.१ कृषि विद्यापीठांना अन्य स्त्रोताद्वारे मिळणारे अर्थसहाय्य (२०२०-२१)

(रुपये- कोटी)

| तपशील | मफुकृवि राहुरी | डॉ. पंदेकृवि अकोला | वनामकृवि परभणी | डॉ.बासाकोकृवि दापोली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| भारतीय कृषि अनुसंधान परिषद | २३.२८ | ११.६८ | ११.५५ | ४.७४ | ६९.११ |
| बाहय अर्थसहाय्यित प्रकल्प | १७.८६ | ४.९३ | ० | १२.२८ | १७.२१ |
| जिल्हा नियोजन समिती | ० | ०.२९ | ० | ० | ०.२९ |
| आदिवासी विकास योजना | ० | ० | ० | ० | ० |
| राष्ट्रीय कृषि विकास योजना | ५.६६ | ०.१० | २.४८ | ०.५६ | ८.८० |
| सी.एस.आर. निधी | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **४६.८०** | **१७.००** | **१४.०३** | **१७.५८** | **९५.४१** |

### ५.४.२ कृषि विद्यापीठांना अन्य स्त्रोताद्वारे मिळणारे अर्थसहाय्य (२०२१-२२)

(रुपये- कोटी)

| तपशील | मफुकृवि राहुरी | डॉ. पंदेकृवि अकोला | वनामकृवि परभणी | डॉ.बासाकोकृवि दापोली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| भारतीय कृषि अनुसंधान परिषद | २६.२७ | १३.४७ | १४.९७ | ५.८९ | ७६.२४ |
| बाहय अर्थसहाय्यित प्रकल्प | १५.६४ | ८.०७ | ० | १६.०५ | २४.१२ |
| जिल्हा नियोजन समिती | ० | ०.८५ | ० | ०.२३ | १.०८ |
| आदिवासी विकास योजना | २.३० | ४.७४ | ० | ० | ७.०४ |
| राष्ट्रीय कृषि विकास योजनो | १.६२ | ० | ० | ०.५० | २.१२ |
| सी.एस.आर. निधी | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **४५.८३** | **२७.१३** | **१४.९७** | **२२.६७** | **११०.६०** |

### ५.४.३ कृषि विद्यापीठांना अन्य स्त्रोताद्वारे मिळणारे अर्थसहाय्य (२०२२-२३)

(रुपये- कोटी)

| तपशील | मफुकृवि राहुरी | डॉ. पंदेकृवि अकोला | वनामकृवि परभणी | डॉ.बासाकोकृवि दापोली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| भारतीय कृषि अनुसंधान परिषद | २४.८२ | १५.३२ | ११.५५ | ४.६८ | ७१.३२ |
| बाहय अर्थसहाय्यित प्रकल्प | १६.०३ | ९.५८ | ० | १७.२१ | २७.८७ |
| जिल्हा नियोजन समिती | ० | ०.१७ | ० | ३.१५ | ३.३२ |
| आदिवासी विकास योजना | १.४५ | २.३३ | ० | ० | ३.७८ |
| राष्ट्रीय कृषि विकास योजना | ०.२० | ० | ०.०६ | २.५६ | २.८२ |
| सी.एस.आर. निधी | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | ४२.५० | २७.४० | ११.६१ | २७.६० | १०९.११ |

वरील तक्त्यांचे अवलोकन केले असता, सर्व विद्यापीठांना जिल्हा नियोजन समिती, आदिवासी विकास योजना, विविध बाहय अर्थ सहाय्यित योजना आणि राष्ट्रीय कृषि विकास योजनाद्वारे निधी मिळू लागला आहे. तसेच खाजगी कंपन्याकडूनही सी.एस.आर. च्या माध्यमातून निधी मिळण्यास वाव आहे. यासाठी सर्व कृषि विद्यापीठांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.

### ५.५ . राज्य शासनाकडून कृषि विद्यापीठांना मिळणारे वेतनेत्तर अनुदान

कृषि विद्यापीठे ही वार्षिक अंदाजपत्रके शासनास सादर करतात व त्यानुसार शासन अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत योजनांना अनुदान वितरीत करते. कृषि विद्यापीठांना शा.नि.क्र.कृषिवि १७९९/सीआर-१७४/२० अे दिनांक १८/१२/२००० अन्वये एकूण वेतनावरील अनुदानाच्या दहा टक्के अनुदान हे आकस्मिक खर्चाकरिता वेतनेत्तर अनुदान म्हणून देण्याचे शासनाने मान्य केले आहे. तथापि, मागील तीन वर्षाचे प्राप्त अनुदान पाहता सदरचे वेतनेत्तर अनुदान आकस्मिक खर्चासाठी खूप कमी प्रमाणात प्राप्त होत आहे.

**चारही कृषि विदयापीठांना मिळालेल्या वेतन व वेतनेत्तर अनुदानाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.**

(रुपये- कोटी).

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|
| एकूण वेतन अनुदान | ५७९.५४ | ६९८.८३ | ७११.०२ |
| दहा टक्के प्रमाणे देय अनुदान | ५७.९५ | ६९.८८ | ७१.१० |
| प्रत्यक्ष प्राप्त अनुदान (टक्केवारी) | १४.२७ (२.४६%) | १४.१६ (२.०२%) | २८.६१ (४.०२%) |
| तफावत | ४३.६८ | ५५.७२ | ४२.४९ |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता, कृषि विदयापीठांना देय वेतनेत्तर तरतुदीपेक्षा खूपच कमी अनुदान प्राप्त झाल्याचे निदर्शनास येते. कृषि विद्यापीठातील शैक्षणिक व संशोधनाचे काम करत असताना कार्यालयीन खर्च, प्रवास भत्ते, प्रयोगशाळा साहित्य, शैक्षणिक साहित्य, इमारत व प्रक्षेत्राची देखभाल दुरुस्ती, कंत्राटी कर्मचारी वेतन, वीज बिले, दुरध्वनी बिले, इंधन खर्च यासारखा दैनंदिन व अत्यावश्यक खर्च भागविण्यासाठी निधीची कमतरता भासत आहे. कृषि विद्यापीठांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी शासनाकडून दि. १८/१२/२००० च्या शासन निर्णयानुसार तरतूद केल्याप्रमाणे वेतनाच्या दहा टक्के वेतनेतर अनुदान वेळेवर वितरीत होणे आवश्यक आहे.

### ५.६ कृषि विद्यापीठांकडे असलेल्या जमिनींचा कार्यक्षम वापर करणेबाबत

कृषि विदयापीठांचे मध्यवर्ती प्रक्षेत्र, विविध महाविद्यालये, संशोधन केंद्र, कृषि तंत्रविद्यालये व कृषि विज्ञान केंद्र यांचेकडील उपलब्ध जमिनीचा तपशील पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | विद्यापीठाचे नाव | एकुण क्षेत्र (हेक्टर) | लागवडी खालील क्षेत्र (हेक्टर) | इमारती व अन्य वापराखालील क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| १ | मफुकृवि, राहुरी | ४७६२.१४ | ३७३९.७१ | १०२२.४३ |
| २ | डॉ. पंदेकृवि, अकोला | ५०५९.४४ | ४५१३.३२ | ५४६.१२ |
| ३ | वनामकृवि, परभणी | ३७८८.५७ | ३०८५.२० | ७०३.३७ |
| ४ | डॉ.बासाकोकृवि, दापोली | २०७२.४४ | १८१०.५१ | २६१.९३ |
| | **एकुण** | **१५६८२.५९** | **१३१४८.७४** | **२५३३.८५** |

चारही कृषि विदयापीठांकडे एकूण १५६८२.५९ हेक्टर जमीन आहे. कृषि विद्यापीठांच्या अखत्यारितील सर्व जमिनींची प्रतवारी व क्षमतेनुसार कार्यक्षम वापर होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व कुलगुरूंनी त्यांच्या कृषि विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रातील संपूर्ण जमिनीचा आढावा घेवून जमीन वापराचा बृहत आराखडा तयार करावा. त्यामध्ये संशोधन व शिक्षणासाठी आवश्यक जमीन निश्चित करावी आणि उर्वरित लागवडी योग्य जमिनीचा वापर बिजोत्पादन, फलोत्पादन, रोपवाटिका, पशुसंवर्धन, चारापिके यासाठी करावा. तसेच पिकांच्या फेरपालटीचा विचार करून पीक पध्दती निश्चित करण्यात यावी. जी जमीन लागवडी योग्य नाही अशा जमिनीवर सौर व हरित ऊर्जा यासारखे प्रकल्प उभारण्यात यावेत.

लागवडीस योग्य जमिनीवर सूक्ष्मसिंचन, यांत्रिकीकरण, स्वयंचलन, संगणकीकरण, कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर, ड्रोन तंत्रज्ञान, संरक्षित शेती, काटेकोर शेती, सेंद्रिय शेती, संवर्धित शेती अशा प्रकारच्या सर्व अत्याधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढीस चालना देवून विद्यार्थी व शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरतील अशी मोठया क्षेत्रावर प्रात्यक्षिके घेण्यात यावीत.

सर्व कृषि विद्यापीठांच्या मध्यवर्ती परिसरातील मोठया प्रमाणावर असलेल्या प्रक्षेत्राच्या व्यवस्थापनासाठी पूर्वी स्वतंत्र प्रक्षेत्र संचालक, प्रक्षेत्र अधिक्षक, सहाय्यक अधिक्षक/ पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक आणि त्यांना सहाय्यकारी कुशल व अकुशल मनुष्यबळ मंजूर होते. तथापि, सन २००७ मध्ये ही पदे कमी करण्यात आली. त्यावेळेपासून या कामासाठी स्वतंत्र मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने त्याचा उत्पादन वाढीवर विपरीत परिणाम झाला आहे. कृषि विद्यापीठांच्या जमिनींच्या कार्यक्षम वापरासाठी प्रत्येक कृषि विद्यापीठामध्ये एक प्रक्षेत्र संचालक आणि कृषि विद्यापीठाकडे असलेल्या क्षेत्राचा विचार करून गरजेनुसार पदांची निर्मिती करणे अत्यंत निकडीचे आहे. यासाठी कृषि विद्यापीठांनी शासनाकडे परिपुर्ण प्रस्ताव सादर करावेत.

## ५.७. कृषि विद्यापीठांकडील स्व-उत्पन्नाच्या संसाधनांचा आढावा

### ५.७.१. कृषि विद्यापीठांकडून पुरविण्यात येणाऱ्या बियाणांबाबत

गुणवत्तापूर्ण व विश्वासार्ह बियाणे ही शेतकऱ्यांची प्राथमिक गरज आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठांच्या स्व-उत्पन्नाचा एक महत्वाचा स्त्रोत आहे. राज्यातील कृषि विद्यापीठांकडून नव्याने संशोधीत व प्रसारीत झालेल्या सुधारित व संकरीत वाणांचे पैदासकार, पायाभूत, प्रमाणित व सत्यप्रत बीजोत्पादन मोठया प्रमाणात करण्यात येते. सदरचे बियाणे दरवर्षी महाबीज अकोला, इतर खाजगी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि शेतकरी यांना पुरविण्यात येते.

बियाणे उत्पादनासाठी विद्यापीठांना मोठया प्रमाणात खर्च करावा लागतो. परंतु सदरच्या बियाणांचा दर ठरविण्याचा अधिकार विद्यापीठांना नाही. पैदासकार बियाणांचा दर केंद्र शासनामार्फत आणि पायाभूत बियाणांचा दर राज्य शासनामार्फत निश्चित केला जातो. सद्यस्थितीत शासनाने पायाभूत बियाणांचा निश्चित केलेला दर हा महाबीजने निश्चित केलेल्या विविध पिकांच्या प्रमाणित व सत्यप्रत बियाणाच्या दरापेक्षाही कमी आहे. वस्तूत: पैदासकार बियाणापासून पायाभूत बियाणे आणि त्यापासून प्रमाणित व सत्यप्रत बियाणे तयार करण्यात येते. पैदासकार बियाणे आणि पायाभूत बियाणे हे तज्ञ संशोधकांच्या मार्गदर्शनाखाली काटेकोर निकषांच्या आधारे तयार करण्यात येत असल्याने त्याचा उत्पादन खर्च प्रमाणित व

सत्यप्रत बियाणापेक्षा अधिक आहे. सर्वसाधारणपणे प्रमाणित बियाणाच्या दीड पट पायाभूत बियाणाचा आणि दुप्पट पैदासकार बियाणाचा विक्रीचा दर असणे आवश्यक आहे. त्यानुसार शासन स्तरावर धोरण निश्चित व्हावे.

विद्यापीठांकडून उत्पादीत होणाऱ्या पैदासकार बियाणांचा दर केंद्र शासनाच्या कृषि विभागाकडून ठरविण्यात येतो. मफुकृवि, राहुरी यांची पैदासकार बियाणांसाठी लागणारा उत्पादन खर्च व यासाठी मिळणारा दर याबाबतची तुलनात्मक माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| बियाणाचे नाव | केंद्रक बियाणे ते पैदासकार बियाणे उत्पादनापर्यंत सर्व बाबींवरील उत्पादन खर्च रु./क्विंटल | विक्री दर रु./क्विंटल | तफावत रु./क्विंटल |
|---|---|---|---|
| गहू | ७७३६ | ७१२० | -६१६ |
| ज्वारी | १७५५६ | १२४०४ | -५१५२ |
| भात | १२९५५ | ७९०० | -५०५५ |
| हरभरा | १२७७९ | १३२७३ | ४९४ |
| तूर | २०६९० | २१११४ | ४२४ |
| मूग | २१९३७ | २२८४३ | ९०६ |
| उडीद | २१००६ | २४८४५ | ३८३९ |
| सुर्यफूल | १७८१५ | १७१०४ | -७११ |
| करडई | १६३१२ | १००६१ | -६२५१ |
| भूईमूग | २१४४० | १७४३५ | -४००५ |
| सोयाबिन | १४८६९ | १३०२२ | -१८७४ |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, पैदासकार बियाणांचा दर देखील उत्पादन खर्चापेक्षा कमी आहे. त्यामुळे उत्पादन खर्च व बियाणे विक्रीतून मिळणारी रक्कम यातील तफावत इतर महसुली उत्पन्नातून भरून काढावी लागते. त्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून बियाणाच्या उत्पादनाचा खर्च विचारात घेवून पैदासकार व पायाभूत बियाणांचे दर निश्चित होणे आवश्यक आहे.

### १.७.२. उत्पादनांच्या चाचणींव्दारे (Product Testing) मिळणा-या महसूलाविषयी

राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांकडे असलेल्या संशोधन केंद्राकडून विविध कृषि उत्पादनांची चाचणी (Product Testing) करण्यात येते. त्या माध्यमातून विद्यापीठांना महसूल प्राप्त होतो. उत्पादन चाचणीव्दारे विदयापीठांना मिळालेल्या मागील तीन वर्षाच्या महसुलाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| विद्यापीठाचे नाव | उत्पादन चाचणीव्दारे मिळालेले उत्पन्न (रु. कोटी) | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
| मफुकृवि, राहुरी | २.५२ | ६.८० | ७.६४ |
| डॉ.पंदेकृवि,अकोला | २.६५ | २.७६ | ४.३३ |
| वनामकृवि,परभणी | २.२५ | ३.९५ | ४.९२ |
| डॉ.बासाकोकृवि,दापोली | ०.३६ | ०.९० | ०.९८ |
| **एकूण** | **७.७८** | **१४.४१** | **१७.८७** |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता, उत्पादन चाचणीव्दारे विदयापीठांना कमी महसुल प्राप्त होत असून त्यामध्ये वाढ होण्यास संधी आहे. राज्यातील या उत्पादनांच्या चाचणीचे दर हे शेजारील राज्यांमधील दरापेक्षा जास्त असल्याने काही उत्पादक बाहेरील राज्यांकडून या चाचण्या करून घेतात. यासाठी उत्पादन चाचणीचे दर हे इतर राज्यातील दरांच्या तुलनेत स्पर्धात्मक असणे आवश्यक आहे. त्यानुसार उत्पादन चाचणी शुल्काबाबत संचालक संशोधन समन्वय समितीमध्ये विचारविनिमय होवून उत्पादन चाचणीसाठी येणारा संभाव्य खर्च विचारात घेवून त्यावर संस्थात्मक शुल्क आकारून चाचणी शुल्क निश्चित करणे आवश्यक आहे.

### १.७.३. विविध फळपिकांच्या रोपवाटिकांव्दारे प्राप्त महसूलाबाबत

कृषि विद्यापीठांतर्गत महाविद्यालये, कृषि विद्यालये, कृषि विज्ञान केंद्रे आणि विविध विभागीय व इतर संशोधन केंद्रांच्या ठिकाणी विविध फळपिकांच्या रोपवाटिका आहेत. त्याव्दारे विद्यापीठांना मिळणाऱ्या महसूलाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| विद्यापीठाचे नाव | कलमे व रोपे याद्वारे मिळालेले उत्पन्न (रू. कोटी) | | | |
|---|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | एकूण |
| मफुकृवि, राहुरी | २.२२ | ५.६५ | ४.८९ | १२.७६ |
| डॉ.पंदेकृवि,अकोला | १.१० | ०.९० | ०.७२ | ०२.७२ |
| वनामकृवि,परभणी | ०.८७ | ०.७२ | ०.५१ | ०२.१० |
| डॉ.बासाकोकृवि,दापोली | ०.४१ | ०.३७ | ०.५५ | १.३३ |
| **एकूण** | **४.६०** | **७.६४** | **६.६७** | **१८.९१** |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता, विद्यापीठांना कलमे व रोपे विक्रीतून मोठया प्रमाणात महसूल मिळण्यास वाव असल्याचे निदर्शनास येते. त्यासाठी संरक्षित शेती व यांत्रिकीकरण, स्वयंचलन यासारख्या अत्याधुनिक उच्च तंत्रज्ञानाचा वापर करून आदर्श रोपवाटीका विकसित करून फळपिकांच्या कलमे व रोपांची मोठया प्रमाणात विक्री करावी. सर्व कृषि विद्यापीठांच्या रोपवाटीकांचे प्रमाणिकरण करण्यात यावे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना उच्च दर्जाच्या फळपिकांची कलमे व रोपे उपलब्ध होतील. याद्वारे विद्यापीठांच्या महसूलामध्ये वाढ होऊन शासनावरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी होवू शकते.

### १.७.४. कृषि अवजारे व यंत्रे यांच्या चाचणीद्वारे मिळणाऱ्या महसूलाबाबत

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार, खाजगी उत्पादकांकडून तयार करण्यात येणाऱ्या कृषि अवजारे व यंत्रे यांची कृषि विद्यापीठांच्या कृषि अवजारे चाचणी व प्रशिक्षण केंद्रामार्फत भारतीय मानकांनुसार चाचणी करण्यात येवून अहवाल दिला जातो. कृषि विदयापीठांना अवजारे व यंत्रे यांच्या चाचणीद्वारे मिळणाऱ्या महसूलाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| विद्यापीठाचे नाव | अवजारे व यंत्रे याद्वारे मिळालेले उत्पन्न (रू. कोटी) | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
| मफुकृवि, राहुरी | ०.११ | ०.०७ | ०.११ |
| डॉ.पंदेकृवि, अकोला | ० | ० | ० |
| वनामकृवि, परभणी | ० | ० | ० |
| डॉ.बासाकोकृवि, दापोली | ० | ० | ० |
| **एकूण** | **०.११** | **०.०७** | **०.११** |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता, कृषि अवजारे व यंत्रे या माध्यमातून अत्यल्प प्रमाणात महसूल प्राप्त होत आहे. प्रत्येक कृषि विदयापीठांकडे कृषि तंत्रज्ञानाच्या विकासासाठी कृषि अभियांत्रिकी महाविदयालयांची स्थापना केली असून त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांना उपयुक्त अशी यंत्रे / अवजारे व तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी संशोधन करणे अपेक्षित आहे. खाजगी उत्पादकांकडून तयार केलेल्या विविध कृषि अवजारांच्या चाचण्या या कृषि विदयापीठांकडून करण्यात येतात. सदरच्या चाचणीचे दर हे अवाजवी असल्याने खाजगी उत्पादक या चाचण्या विदयापीठांकडून घेण्याचे टाळतात. परिणामी राज्यातील शेती क्षेत्रातील यांत्रिकीकरण व उच्च तंत्रज्ञानाचा वापर याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही.

सबब, कृषि अवजारे व यंत्रे यांच्या चाचण्यांचे दर हे व्यवहार्य असणे आवश्यक असून त्यासाठी सदरच्या चाचण्यांसाठी येणारा खर्च विचारात घेवून त्यावर वाजवी संस्थात्मक शुल्क आकारून या चाचण्यांचे दर निश्चित करण्यात यावेत. त्याचबरोबर विद्यापीठांनी शेतकऱ्यांची क्षेत्रधारणा विचारात घेवून अल्प व अत्यल्प शेतकऱ्यांना किफायतशीर ठरतील अशी कृषि अवजारे व यंत्रे यामध्ये संशोधनाचे भरीव काम करून शेतकऱ्यांच्या गरजेनुसार नवनवीन अवजारे व यंत्रे तयार करुन त्यांचा प्रचार व प्रसार करावा.

### १.८. नविन स्थापन झालेल्या महाविद्यालयांचा योजनेत्तर योजनेत समावेश करण्याबाबत

राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांमध्ये नवीन शासकीय कृषि व संलग्न महाविद्यालये सुरू करण्यात आली आहेत. नवीन स्थापित झालेल्या महाविद्यालयांचे ठराविक कालावधीनंतर योजनांतर्गत योजनेतून योजनेत्तर योजनेत समावेश करणे आवश्यक आहे. याबाबतची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नसल्याने योजनेत्तर योजनांचे वेतन या लेखाशीर्षात नवीन महाविद्यालयांचे अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन अदायगी करता येत नाही व योजनांतर्गत योजनेचा निधी प्राप्त होण्यास विलंब होत असल्याने अधिकारी व कर्मचारी यांना वेळेत वेतन मिळत नाही. ही बाब विचारात घेवून कृषि विद्यापीठांनी शासनाकडे प्रस्ताव सादर करून पाठपुरावा करावा.

### ५.९ उपलेखाशिर्ष -१० कंत्राटी सेवा या खाली निधीची तरतूद उपलब्ध करून देण्याबाबत

राज्यातील सर्व विद्यापीठांकडे शिक्षक व शिक्षकेत्तर संवर्गातील सुमारे ५० टक्के पेक्षा जास्त पदे रिक्त आहेत. या रिक्त जागांवर कंत्राटी तत्वावर घेतलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन अदायगीसाठी शासनाकडून १०-कंत्राटी सेवा उपलेखाशीर्षाखाली निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने कृषि विद्यापीठांचे शिक्षण व संशोधन कार्य सुरळीत होण्यासाठी शासनाने इतर विभागांप्रमाणेच कृषि विद्यापीठांना १०-कंत्राटी सेवा हे उपलेखाशीर्ष उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

### ५.१०. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत ७५:२५ संशोधन प्रकल्पांना राज्याकडील २५ टक्के हिस्सा मिळणेबाबत

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचेकडून कृषि क्षेत्रातील संशोधनासाठी काही योजना राबविण्यात येतात. सदरच्या योजनांसाठी आवश्यक असणारा निधी भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचेकडून व राज्य शासनाकडून ७५:२५ या प्रमाणात उपलब्ध करून दिला जातो. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचेकडून देण्यात येणारा ७५ टक्के निधी विद्यापीठांना नियमित स्वरूपात मिळतो. तथापि राज्य शासनाकडून २५ टक्के हिस्स्याचे पूर्ण अनुदान विद्यापीठांना प्राप्त होत नाही. राज्य शासनाच्या २५ टक्के अनुदानाची पूर्ण रक्कम विद्यापीठांना प्राप्त न झाल्याने तसेच सदरचा खर्च हा वेतनावर असल्याने व तो अनिवार्य असल्याने हा खर्च विद्यापीठ महसुली उत्पन्नातून करावा लागतो. विद्यापीठ महसूलाचा मोठा भाग या वेतनावर खर्च होतो. परिणामी विद्यापीठांना त्यांच्या महसूलातून करण्यात येणाऱ्या संशोधनात्मक व शिक्षण विस्तारासारख्या बाबींवरील खर्चावर मर्यादा येतात.

**भाकृअप व राज्य शासन यांचा ७५:२५ प्रमाणात मिळालेल्या अनुदानाचा तपशील पुढीलप्रमाणे**

(रुपये- कोटी)

| विदयापीठ | भाकृअप ७५% | राज्य शासन २५% | प्राप्त निधी | निधी तफावत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| **सन २०२०-२१** | | | | | |
| राहुरी | २४.२८ | ८.०९ | ५.०० | ३.०९ | ४०.४६ |
| अकोला | ११.६८ | ३.९० | २.४० | १.५० | १९.४८ |
| परभणी | ११.५५ | २.८८ | १.२३ | १.६५ | १७.३१ |
| दापोली | ७.०८ | २.३६ | ०.९६ | १.४० | ११.८० |
| **एकूण** | **५४.५९** | **१७.२३** | **९.५९** | **७.६४** | **८९.०५** |
| **सन २०२१-२२** | | | | | |
| राहुरी | २८.५१ | ९.५० | २.५० | ७.०० | ४७.५१ |
| अकोला | १३.४६ | ४.४९ | ३.५० | ०.९९ | २२.४४ |
| परभणी | १४.९७ | ३.७४ | ३.२६ | ०.४८ | २२.४५ |
| दापोली | ७.९५ | २.६५ | १.८३ | ०.८२ | १३.२५ |
| **एकूण** | **६४.८९** | **२०.३८** | **११.०९** | **९.२९** | **१०५.६५** |
| **सन २०२१-२२** | | | | | |
| राहुरी | २५.८० | ८.६० | ७.२९ | १.३० | ४२.९९ |
| अकोला | १५.३२ | ५.१० | ३.५० | १.६० | २५.५२ |
| परभणी | ११.५५ | २.८८ | १.३८ | १.५० | १७.३१ |
| दापोली | ८.३५ | २.७८ | २.४५ | ०.३३ | १३.९१ |
| **एकूण** | **६१.०२** | **१९.३६** | **१४.६२** | **४.७३** | **९९.७३** |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता राज्य शासनाकडून २५ टक्केची रक्कम दरवर्षी कमी प्राप्त झाल्याचे निदर्शनास येते. सदर निधी हा वेतनावरील असल्याने या बाबीसाठी विद्यापीठांच्या महसूलातील उत्पन्नाचा मोठा भाग खर्च करावा लागतो. याचा विद्यापीठांच्या शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण कार्यावर परिणाम होतो. सबब, २५ टक्के प्रमाणे राज्य शासनाकडून देय असलेला निधी विद्यापीठांना नियमित मिळणे आवश्यक आहे.

### ५.११. खाजगी महाविद्यालयांकडून संलग्नता शुल्क आकारण्याबाबत

राज्यातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये एकूण १५८ कृषि व संलग्न महाविद्यालये कार्यरत आहेत. त्यांच्या संलग्नतेचे नुतनीकरण करणे, शिक्षकवर्गीय पदांची भरती, विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे, पेपर तपासणे, निकाल जाहीर करणे, गुणवत्ता तपासणे, त्यांचे संनियंत्रण करणे आणि शैक्षणिक अभिलेख जतन करणे इत्यादी कामे विद्यापीठांना करावी लागतात. त्यासाठी विद्यापीठाचे मनुष्यबळ वापरावे लागते. याचा आर्थिक बोजा विद्यापीठांवर पडतो. याकरिता राज्यातील इतर खाजगी क्षेत्रातील व्यावसायिक अभ्यासक्रमाप्रमाणेच कृषि व संलग्न खाजगी महाविद्यालयांकडून संलग्नता शुल्कापोटी दरवर्षी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क व प्रवेश क्षमता विचारात घेवून संलग्नता शुल्क निश्चित करण्यात यावे. याबाबत कृषि विद्यापीठांनी सामायिक धोरण निश्चित करावे.

### ५.१२. वेतन निश्चितीच्या पडताळणीसाठी पथक निर्मिती करणे बाबत

विद्यापीठातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना राज्य शासनाकडून वेतन व भत्ते यांची अदायगी करण्यात येते. सदरचे वेतन व भत्ते राज्य शासनाकडून विविध वेतन आयोगाच्या तरतुदीनुसार देण्यात येतात. शासनाकडील विविध वेतन

विषयक शासन निर्णयानुसार अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनाची वेतन निश्चिती करण्यात येते. संबंधीत कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडून अशी वेतन निश्चिती करण्यात येते. सदरच्या वेतन निश्चितीच्या पडताळणीसाठी शासकीय यंत्रणा नसल्यामुळे वेतन निश्चितीची योग्य पध्दतीने पडताळणी होत नाही. परिणामी अधिकारी कर्मचारी यांना वेतनाचे अतिप्रदान झाल्याची बरीच प्रकरणे उद्‌भवत आहेत. तसेच याबाबत लेखा परिक्षणातही काही आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. राज्य शासकीय विभागातील कर्मचा-यांच्या वेतन निश्चितीच्या पडताळणीसाठी विभागीय स्तरावर वेतन पडताळणी पथक कार्यरत आहे. त्याप्रमाणे कृषि विदयापीठातील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन निश्चितीच्या पडताळणीसाठी वित्त विभागातील तज्ञ अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश असलेल्या पथकाची निर्मिती करणे आवश्यक आहे. यासाठी शासनस्तरावरून धोरणात्मक निर्णय होवून कृषि परीषद स्तरावर सामायिक वेतन पडताळणी पथक निर्माण करणे आवश्यक आहे.

### ५.१३. कृषि परिषद व कृषि विद्यापीठांना वित्त विषयक मार्गदर्शक सूचना

१. कृषि विद्यापीठांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील जमीन वापराचा बृहत आराखडा तयार करुन त्यानुसार संपूर्ण जमीन कार्यक्षम वापराखाली आणावी. विद्यापीठ प्रक्षेत्र व्यवस्थापनासाठी स्वतंत्र प्रक्षेत्र संचालक व त्यांच्या अधिनस्त आवश्यक कुशल व अकुशल मनुष्यबळ उपलब्धतेच्या अनुषंगाने आवश्यक प्रस्ताव शासनास सादर करावा.

२. कृषि विद्यापीठांना बियाणे, कलमे व रोपे, कृषि निविष्ठा, कृषि अवजारे, उत्पादन चाचणी शुल्क याद्वारे स्व-उत्पन्नाची साधने वाढविण्यास वाव आहे. त्यासाठी कृषि विद्यापीठांनी प्रयत्न करावेत.

३. कृषि विद्यापीठांना जिल्हा नियोजन समिती, आदिवासी विकास विभाग, सी.एस.आर., राष्ट्रीय कृषि विकास योजना, खाजगी उद्योजक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्था यांचेशी सामंजस्य करार करून निधी प्राप्त करून घेण्यास भरपूर संधी आहेत. त्यासाठी कृषि विदयापीठांनी सातत्यपूर्ण प्रयत्नशील रहावे.

४. राज्यातील उत्पादन चाचणी शुल्काची पुनर्पडताळणी करुन चाचणीसाठी येणारा वाजवी खर्च विचारात घेवून त्यावर संस्थात्मक शुल्क आकारून विद्यापीठस्तरावर दर निश्चित करावेत.

५. सर्व कृषि विद्यापीठांनी संरक्षित शेती व यांत्रिकीकरण, स्वयंचलन यांसारख्या अत्याधुनिक उच्च तंत्रज्ञानाचा वापर करून आदर्श रोपवाटीका विकसित करून फळपिकांची कलमे व रोपे शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावीत.

६. सर्व कृषि विद्यापीठांनी शेतकऱ्यांची क्षेत्रधारणा विचारात घेवून अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना किफायतशीर ठरतील अशी अवजारे व यंत्रे विकसित करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावीत.

७. कृषि विद्यापीठांच्या जमिनींच्या कार्यक्षम वापरासाठी प्रत्येक कृषि विद्यापीठामध्ये एक प्रक्षेत्र संचालक आणि कृषि विद्यापीठाकडे असलेल्या क्षेत्राचा विचार करून गरजेनुसार पदांची निर्मिती करणे अत्यंत निकडीचे आहे. यासाठी कृषि विद्यापीठांनी शासनाकडे परिपुर्ण प्रस्ताव सादर करावेत.

८. राज्यातील इतर खाजगी क्षेत्रातील व्यावसायिक अभ्यासक्रमाप्रमाणेच कृषि व संलग्न खाजगी महाविद्यालयांकडून संलग्नता शुल्कापोटी दरवर्षी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क व प्रवेश क्षमता विचारात घेवून संलग्नता शुल्क निश्चित करण्यात यावे. याबाबत कृषि विद्यापीठांनी सामायिक धोरण निश्चित करावे.

### ५.१४. राज्य शासनास वित्त विषयक शिफारशी

१. राज्यातील कृषि विदयापीठांना मागील तीन वर्षांच्या अर्थसंकल्पीय तरतुदींचा विचार करता मंजुर अनुदानापेक्षा सुमारे १५ टक्के कमी अनुदान प्राप्त झाले आहे. याकरीता कृषि विदयापीठांना शासनाकडून मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीप्रमाणे संपूर्ण निधी वितरीत करण्यात यावा.

२. अन्नसुरक्षा आणि कृषि क्षेत्राचा शाश्वत विकास यासाठी राज्याच्या स्थूल कृषि उत्पन्नाच्या (जी.डी.पी.) किमान एक टक्के रक्कम कृषि शिक्षण व संशोधनाकरिता कृषि विद्यापीठांना उपलब्ध करून द्यावी.

३. कृषि विद्यापीठांच्या जमिनींच्या कार्यक्षम वापरासाठी प्रत्येक कृषि विद्यापीठामध्ये एक प्रक्षेत्र संचालक आणि त्यांच्याकडे असलेल्या क्षेत्राचा विचार करून गरजेनुसार पदांची निर्मिती करणे अत्यंत निकडीचे आहे. यासाठी शासनाने कृषि विद्यापीठाकडून प्रस्ताव मागवून आवश्यक पदांना मंजूरी देण्यात यावी.

४. कृषि विदयापीठांमध्ये प्रशासकीय बाबींच्या अनुषंगाने करण्यात येणा-या विविध आकस्मिक खर्चांसाठी शासन निर्णय दिनांक- १८/१२/२००० नुसार शासनाकडून देण्यात येणारे वेतनेत्तर अनुदान हे वेतनावरील अनुदानाच्या १० टक्के या प्रमाणात नियमित देण्यात यावे.

५. कृषि विदयापीठामार्फत उत्पादीत करण्यात येत असलेले पैदासकार आणि पायाभूत बियाणे गुणवत्तापूर्ण आणि विश्वासार्ह असून बियाणे श्रृंखलेचा पाया आहे. हे बियाणे तज्ञ-शास्त्रज्ञाचे देखरेखीखाली काटेकोर निकषांच्या आधारे उत्पादीत होत असल्याने त्यांचा उत्पादन खर्च जास्त आहे. त्यामुळे पायाभूत बियाणाचा दर हा प्रमाणित बियाणे दराच्या दीड पट आणि पैदासकार बियाणाचा दर हा प्रमाणित बियाणे दराच्या दुप्पट या तत्वावर निश्चित करण्यात यावा.

६. शासनाकडून नव्याने स्थापित झालेल्या शासकीय कृषि व संलग्न महाविदयालयांच्या खर्चाची आर्थिक तरतूद पाच वर्षानंतर योजनांतर्गत योजनेतून योजनेत्तर योजनेत समावेश करावा.

७. कंत्राटी प्राध्यापक व कर्मचा-यांच्या वेतन अदायगी करण्यासाठी राज्य शासनाच्या इतर विभागाप्रमाणेच कृषि विद्यापीठांना १०-कंत्राटी सेवा हे उपलेखाशीर्ष उपलब्ध करून देण्यात यावे.

८. भारतीय कृषि अनुसंधान परिषद अनुदानित ७५:२५ कार्यक्रम योजनेखालील कर्मचा-यांच्या वेतनासाठी राज्य शासनाकडून देय असलेली २५ टक्के रक्कम नियमितपणे कृषि विदयापीठांना उपलब्ध करून देण्यात यावी.

९. विदयापीठांतील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन निश्चितीच्या पडताळणीसाठी शासनस्तरावरून धोरणात्मक निर्णय होवून कृषि परीषद स्तरावर सामायिक वेतन पडताळणी पथक निर्माण करण्यात यावे.

# ६. साधन सामुग्री विकास

**कार्यकक्षा :** कृषि विद्यापीठांकडे असलेल्या जमिनीसंदर्भात संरक्षण व व्यवस्थापन करीता उपाययोजना सुचविणे.

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेतील संचालक, साधन सामुग्री विकास यांच्याकडे विद्यापीठांच्या मालमत्ता आणि साधन सामुग्री यांचे संरक्षण, संवर्धन, व्यवस्थापन व सनियंत्रण या संदर्भात खालीलप्रमाणे जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

१. राज्यातील कृषी विद्यापीठांकडील बांधकामे, उपकरणे खरेदी प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणे व त्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार निधीसाठी शासनास शिफारस करणे,
२. जमीन हस्तांतरण, खरेदी, वापर व इतर अनुषंगीक बाबी विषयक आवश्यकतेनुसार कार्यवाही करणे.

राज्यातील कृषि विद्यापीठांची एकूण जमीन १५,६८२.५९ हेक्टर एवढी आहे. विद्यापीठनिहाय जमिनीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| विद्यापीठाचे नाव | क्षेत्र (हे.) |
|---|---|
| महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | ४७६२.१४ |
| डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | ५०५९.४४ |
| वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | ३७८८.५७ |
| डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली | २०७२.४४ |
| **एकूण** | **१५६८२.५९** |

या जमिनी एक ठिकाणी नसून विद्यापीठाचा मध्यवर्ती परिसर, कार्यक्षेत्रातील शासकीय कृषि व संलग्न महाविद्यालये, कृषि संशोधन केंद्र, कृषि तंत्र महाविद्यालये, कृषि तंत्र निकेतने, कृषि विज्ञान केंद्र यांच्या वापरासाठी त्या त्या विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रातील विविध जिल्हयांत विखुरलेल्या आहेत. अर्थात त्यातील मोठा हिस्सा हा प्रत्येक विद्यापीठाच्या मध्यवर्ती परिसरात आहे.

राज्य शासनाने ठरवून दिलेल्या कार्यकक्षेनुसार विद्यापीठांच्या जमिनी, इमारती व इतर स्थावर मालमत्ता संदर्भात संरक्षण व व्यवस्थापनाकरिता उपाययोजना सुचविण्याच्या अनुषंगाने माहिती संकलित करून अभ्यास करण्यासाठी कृषि परिषदेचे महासंचालक श्री. रावसाहेब भागडे यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे उपसमिती स्थापन करण्यात आली.

| अ.क्र. | उपसमिती | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. रावसाहेब भागडे, महासंचालक, कृषि परिषद, पुणे | अध्यक्ष |
| २. | कुलसचिव, मफुकृवि, राहुरी | सदस्य |
| ३. | कुलसचिव, डॉ. पंदेकृवि, अकोला | सदस्य |
| ४. | कुलसचिव, वनामकृवि, परभणी | सदस्य |
| ५. | कुलसचिव, डॉ. बासाकोकृवि, दापोली | सदस्य |
| ६. | विद्यापीठ अभियंता, वनामकृवि, परभणी | सदस्य |
| ७. | डॉ. वैभव शिंदे, सहसंचालक प्रशासन, कृषि परिषद, पुणे | सदस्य सचिव |

सदर उपसमितीने विद्यापीठांच्या अखत्यारीतील सर्व जमिनींच्या वापराची सद्यस्थिती, बांधकाम झालेल्या इमारती तसेच इमारतींचे संरचनात्मक परिक्षण (Structural Audit) याचा आढावा घेवून आणि सर्व संबंधितांशी विचार-विनिमय करून अहवाल तयार केला आहे.

## ६.१. विद्यापीठांच्या अखत्यारीतील जमिनीचे संरक्षण आणि व्यवस्थापनाकरिता उपाययोजना

राज्यातील कृषि विद्यापीठांची एकूण जमिन १५६८२.५९ हेक्टर आहे. कृषि विद्यापीठांच्या मालकीच्या व ताब्यातील जमिनीबाबत माहिती घेतली असता असे निदर्शनास आले आहे की, शासनाकडून व इतर विभागाकडून कृषि विद्यापीठांकडे वर्ग झालेल्या जमिनी तसेच खाजगी शेतकऱ्याकडून संपादीत केलेल्या अनेक जमिनींच्या नोंदी महसूल विभागाच्या अभिलेख्यात अद्यावत करण्यात आलेल्या नाहीत. उदा. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत हिमायत बाग, छत्रपती संभाजीनगर येथील भुमापन क्र. ११७/२ ही जमीन अनेक वर्षांपासून विद्यापीठाच्या फळबाग संशोधन केंद्राच्या ताब्यात आहे. तथापि, सद्यस्थितीत या जमिनीच्या ७/१२ सदरी सिडकोचे नाव आहे. नागरिकीकरण व औद्योगिकीकरणामुळे कृषि विद्यापीठांच्या अनेक जमिनी शहरांच्या मध्यवर्ती किंवा शहरालगत मोक्याच्या ठिकाणी आल्या आहेत. त्यामुळे, मोठया प्रमाणात अतिक्रमणे होत आहेत व त्याअनुषंगाने अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवत आहेत. विद्यापीठांच्या जमिनीचे महसुली अभिलेख अद्यावत नसल्याने न्यायालयीन प्रकरणात त्यांची बाजू परिणामकारकरित्या मांडता येत नाही. संपादित केलेल्या काही जमिनी आजही मूळ मालकांच्या नावावर असल्याने परस्पर हस्तांतर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच मूळ मालक अशा जमिनीवर बँकेचे कर्ज घेवून किंवा अन्य प्रकारे बोजा निर्माण करू शकतात. यासर्व बाबींमुळे जमिनीच्या मालकी हक्कांबाबत गुंतागुंत निर्माण होऊन विद्यापीठाच्या मौल्यवान अशा स्थावर मालमत्तेचे नुकसान होवू शकते. यामध्ये मुख्यत: खालील चार बाबींवर तातडीने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

१) विद्यापीठांकडील जमिनींचे अभिलेख अद्यावत करणे,
२) विद्यापीठांकडील सर्व जमिनीची मोजणी करणे,
३) विद्यापीठांकडील जमिनीचे संरक्षण करणे,
४) विद्यापीठांकडील जमिनीवर झालेले अतिक्रमण दूर करणे.

### ६.१.१. विद्यापीठाकडील जमिनीचे अभिलेख अद्यावत करणे

कृषि विद्यापीठांच्या मालकीच्या आणि ताब्यातील सर्व जमिनींचे अधिकार अभिलेख अद्यावत करण्याची विशेष मोहिम हाती घेण्यात यावी. दरवर्षी नियमितपणे ७/१२ च्या नोंदी महसूल खात्याकडून मिळवून तपासून घेण्यात याव्यात आणि ७/१२ च्या प्रती संबंधित विद्यापीठाच्या कुलसचिवांनी जतन करून ठेवाव्यात. शासनाने महसूली अभिलेखाचे संगणकीकरण केले असून महसूल खात्याच्या महाभूलेख (Mahabhulekh) या संकेतस्थळावर सर्व माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यावरून विविध प्रकारचे अभिलेख डाऊनलोड करण्याची सुविधा देखिल उपलब्ध आहे. या सुविधेचा सर्व विद्यापीठांनी लाभ घ्यावा. यासंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

- महाभूलेख या संकेतस्थळावर जाऊन डिजीटल ७/१२ प्राप्त करुन त्यांची तपासणी करणे.
- तपासणी नंतर ज्या चुका निदर्शनास येतील त्या ७/१२ चे दुरुस्तीसाठी प्रथम जमीन संपादित केलेली असल्यास त्याबाबतचा निवाडा व अनुषंगिक दस्तावेज शोधून महसूल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून चूकांची दुरूस्ती करून घेणे.
- कृषि विद्यापीठांनी त्यांच्या जमिनीच्या संदर्भात स्वतंत्र जमीन मालमत्ता नोंदवही तयार करावी. या नोंदवहीत सर्व जमिनीची मालकी व ताबा विद्यापीठाकडे शासकीय जमीन हस्तांतरण/ खाजगी जमीन संपादनाद्वारे/ भाडे कराराने (Lease) किंवा अन्य कोणत्या कारणाने झाले याबाबतचा एक स्वतंत्र रकाना तयार करून नोंदी अद्यावत कराव्यात.
- ज्या जमिनी भाडे कराराने घेतल्या असतील त्या जमिनींबाबत भाडे कराराची मुदत संपण्यापूर्वीच त्यांचे नूतनीकरण करून घ्यावे.
- सर्वे नं. / गट नं. चे नकाशे, संबंधित गाव नकाशे इत्यादी अभिलेख सुध्दा संबंधीत संशोधन केंद्र, विद्यालये, महाविद्यालये, कृषि विज्ञान केंद्र, विद्यापीठाकडे उपलब्ध असावेत.

कृषि विद्यापीठांच्या जमिनींचे अभिलेख अद्यावत करणे, जतन करणे व जमिनींची मोजणी करणे याकरीता सर्व विद्यापीठांमध्ये खालीलप्रमाणे किमान पदांची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | पद | संख्या |
|---|---|---|
| १. | उपजिल्हाधिकारी / तहसीलदार | ०१ |
| २. | मंडळ अधिकारी | ०१ |
| ३. | जमीन मोजणीदार | ०२ |
| ४. | तलाठी | ०२ |
| ५. | लिपीक | ०२ |
| ६. | शिपाई | ०४ |
| ७. | वाहनचालक | ०१ |
| | एकूण | १३ |

वर नमूद केलेली पदे राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीने अथवा सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या कंत्राटी पध्दतीने नियुक्तीद्वारे भरता येवू शकतील. या पथकास आवश्यकतेनुसार वाहन व इतर अनुषंगिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

### ६.१.२. विद्यापीठांकडील सर्व जमिनींची मोजणी करणे

विद्यापीठांकडील जे अधिकारी/ कर्मचारी ज्यांना जमिनीच्या हद्दी/ खुणा माहित आहेत असे कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत. नव्याने रुजु झालेले अधिकारी/ कर्मचारी यांना हद्दी/ खुणा माहित असतीलच असे नाही. तसेच विद्यापीठांकडील अनेक ठिकाणच्या जमिनींची मोजणी होवून हद्दी आणि खुणा निश्चित करण्यात आलेल्या नाहीत. काही जमिनींचे नकाशे देखील विद्यापीठांकडे उपलब्ध नाहीत. याबाबत विद्यापीठस्तरावर सविस्तर आढावा घेवून विद्यापीठांच्या जमिनींची नव्याने मोजणी करून हद्दी आणि खुणा निश्चित करण्यात याव्यात आणि विद्यापीठाच्या मालकीच्या जमिनीचे नकाशे अद्यावत करून जतन करण्यात यावेत. यासंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही अपेक्षित आहे.

- जमिनीची मोजणी करण्यासाठी भूमी अभिलेख विभागाकडे अर्ज करणे आवश्यक आहे. भूमी अभिलेख विभागाने तात्काळ मोजणीचे काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास विद्यापीठाने स्वत: जमिनीची मोजणी भूमी अभिलेख विभागाकडील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी कंत्राटी पध्दतीने घेवून मोजणी करून घ्यावी. त्यासाठी Etios किंवा Rover मशीनची खरेदी करण्यात यावी. ज्या ठिकाणी अतिक्रमण नाही किंवा वाद नाही अशा ठिकाणी कंत्राटी मोजणीदार हे जमिनीची स्वत: मोजणी करुन घेतील व अतिक्रमण असलेल्या ठिकाणी, गावालगतच्या व हायवेलगतच्या जमिनीच्या मोजणीसाठी भूमी अभिलेख विभागाकडे ऑनलाईन अर्ज करण्यात यावा व त्यांच्या मार्फत सदर जमिनीची मोजणी करण्यात यावी. यासाठी प्रत्येक कृषि विद्यापीठामध्ये दोन सेवानिवृत्त मोजणीदार व त्यांच्या मदतीला दोन शिपाई अशी एकूण ४ पदे कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात यावीत. वरील मोजणीदार हे उपजिल्हाधिकारी / तहसिलदार यांचे अधिनस्त काम करतील.

### ६.१.३ विद्यापीठांकडील जमिनीचे संरक्षण करणे

चारही कृषि विद्यापीठांची एकूण जमीन १५६८२.५९ हेक्टर आहे, असे वर नमूद केलेले आहे. अनेक ठिकाणच्या जमिनी शहर / मोठी गावे किंवा महामार्गालगत आहेत. अशा जमिनींच्या संरक्षणासाठी पुरेशा उपाययोजना न झाल्यामुळे मोठया प्रमाणावर अतिक्रमणे होत आहेत. सद्यस्थितीत काही जमिनी या विनावापर पडून असल्यामुळे त्यावर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

- विद्यापीठांकडील जमिनीचे संरक्षण करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात यावी. जमिनीचे स्थळ, लागवडी योग्य जमीन, पडीक जमीन, अकृषि क्षमता आणि अतिक्रमण प्रवण क्षेत्र असे वर्गीकरण करण्यात येवून जमिनीच्या वापर क्षमतेनुसार संरक्षणासाठी खालीलप्रमाणे सुयोग्य नियोजन करण्यात यावे,
- जमिनी या शहरालगत / गावालगत असल्यास त्यासाठी पक्के बांधकाम असलेली संरक्षक भिंत बांधणे,

- जिथे आवश्यक असेल तिथे जाळीचे कंपाऊड करणे,
- वहितीखालील जमिनीं सभोवती चर खोदणे आणि / किंवा सजीव कुंपण तयार करणे,
- विद्यापीठांकडील असलेल्या जमिनीच्या प्रत्येक सर्वे नं. / गट नं मध्ये रोड लगत जमिनीच्या मालकीचे बोर्ड लावणे,
- मोजणी झाल्यानंतर विशिष्ट क्रमांक देऊन हद्दी व खुणा दगड / सिमेंट पोल लावून निश्चित करणे,
- विद्यापीठांतर्गत नियुक्त उपजिल्हाधिकारी / तहसिलदार यांचे नियंत्रणाखाली स्वतंत्र पथक नेमून कृषि विद्यापीठांच्या जमिनीच्या संरक्षणाची व अतिक्रमण रोखण्याची जबाबदारी सोपविणे.

### ६.१.४ विद्यापीठांकडील जमिनीवर झालेले अतिक्रमण काढणे.

- जमिनीची मोजणी झाल्यानंतर अतिक्रमण निदर्शनास आल्यास तात्काळ विशेष मोहिम राबवून अतिक्रमण निष्कासित करावीत,
- अतिक्रमणे होऊ नये किंवा झालेले अतिक्रमण काढण्यास मदत व्हावी या करीता महाराष्ट्र पोलीस सुरक्षा महामंडळ किंव माजी सैनिक सुरक्षा महामंडळ यांचेकडील सशुल्क सेवा उपलब्ध करुन घ्याव्यात.
- ठराविक कालावधीसाठी अतिक्रमण हटाव विशेष पथक तयार करुन अतिक्रमण काढावे आणि जमिनीचे संरक्षण करावे.
- जिथे आवश्यक आहे, तिथे पोलीस बंदोबस्त घ्यावा. विना मोबदला पोलीस बंदोबस्त न मिळाल्यास किंवा लवकर मिळत नसल्यास बंदोबस्तासाठी आवश्यक असलेले अधिकारी / कर्मचारी यांचे बंदोबस्तासाठीचे शुल्क पोलीस विभागाकडे भरल्यास तात्काळ पोलीस बंदोबस्त उपलब्ध होवू शकेल व त्यानुसार त्यांच्या मदतीने अतिक्रमण काढणे सुलभ होईल.

## ६.२ कृषि विद्यापीठांकडील इमारतींची माहिती

**गोषवारा**

| विद्यापीठाचे नाव | एकूण इमारती | | वापरात असलेल्या इमारती | | वापरात नसलेल्या इमारती | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | क्षेत्रफळ (चौ. फुट) | संख्या | क्षेत्रफळ (चौ. फुट) | संख्या | क्षेत्रफळ (चौ. फुट) |
| मफुकृवि, राहुरी | ११२९ | ५३९९२९६.०० | ९४५ | ५०३३०६०.०० | १८४ | ३६६२३६.०० |
| डॉ. पंदेकृवि, अकोला | ६१८ | २३२२१५४.६९ | ५४१ | २२१७७१६.६८ | ७७ | १०४४३८.०१ |
| वनामकृवि, परभणी | ६५७ | १९६३६८२.६५ | ६०४ | १९४६९९५.४६ | ५३ | १६६८७.१९ |
| डॉ.बासाकोकृवि, दापोली | ५६९ | १७५०१५०.९० | ५४१ | १६८०१५३.६५ | २८ | ६९९९७.२५ |
| **एकूण** | **२९७३** | **११४३५२८४.२४** | **२६३१** | **११४३५२८४.२४** | **३४२** | **५५७३५८.४५** |

कृषि विद्यापीठांच्या इमारतींचे संरचनात्मक परिक्षण, विद्युत सुरक्षा आणि फायर ऑडिट झालेले नाही. सुरक्षिततेच्या दृष्टीने या महत्वाच्या बाबी असल्याने सर्व कृषि विद्यापीठांनी याबाबतीत वेळीच कार्यवाही करावी. ज्या इमारती वापराविना पडून आहेत. त्यापैकी ज्या इमारती दुरुस्त करून वापरात आणणे शक्य आहे. त्यांची तात्काळ दुरुस्ती करून इमारती वापरात आणाव्यात आणि ज्या इमारती धोकादायक असून त्यांची दुरूस्ती आर्थिकदृष्टया किफायतशीर होणार नाहीत अशा इमारती पाडून टाकाव्यात व त्याखालील जमीनी योग्य त्या वापरात आणाव्यात.

## ६.३ कृषि विद्यापीठांना साधन सामुग्री विषयक मार्गदर्शक सूचना

१. कृषि विद्यापीठांमधील जमिनींचे अभिलेख अद्यावत करुन घेण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात यावी.

२. कृषि विद्यापीठांकडील सर्व जमिनींची मोजणी करण्यात यावी. त्यासाठी Etios किंवा Rover मशीनची खरेदी करण्यात यावी. अतिक्रमण असलेल्या ठिकाणी किंवा गावालगत व महामार्गालगतच्या जमिनीची मोजणी भूमीअभिलेख विभागाकडून करून घेण्यात यावी.

३. कृषि विद्यापीठाच्या जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास येताच अतिक्रमणे तात्काळ हटविण्यात यावीत.

४. विद्यापीठ जमिनीचे अभिलेख अद्यावत करणे व मोजणी करणे यासाठी सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी / तहसिलदार यांच्या नियंत्रणाखाली प्रस्तावित केल्याप्रमाणे पथकाची नियुक्ती करण्यात यावी.

५. कृषि विद्यापीठांमधील सर्व इमारतींचे संरचनात्मक परिक्षण आणि फायर व इलेक्ट्रीक ऑडिट करून घेण्यात यावेत.

६. विद्यापीठांच्या वापरात नसलेल्या सर्व इमारतींचा आढावा घेवून शक्य तेथे दुरुस्ती करून वापरायोग्य इमारतींचा सुयोग्य कारणांसाठी वापर करावा आणि ज्या इमारती दुरुस्ती करून वापरणे किफायतशीर होणार नाही अशा मोडकळीस आलेल्या जिर्ण इमारती पाडून त्याखालील जमिनी योग्य त्या वापरात आणाव्यात.

# ७. राज्य शासनास सर्वसाधारण शिफारशी

### ७.१ प्रशासन विषयक शिफारशी

१. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी तयार केलेल्या सुधारित मॉडेल ॲक्ट - २०२३ ला अनुसरून महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ मध्ये कालसुसंगत बदल करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने अधिनियमामध्ये कलम निहाय प्रस्तावित केल्याप्रमाणे सुधारणा करण्यात याव्यात.

२. महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम, १९८३ चे कलम १२ (२) क मधील तरतूदीनुसार कृषि परिषदेचे कामकाज अधिक परिणामकारक होण्यासाठी संरचनेत सुधारणा करून एकूण सदस्यांची संख्या १९ ऐवजी १३ अशी करण्यात यावी.

३. कृषि परिषदेचा अधिकारी / कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध १९८४ मध्ये मंजूर करण्यात आला आहे. मागील ४० वर्षात कृषि परिषदेच्या कार्याची व्याप्ती व वाढलेल्या जबाबदाऱ्या विचारात घेवून आकृतीबंध सुधारण्यात यावा.

४. कृषि परिषद अंतर्गत महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळाच्या कामकाजात सुसूत्रता येवून भरती प्रक्रिया सुरळीत होण्यासाठी मकृवि अधिनियमाचे कलम ५८ (२) मध्ये सुधारणा करण्यात येऊन मंडळाच्या संरचनेत प्रस्तावित केल्याप्रमाणे बदल करण्यात यावा.

५. महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम, १९८३ मधील कलम १२ (३) (ई) व (एफ) मध्ये सुधारणा करून रु. १०० लाखापेक्षा अधिक रक्कमेची बांधकामे आणि उपकरणे / यंत्रसामुग्री खरेदीच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार कृषि परिषदेस असावेत.

६. महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम १९९०, मधील परिनियम क्रमांक ४१ मध्ये सुधारणा करण्यात येवून राज्यातील चारही कृषि विद्यापीठांमधील संचालक, अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता तसेच विभाग प्रमुख या पदांकरीता पदोन्नती व सरळसेवेने नियुक्त झालेल्या प्राध्यापकांबरोबरच कारकिर्द प्रगती योजनेअंतर्गत प्राध्यापक श्रेणी प्राप्त झालेले प्राध्यापक (CAS Professor) यांना समकक्ष ठरविण्यात यावे.

७. सहायक प्राध्यापक पदावर नियुक्तीसाठी किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये सुधारणा करून संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवीसह आचार्य (पीएच.डी.) पदवी किंवा संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवीसह राष्ट्रीय योग्यता चाचणी / राज्य योग्यता चाचणी / राज्यस्तरीय योग्यता चाचणी (NET/SET/SLET) अशी करण्यात यावी.

८. विद्यापीठातील शिक्षकवर्गीय पदांवर सरळसेवा भरती प्रक्रिया आणि कारकीर्द प्रगती योजनेद्वारे पदोन्नती या दोनच माध्यमातून नियुक्ती करण्यात यावी.

९. कृषि विद्यापीठांमधील कर्मचा-यांच्या तक्रार निवारणार्थ मकृवि अधिनियम, १९८३ मधील प्रकरण १० मध्ये योग्य ती सुधारणा करून तक्रारीची सर्व प्रकरणे उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील तक्रार निवारण न्यायाधिकरणाकडे वर्ग करण्याबाबतची तरतूद करण्यात यावी.

### ७.२ कृषि शिक्षण विषयक शिफारसी

१. राज्यातील कृषि विद्यापीठांमध्ये सध्या ५० टक्के पेक्षा जास्त शिक्षकवर्गीय पदे रिक्त आहेत. तसेच प्राध्यापक आणि उच्च संवर्गातील ८० टक्के पदे रिक्त आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकवर्गीय ८० टक्के पदे कार्यरत असणे अपेक्षित आहे. ही बाब विचारात घेता सर्व कृषि विद्यापीठांतील रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत.

२. राज्यातील बहुतांश खाजगी विनाअनुदानित कृषि व संलग्न महाविद्यालयातील शैक्षणिक सुविधा अपुऱ्या असून शिक्षक वर्गाचा दर्जा अपेक्षेप्रमाणे नाही. त्यात गुणात्मक सुधारणा होण्यासाठी त्यांना भाकृअप, नवी दिल्ली यांचेकडून अधिस्विकृती (Accreditation) बंधनकारक करण्यात यावी. अधिस्विकृत महाविद्यालयांच्या संलग्नतेचे नूतनीकरण करण्यात यावे.

३. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार मनुष्यबळाचा कार्यक्षम वापर होण्यासाठी शक्य तेथे पदवी, पदव्युत्तर, आचार्य पदवी अभ्यासक्रम एकाच ठिकाणी सुरू करण्यात यावेत.
४. राज्य शासनाच्या धोरणानुसार ज्या जिल्हयात एकही शासकीय कृषि महाविद्यालय कार्यरत नाही त्या जिल्ह्यात शासनाने कृषि महाविद्यालय स्थापन करण्यास प्राधान्य द्यावे.
५. प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये कृषि हा विषय शिकविण्यासाठी कृषि व संलग्न विषयातील पदवीधारक शिक्षक अनिवार्य करावा.
६. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी पदवी अभ्यासक्रमाच्या पात्रतेबाबत केलेले निकष राज्यातील कृषि व संलग्न पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेसाठी स्विकारण्यात यावेत.
७. कृषि विद्यापीठांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांनुसार कृषि व संलग्न विषयातील नवनवीन कौशल्य आधारित प्रमाणपत्र / पदविका पदवी अभ्यासक्रम राबविण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक मूलभूत सोयीसुविधांसाठी शासनाने आवश्यक निधी उपलब्ध करुन द्यावा.
८. महाविद्यालयातील प्राध्यापकांना प्रगत व आधुनिक तंत्रज्ञानासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षण व प्रशिक्षणासाठी प्रोत्साहीत करावे. शासनाने प्राध्यापकांना परदेश दौरे व शिक्षण, प्रशिक्षणासाठी मान्यता देण्याचे अधिकार संबंधित कृषि विद्यापीठांचे कुलगुरू यांना प्रदान करण्यात यावेत.
९. कृषि महाविद्यालयांमधील डिजीटल पायाभुत सुविधांचे त्वरीत बळकटीकरण करुन ई-लर्निंग प्लॅटफॉर्मचा वापर वाढविणे आवश्यक आहे. कृषि विद्यापीठांनी एकत्रित प्रयत्नाव्दारे प्रभावी शिक्षण (Education Delivery), मूल्यमापन (Evaluation) आणि महाविद्यालयातील शिक्षकांना डिजिटल संसाधनाचा वापर करण्यासंदर्भात प्रशिक्षण (Training) आयोजित करण्यासाठी शासनाने प्रत्येक विद्यापीठास आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा.
१०. राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्पाव्दारे (NAHEP) कृषि विद्यापीठांनी निर्माण केलेल्या विविध ICT सुविधा यापुढील काळात शाश्वत आणि अद्यावत ठेवण्याकरीता तसेच डिजिटल ई-कंटेंट विकसित करण्याकरिता (e-content development) एक समर्पित ICT केंद्र (Dedicated ICT Cell) स्थापन करण्याची आवश्यकता आहे. तसेच, शैक्षणिक व्हिडीओ निर्मितीकरीता प्रत्येक कृषि विद्यापीठात दोन स्वतंत्र अद्ययावत प्रसार माध्यम स्टुडिओ (Media Studio / Virtual classroom) सुविधा निर्माण करावी. त्यासाठी शासनाने विद्यापीठास आवश्यक निधी उपलब्ध करुन द्यावा.
११. कृषि विद्यापीठात शिक्षण घेतलेल्या होतकरू व नाविन्यपूर्ण कल्पना असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या संकल्पनेचे व्यावसायिकीकरण करण्याकरिता सुविधा केंद्र (Innovation ,Incubation and Linkages Incubation Centre) स्थापन करण्यासाठी शासनाने सर्व कृषि विद्यापीठांतर्गत निवडक महाविद्यालयांना आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा.
१२. सर्व शासकीय कृषि व संलग्न महाविद्यालयातील व्याख्यान कक्षांचे डिजीटल क्लासरुम मध्ये रुपांतर करणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने प्रत्येक विद्यापीठास आवश्यक निधी उपलब्ध करुन द्यावा.

## ७.३ संशोधन व विकास विषयक शिफारशी

१. हवामान बदल आणि राज्यातील कृषि क्षेत्राची तीव्र निकड विचारात घेवून सर्व कृषि विद्यापीठांमध्ये पुढीलप्रमाणे नवीन संशोधन केंद्र स्थापन करण्यात यावीत.
१. कृषि हवामान अनुकूल तंत्रज्ञान संशोधन केंद्र,
२. काटेकोर शेती उत्कृष्टता संशोधन केंद्र (Center of Excellence for Research on Precision Farming),
३. जैव वस्तूमान (Biomass) उत्पादन व जैव इंधन (Biofuel) तंत्रज्ञान संशोधन व विकास केंद्र,
४. चारा पिके संशोधन केंद्र,
५. उच्च तंत्रज्ञानयुक्त भाजीपाला संशोधन व प्रशिक्षण केंद्र.

२. डॉ. पंदेकृवि च्या कार्यक्षेत्रात पूर्णा नदीच्या खोऱ्यामध्ये अकोला, अमरावती व बुलडाणा जिल्हयातील अंदाजे ४.५ लाख हेक्टर क्षेत्र खारपाण पट्टयाचे आहे. या जमिनींची सुधारणा करणे व त्यास अनुकूल अशा पीक पध्दती विकसित करण्यासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत योग्य त्या ठिकाणी संशोधन केंद्र सुरू करण्यात यावे.
३. कोकण विभागात ॲव्होकॅडो, रंबुतान, लोंगान व तत्सम परदेशी फळपिके आणि फणस, कोकम, करवंद, जांभूळ, आवळा इत्यादी पिकांखालील क्षेत्रात वाढ होत आहे. या सर्व पिकांवर संशोधन करण्यासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत वाकवली, जि. रत्नागिरी येथे संशोधन प्रकल्प हाती घेण्यात यावेत. त्यासाठी पायाभुत सुविधा व मनुष्यबळ आणि निधी विद्यापीठास उपलब्ध करून द्यावा.
४. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कार्यरत केळी संशोधन केंद्र, जळगाव या उप केंद्राचे रुपांतर मुख्य केंद्रात करण्यात यावे. तसेच मौजे शेलगाव (जेऊर), ता. करमाळा जि. सोलापूर येथे निर्यातक्षम केळी उत्पादन संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावे.
५. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषि संशोधन केंद्र, बुलढाणा, वाशिम व अचलपूर, जि. अमरावती येथे सध्या कार्यरत असलेल्या पडताळणी केंद्राचे बळकटीकरण करून त्यांचे रुपांतर अनुक्रमे मका व भरड धान्य, हळद व पपई आणि केळी संशोधन केंद्रात करण्यात यावे.
६. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प (NARP), छत्रपती संभाजीनगर या मुख्य केंद्राचे नामाभिधान विभागीय कृषि संशोधन केंद्र, मध्य महाराष्ट्र पठारी प्रदेश असे करण्यात यावे.
७. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषि संशोधन केंद्र, तुळजापूर, जि. धाराशिव येथील पेरसाळ संशोधन पडताळणी केंद्राचे बळकटीकरण करून त्याचे रुपांतर भरडधान्य, भाजीपाला व फुलपिके संशोधन केंद्रात करण्यात यावे.
८. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत कृषि संशोधन केंद्र, फोंडाघाट, जि. सिंधुदुर्ग या उपकेंद्रात भरडधान्य संशोधन केंद्र सुरु करण्यात यावे.
९. प्रत्येक कृषि विद्यापीठात स्थानिक गरजेनुसार संशोधन प्रकल्प हाती घेण्यासाठी दरवर्षी राज्याच्या अर्थसंकल्पात किमान १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी व सदरचा निधी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेकडे ठेवण्यात यावा आणि कृषि विद्यापीठांकडून येणाऱ्या नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्पांसाठी हा निधी कृषि परिषदेने विद्यापीठांना उपलब्ध करुन द्यावा.

## ७.४ विस्तार शिक्षण विषयक शिफारशी

१. कृषि विद्यापीठांतील कृषि विस्तार शिक्षण संचालनालयाचे कामकाज परिणामकारक होण्यासाठी विद्यापीठांच्या अंदाजपत्रकातील तरतूदीच्या किमान दोन टक्के निधी विस्तार व प्रशिक्षण कार्यासाठी राखीव ठेवण्यात यावा.
२. कृषि विद्यापीठ मुख्यालयी कार्यरत कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्रासाठी स्वतंत्र मनुष्यबळ निर्मितीस प्रस्तावित केल्याप्रमाणे मान्यता प्रदान करण्यात यावी.
३. कृषि विद्यापीठांमधील विस्तार शिक्षण संचालनालय सक्षम करण्यासाठी मुख्यालयी किमान एक उपसंचालक कृषि विस्तार शिक्षण (सहयोगी प्राध्यापक समकक्ष) असे पद नव्याने निर्माण करण्यात यावे.
४. कृषि तंत्रज्ञान विस्तार आणि प्रशिक्षणाचे कार्य प्रभावीपणे होण्यासाठी पूर्वीच्या प्रशिक्षण व भेट योजनेच्या धर्तीवर प्रस्तावित केल्यानुसार कृषि विभागातील उपलब्ध मनुष्यबळाची पुनर्रचना करण्यात यावी.
५. कृषि विभागाच्या विस्तार व प्रशिक्षण विभागाशी योग्यप्रकारे समन्वय व सहकार्य प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने कृषि विद्यापीठांतर्गत सध्या अस्तित्वात असलेल्या दोन जिल्हयासाठी एक कृषि विस्तार विद्यावेत्ता ऐवजी प्रत्येक जिल्हयासाठी एक कृषि विस्तार विद्यावेत्ता (सहयोगी प्राध्यापक समकक्ष) पद नव्याने मंजूर करण्यात यावे.
६. कृषि विभागाच्या अखत्यारीतील सात प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (RAMETI) ज्या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात आहेत त्यांचेकडे मंजूर आस्थापनेसह वर्ग करण्यात याव्यात.
७. कृषि विस्तार प्रशिक्षणासाठी कार्यरत असलेली वसंतराव नाईक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर; मंजूर आस्थापनेसह महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचेकडे वर्ग करण्यात यावी.

## ७.५ वित्त विषयक शिफारशी

१. राज्यातील कृषि विदयापीठांना मागील तीन वर्षांच्या अर्थसंकल्पीय तरतुदींचा विचार करता मंजुर अनुदानापेक्षा सुमारे १५ टक्के कमी अनुदान प्राप्त झाले आहे. याकरीता कृषि विदयापीठांना शासनाकडून मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीप्रमाणे संपूर्ण निधी वितरीत करण्यात यावा.

२. अन्नसुरक्षा आणि कृषि क्षेत्राचा शाश्वत विकास यासाठी राज्याच्या स्थूल कृषि उत्पन्नाच्या (जी.डी.पी.) किमान एक टक्के रक्कम कृषि शिक्षण व संशोधनाकरिता कृषि विद्यापीठांना उपलब्ध करून द्यावी.

३. कृषि विद्यापीठांच्या जमिनींच्या कार्यक्षम वापरासाठी प्रत्येक कृषि विद्यापीठामध्ये एक प्रक्षेत्र संचालक आणि त्यांच्याकडे असलेल्या क्षेत्राचा विचार करून गरजेनुसार पदांची निर्मिती करणे अत्यंत निकडीचे आहे. यासाठी शासनाने कृषि विद्यापीठाकडून प्रस्ताव मागवून आवश्यक पदांना मंजूरी देण्यात यावी.

४. कृषि विदयापीठांमध्ये प्रशासकीय बाबींच्या अनुषंगाने करण्यात येणा-या विविध आकस्मिक खर्चांसाठी शासन निर्णय दिनांक- १८/१२/२००० नुसार शासनाकडून देण्यात येणारे वेतनेत्तर अनुदान हे वेतनावरील अनुदानाच्या १० टक्के या प्रमाणात नियमित देण्यात यावे.

५. कृषि विदयापीठामार्फत उत्पादीत करण्यात येत असलेले पैदासकार आणि पायाभूत बियाणे गुणवत्तापूर्ण आणि विश्वासार्ह असून बियाणे श्रृंखलेचा पाया आहे. हे बियाणे तज्ञ-शास्त्रज्ञाचे देखरेखीखाली काटेकोर निकषांच्या आधारे उत्पादीत होत असल्याने त्यांचा उत्पादन खर्च जास्त आहे. त्यामुळे पायाभूत बियाणाचा दर हा प्रमाणित बियाणे दराच्या दीड पट आणि पैदासकार बियाणाचा दर हा प्रमाणित बियाणे दराच्या दुप्पट या तत्वावर निश्चित करण्यात यावा.

६. शासनाकडून नव्याने स्थापित झालेल्या शासकीय कृषि व संलग्न महाविदयालयांच्या खर्चाची आर्थिक तरतूद पाच वर्षानंतर योजनांतर्गत योजनेतून योजनेत्तर योजनेत समावेश करावा.

७. कंत्राटी प्राध्यापक व कर्मचा-यांच्या वेतन अदायगी करण्यासाठी राज्य शासनाच्या इतर विभागाप्रमाणेच कृषि विद्यापीठांना १०-कंत्राटी सेवा हे उपलेखाशीर्ष उपलब्ध करून देण्यात यावे.

८. भारतीय कृषि अनुसंधान परिषद अनुदानित ७५:२५ कार्यक्रम योजनेखालील कर्मचा-यांच्या वेतनासाठी राज्य शासनाकडून देय असलेली २५ टक्के रक्कम नियमितपणे कृषि विदयापीठांना उपलब्ध करून देण्यात यावी.

९. विदयापीठांतील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन निश्चितीच्या पडताळणीसाठी शासनस्तरावरून धोरणात्मक निर्णय होवून कृषि परीषद स्तरावर सामायिक वेतन पडताळणी पथक निर्माण करण्यात यावे.

# परिशिष्ट - १ (अभ्यासगट गठण शासन निर्णय)

**महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या कार्याचे पुर्नविलोकन करण्यासाठी अभ्यासगट गठीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : मकृप १०२२/प्र. क्र.२६४/७-अे**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २५ एप्रिल २०२३

**संदर्भ :** मा.मंत्री (कृषि) यांचे दि.३०.११.२०२२ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना :-**

राज्यात महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी, जि.अहमदनगर, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी व डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली, जि. रत्नागिरी ही चार कृषि विद्यापीठे कार्यरत आहे. सदर कृषि विद्यापीठांचे प्रमुख उद्दिष्ट कृषि क्षेत्रात संशोधन, शिक्षण व विस्तार हे आहे.

महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठांमध्ये प्रभावी समन्वय व सुसूत्रता साधण्यासाठी महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ अन्वये नियम क्र.१२ नुसार दि.१० सप्टेंबर, १९८४ रोजी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. कृषि परिषदेचे मुख्यालय पुणे येथे आहे. राज्याचे कृषि मंत्री हे परिषदेचे पदसिध्द अध्यक्ष असतात.

चारही कृषि विद्यापीठातील प्राध्यापक, विभागप्रमुख, सहयोगी अधिष्ठाता, अधिष्ठाता आणि संचालक सवंर्गातील पदावर नियुक्तीसाठी सन २०१३ मध्ये कृषि परिषदे अंतर्गत महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच कृषि परिषदेत कृषि विद्यापीठांच्या कार्याचा आढावा घेणे, मूल्यमापन करणे, पर्यवेक्षण करणे आणि मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षण, संशोधन, विस्तार शिक्षण या सोबतच साधन सामुग्री विकास विभाग, वित्त आणि प्रशासन विभाग करण्यात आले आहेत.

कृषि क्षेत्र सध्या अनेक नैसर्गिक व जागतिक आव्हानांना सामोरे जात असून भविष्यात शेतीच्या स्थैर्यासाठी संशोधन व शिक्षण या क्षेत्रात कालसुसंगत बदल करण्याची आवश्यकता आहे. देश पातळीवर भारतीय कृषि अनुसंधान परिषद कार्यरत असून शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण यावर भरीव कार्य करीत आहे. राज्यात चार कृषि विद्यापीठे व एक पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ कार्यरत आहे. या सर्व विद्यापीठांना

त्यांचे कार्यक्षेत्रात कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण असे कार्य अधोरेखित केले आहे. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे कार्य कालसुसंगत व परिणामकारक असावे म्हणून याविषयी एक अभ्यासगट नेमणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या कार्याचे पुर्नविलोकन करण्यासाठी अभ्यासगट गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

१. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या कार्याचे पुर्नविलोकन करण्यासाठी अभ्यासगट गठीत करण्यात येत असून त्याबाबतच्या समितीची रचना खालीलप्रमाणे:

**समितीची रचना:-**

| अनु.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १. | डॉ. आर.बी. देशमुख, माजी कुलगुरू, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. | अध्यक्ष |
| २. | डॉ. उमाकांत दांगट, भा.प्र.से (से.नि.) माजी कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ३. | डॉ. पी.जी. पाटील, कुलगुरू, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. | सदस्य |
| ४. | डॉ. इंद्रमणी, कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी. | सदस्य |
| ५. | डॉ. शरद गडाख, कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | सदस्य |
| ६. | डॉ. संजय सावंत, कुलगुरू, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली. | सदस्य |
| ७. | डॉ. सुदाम अडसुळ, माजी संचालक, कृषि , महाराष्ट्र राज्य. | सदस्य |
| ८. | डॉ. दिलीप अ. देशमुख, माजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य. | सदस्य |
| ९. | महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परीषद, पुणे. | सदस्य सचिव |

२. उपरोक्त समितीने खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल विहीत कालावधीत शासनास सादर करावा.

अ. अहवाल तयार करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ चार कृषि विद्यापीठांपैकी कोणत्याही विद्यापीठाकडून तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन घेण्याचे अधिकार समितीस असतील.

ब. समितीचे कामकाज सुरु झाल्यापासून शासनास अहवाल सादर होईपर्यंत होणारा आर्थिक खर्च चारही कृषि विद्यापीठांनी त्यांच्या महसूली उत्पन्नातून समसमान स्वरुपात विभागून घ्यावा व तो समितीचे सदस्य सचिव यांचेकडे जमा करावा.

क. समितीचे संपूर्ण प्रशासकीय व आर्थिक कामकाज सदस्य सचिव यांचेमार्फत करण्यात यावे.

ड. समितीने आपला अहवाल ४५ दिवसात कृषि परिषदेमार्फत शासनास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२३०४२५२००१५७६९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

UMESH NARAYAN CHANDIWADE

**(उमेश चांदिवडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री (कृषि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.
९. श्री.उमाकांत दांगट, भा.प्र.से (से.नि.) माजी कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
१०.डॉ. सुदाम अडसुळ, माजी संचालक (कृषि), महाराष्ट्र राज्य.
११.डॉ.पी.जी. पाटील, कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर,
१२.डॉ. शरद गडाख, कुलगुरु, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
१३.डॉ. इंद्रमणी, कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
१४.डॉ. संजय सावंत, कुलगुरु, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
१५.डॉ. आर.बी. देशमुख, माजी कुलगुरू, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
१६.डॉ. दिलीप अ. देशमुख, देऊळगावबंडा, ता.रिसोड, जि.औरंगाबाद.
१७.निवडनस्ती ७-अे.

# परिशिष्ट - २ (अभ्यासगट कार्यकक्षा शासन निर्णय)

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबई.

दूरध्वनी क्र ०२२-२२०२३११६ Email ID : desk7a.agri-mh@gov.in

---

क्रमांक : मकृप-१०२२/प्र.क्र.२६४/७ अे. दिनांक: ०१/०६/२०२३.

प्रति,
महासंचालक,
महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे.

**विषय:**- महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या कार्याचे पुनर्विलोकन करण्यासाठी अभ्यासगट गठीत करणेबाबत...

**संदर्भ:** १) कृषि व पदुम विभाग,शासन निर्णय, क्रमांक:मकृप-१०२२/प्र.क्र.२६४/७-अे, दि.२५/०४/२०२३.

२) आपले पत्र जा.क्रमांक: मकृप/संशोधन-पुनर्विलोकन/प्र.क्र.६२३/१२११/२०२३, दि.०३/०५/२०२३ रोजीचे पत्र.

३) कृषि व पदुम विभाग,शासन शुध्दीपत्रक, क्रमांक मकृप-१०२२/प्र.क्र.२६४/७-अे दि.०१/०६/२०२३.

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील दि.२५/०४/२०२३ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या कार्याचे पुर्नविलोकन करण्यासाठी अभ्यासगट गठीत करण्यात आला असून त्याकरीता डॉ.आर.बी.देशमुख,माजी कुलगुरु महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी यांच्या अध्यक्षतेखाली समितीची रचना करण्यात आली आहे. सदर शासन निणर्यान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीने महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या कार्याचे पुनर्विलोकन करुन समितीचा अहवाल ४५ दिवसांत शासनास सादर करावा, असे निर्देशीत करण्यात आले आहे. तथापि, आपल्या उक्त संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये विनंती केल्यानुसार सदर समितीने केवळ कृषि परिषदेच्या कार्याचे पुनर्विलोकन न करता चारही कृषि विद्यापीठाच्या कार्याचे पुनर्विलोकन करणे आवश्यक असल्याने, समितीने चारही कृषि विद्यापीठे व कृषि परिषद यांच्या कामकाजाचे खालीलनमूद कार्यकक्षेत कामकाजाचे पुनर्विलोकन करुन आपला अहवाल सहा महिने (दि.३१/१०/२०२३ पर्यंत) शासनास सादर करावा, असे आपणांस कळविण्यात येत आहे. सदरची बाब समितीचे अध्यक्ष व समितीमधील सर्व सदस्यांना कृपया अवगत करावे, ही विनंती.

**चारही कृषि विद्यापीठे व कृषि परिषद यांच्या कामकाजाचे विषयासंदर्भात प्रस्तावित कार्यकक्षा-**

| अ.क्र. | विभाग/विषय | अभ्यासगट कार्यकक्षा |
|---|---|---|
| १ | प्रशासन | कृषि क्षेत्राच्या भविष्याचा वेध घेऊन कृषि शिक्षण व संशोधन परिषद आणि राज्यातील कृषि विद्यापीठे यांच्या संदर्भातील कायदेशीर तरतूदी व प्रचलित नियमावली यांचा आढावा घेऊन कालसुसंगत सुधारणा सुचविणे. |

| | | |
|---|---|---|
| २ | शिक्षण | राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी सुसंगत राज्य कृषि शिक्षण धोरणाचे प्रारूप व त्यानुषंगिक अंमलबजावणी कृती आराखडा तयार करणे. |
| ३ | संशोधन | कृषि विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या संशोधन केंद्रांचा संक्षिप्त आढावा घेऊन त्यांचे बळकटीकरण करणे तसेच राज्यात नव्याने लागवडीखाली आलेल्या व प्रस्थापित होत असलेल्या पिकावरील संशोधनासाठी उपाययोजना सुचविणे. |
| ४ | विस्तार शिक्षण | कृषि विद्यापीठांतर्गत चालू असलेल्या विस्तार शिक्षण कार्यक्रमांचा राज्याच्या कृषि विभागाच्या कृषि विस्तार योजनांशी पूर्वीच्या प्रशिक्षण व भेट योजनेप्रमाणे सांगड घालून आणि समन्वय व सहकार्य वाढवून अद्ययावत तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषि विस्तार यंत्रणा सक्षम व परिणामकारक करण्यासाठी उपाय सुचविणे. |
| ५ | वित्त | अ) कृषि विद्यापीठांना मिळणारी अनुदाने, त्यांची स्व-उत्पन्नाची साधने आणि अन्य आर्थिक स्त्रोतांचा आढावा घेऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.<br>ब) विद्यापीठांचे शासनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे. |
| ६ | साधनसामुग्री विकास | कृषि विद्यापीठांकडे असलेल्या जमिनीसंदर्भात संरक्षण व व्यवस्थापन करीता उपाययोजना सुचविणे. |

आपला,

(उमेश चांदिवडे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत : १) मा.मंत्री (कृषि), यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.

# परिशिष्ट - ३ (अभ्यासगट बैठकांचा तपशील)

**कार्यकक्षा :** महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद आणि राज्यातील चारही कृषि विद्यापीठांच्या पुनर्विलोकनासाठी गठीत अभ्यासगटाच्या संपन्न झालेल्या बैठकांबाबतचा तपशील

| अ. क्र. | दिनांक | बैठक | ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | ०१/०५/२०२३ | ऑनलाईन पध्दतीने -शासन निर्णयाच्या अनुषंगाने प्राथमिक बैठक | कृषि परिषद, पुणे |
| २. | ०५/०६/२०२३ | मकृप पुनर्विलोकन अभ्यासगटाची बैठक - अभ्यासगट कार्यकक्षानिहाय सहा स्वतंत्र उपसमित्या स्थापन करण्यात आल्या | फळ संशोधन केंद्र, हिमायतबाग, औरंगाबाद |
| ३. | ०५/०६/२०२३ | जालना छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील शासकीय व खाजगी शैक्षणिक संस्था, कृषि संशोधन केंद्र, कृषि विज्ञान केंद्र तसेच प्रगतशिल शेतीकरी आणि कृषि विद्यापीठातील सेवानिवृत्त कृषि तज्ञांसोबत बैठक | फळ संशोधन केंद्र, हिमायतबाग, औरंगाबाद |
| ४. | ०३/०७/२०२३ | प्रशासन उपसमितीची बैठक | कृषि परिषद, पुणे |
| ५. | ०३/०७/२०२३ | साधन सामुग्री विकास उपसमितीची बैठक | कृषि परिषद, पुणे |
| ६. | १७/०७/२०२३ | वित्त उपसमिती बैठक | कृषि महाविद्यालय, पुणे |
| ७. | २०/०७/२०२३ | शिक्षण उपसमिती बैठक | वनामकृवि, परभणी |
| ८. | २५/०७/२०२३ | संशोधन उपसमिती बैठक | डॉ. पंदेकृवि, अकोला |
| ९. | ११/०८/२०२३ | विस्तार शिक्षण उपसमिती बैठक | डॉ. बासाकोकृवि, दापोली |
| १०. | १६/१०/२०२३ | शिक्षण, साधन सामुग्री विकास व वित्त उपसमितीचा अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| ११. | २०/१०/२०२३ | प्रशासन उपसमितीचा अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| १२. | २६/१०/२०२३ | संशोधन आणि विस्तार शिक्षण उपसमितीचा अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| १३. | ०९/११/२०२३ | मकृप पुनर्विलोकन अभ्यासगटाच्या अहवालावर चर्चा करणेसाठी बैठक | कृषि परिषद, पुणे |
| १४. | २२/११/२०२३ | शिक्षण उपसमितीचा अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| १५. | २३/११/२०२३ | संशोधन उपसमितीचा अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| १६. | २८/११/२०२३ | विस्तार शिक्षण उपसमितीचा अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| १७. | २९/११/२०२३ | प्रशासन उपसमितीचा अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |

| | | | |
|---|---|---|---|
| १८. | ०६/१२/२०२३ | संशोधन उपसमितीचा अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| १९. | ११/०१/२०२४ | वित्त उपसमितीचा अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| २०. | १२/०१/२०२४ | साधन सामुग्री विकास उपसमितीचा अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| २१. | ३०/०१/२०२४ | वित्त उपसमितीचा अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| २२. | ३१/०१/२०२४ | शिक्षण उपसमितीचा अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| २३. | ०१/०२/२०२४ | शिक्षण उपसमितीचा अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| २४. | १६/०२/२०२४ | मकृप समिती अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| २५. | १७/०२/२०२४ | मकृप समिती अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| २६. | २०/०२/२०२४ | मकृप समिती अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| २६. | २०/०२/२०२४ | मकृप समिती अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| २७. | २१/०२/२०२४ | मकृप समिती अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |
| २८. | २२/०२/२०२४ | मकृप समिती अहवाल अंतिम करणेबाबत बैठक | कृषि परिषद, पुणे |

# परिशिष्ट - ४ (कृषि विद्यापीठांचे संशोधनातील महत्वपूर्ण योगदान)

## कृषि विद्यापीठांचे संशोधनातील महत्वपूर्ण योगदान

### महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

| अ.क्र. | पीक | महत्वपुर्ण वाण / अवजारे / यंत्र / तंत्रज्ञान |
|---|---|---|
| १. | गहू | फुले सात्विक, फुले समाधान, त्रिबंक, तपोवन, गोदावरी |
| २. | रब्बी ज्वारी | वसुधा, रेवती, सुचित्रा, अनुराधा |
| ३. | गोड ज्वारी | फुले वसुंधरा (सीएसएच -४७) इथेनॉलसाठी |
| ४. | बाजरी | महाशक्ती, धनशक्ती |
| ५. | भात | इंद्रायणी, समृध्दी |
| ६. | भुईमूग | फुले प्रगती (जेएल-२४), जेएल-५०१, फुले उन्नती |
| ७. | सोयाबीन | फुले संगम, फुले दुर्वा, फुले किमया, फुले कल्याणी |
| ८. | करडई | फुले गोल्ड (एस एस एफ-१५-६५), फुले चंद्रभागा |
| ९. | तूर | विपुला, राजेश्वरी |
| १०. | हरभरा | फुले जी-५, विजय, दिग्विजय, विक्रम, विशाल |
| ११. | उडीद | फुले वसु (पीयु-०६०९-४३), टी पी यु-४ |
| १२. | मूग | वैभव |
| १३. | ऊस | को-८६०३२ व फुले -०२६५, फुले - १०००१ |
| १४. | डाळिंब | भगवा व फुले भगवा सुपर |
| १५. | कांदा | फुले समर्थ, बसवंत ७८० |
| १६. | तंत्रज्ञान | कांदा चाळ तंत्रज्ञान, पीक पध्दती, कोरडवाहू शेती तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन |
| १७. | हळद | फुले हरिद्रा, फुले स्वरुपा, फुले कृष्णा |
| १७. | लिंबू | साई सरबती, फुले सरबती |
| १८. | चारा पिके | नेपिअर गवत - फुले गुणवंत, फुले जयवंत, मका - अफ्रिकन टॉल, ज्वारी -- गोधन, फुले अमृता |

### डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

| अ.क्र. | पीक | महत्वपुर्ण वाण / अवजारे / यंत्र / तंत्रज्ञान |
|---|---|---|
| १. | ज्वारी | सीएसएच - १४, पीकेव्ही क्रांती |
| २. | धान | पीडीकेव्ही तिलक, पीडीकेव्ही साधना |
| ३. | कापूस | एकेए-५, सुवर्ण शुभ्रा, एकेएच-०८१, पीकेव्ही हायब्रीड २ बीजी -II |
| ४. | सोयाबीन | यलो गोल्ड, पीडीकेव्ही अंबा, सुवर्ण सोया |
| ५. | भुईमुग | टीएजी २४, टीएजी ७३ |
| ६. | हरभरा | जाकी - ९२१८, पीडीकेव्ही कनक |
| ७. | तूर | पीकेव्ही तारा, आश्लेषा |
| ८. | चवळी | पीडीकेव्ही - ऋतुजा |

| | | |
|---|---|---|
| ९. | उडीद | टीएयु १ |
| १०. | संत्रा | नागपूर संत्रा, नागपूर संत्रा बियाणेरहित, पीडीकेव्ही संत्रा-०५ |
| ११. | मोसंबी | काटोल गोल्ड |
| १२. | लिंबू | पीडीकेव्ही लाईम, पीडीकेव्ही बाहार, पीडीकेव्ही चक्रधर |
| १३. | कृषि यंत्र | पीकेव्ही मिनीदाल मिल (३ अश्वशक्ती) |
| १५. | कृषि यंत्र | ट्रॅक्टरचलित रुंद वरंबा व सरी पध्दत पेरणीयंत्र |
| १६. | कृषि यंत्र | चारोळी बीज प्रतवारी व फोडणी यंत्र |

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी**

| अ.क्र. | पीक | महत्वपुर्ण वाण / अवजारे / यंत्र / तंत्रज्ञान |
|---|---|---|
| १. | ज्वारी | परभणी मोती (रब्बी) परभणी शक्ती(खरीप) |
| २. | संकरीत बाजरी | एएचबी १२०० |
| ३. | कापुस | एनएचएच ४४, एनएचएच ४४ - बीजी -२, |
| ४. | देशी कापूस | पीए-८१०, पीए-८१२, पीए-७४०, पीए-०८ |
| ५. | सोयाबीन | एमएयुएस ७१, १६२, ६१२, ७२५ |
| ६. | करडई | परभणी सुवर्णा (पीबीएनएस-१५४) |
| ७. | भूईमूग | टीएलजी-४५, एलजीएन-१२३ |
| ८. | तूर | बीडीएन ७११, बीडीएन ७१६, बीएसएमआर ७३६, गोदावरी (बीडीएन २०१३-४१) |
| ९. | चिंच | प्रतिष्ठान, शिवाई |
| १०. | कृषि यंत्र | बैलचलित बहुउद्देशीय यंत्र |

**डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**

| अ.क्र. | पीक | महत्वपुर्ण वाण / अवजारे / यंत्र / तंत्रज्ञान |
|---|---|---|
| १. | भात | कर्जत , रत्नागिरी, पनवेल, सहयाद्री |
| २. | काजू | वेंगुर्ला १ ते ९ |
| ३. | आंबा | हापूस, सिंधु, रत्ना, नियमित फुलोरा तंत्रज्ञान (कल्टार) |
| ४. | नारळ | टी X डी, डी X टी |
| ५. | जांभूळ | बहाडोली |
| ६. | जायफळ | सुगंधा, स्वाद, श्रीमंती |
| ७. | सुपारी | श्रीवर्धन |
| ८. | नागली | दापोली-२, दापोली-३ |
| ९. | चवळी | कोकण सदाबहार, कोकण सफेद |
| १०. | वाल | कोकण भूषण |
| ११. | भुईमूग | कोकण भूरत्न |
| १२. | कृषि यंत्र | बासाकोकृवि हस्त व पदचलीत इंधन वडी यंत्र. |

## कृषि विद्यापीठांच्या कृषि विस्तार शिक्षण संचालनालयाची शासन कृषि विभागाच्या विस्तार कार्यक्रमांशी सांगड

### १) स्वातंत्र्यपूर्वकाळातील कृषि विभाग

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश राजवटीत वारंवार भेडसावणाऱ्या दुष्काळाचा सामना करण्यासाठी तसेच वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी शेती उत्पादन वाढविणे आवश्यक होते. ही बाब लक्षात घेऊन सन १८८१ मध्ये नेमलेल्या फॅमीन कमीशन (Famine Commission) च्या शिफारशीनुसार सन १८८३ मध्ये कृषि विभागाची स्थापना करण्यात आली. सन १९१५-१६ मध्ये तत्कालीन कृषि संचालक श्री. किटिंग यांनी जमिनीची धूप थांबविण्यासाठी काही प्रयोग केले होते. त्या प्रयोगांची यशस्वीता व शिफारशी लक्षात घेऊन १९२२ सालांपासून मृद संधारणांच्या कामाला सुरुवात झाली. सन १९४३ मध्ये जमीन सुधारणा कायदा अंमलात आला आणि ती कामे कृषि विभागामार्फत सुरु झाली. तत्कालीन सरकारद्वारे प्रथमच सर्वकष कृषि धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली.

### २) स्वातंत्र्योत्तर  काळातील सन १९८१-८२ पर्यंतची कृषि विस्तार कार्यपद्धती

स्वातंत्र्योत्तर काळात शेतीच्या विकासाला चालना देण्यासाठी शासनाने अनेक योजनांची अंमलबजावणी सुरू केली. बियाणे ही कृषि उत्पादनातील मूलभूत निविष्ठा आहे आणि उत्तम प्रतीच्या बियाणावर कृषि उत्पादन अवलंबून असते, अन्यथा इतर निविष्ठांवर केलेला खर्चसुद्धा वाया जातो. ही बाब लक्षात घेऊन सन १९५७ पासून तालुका बिजगुणन केंद्रांमार्फत दर्जेदार बियाणे उत्पादनास सुरूवात झाली. या काळात लागवडीखालील क्षेत्राच्या विस्ताराबरोबरच सिंचनाखालील क्षेत्र वाढीवर सुध्दा भर देण्यात आला. सन १९५७ पासून अधिक धान्य उत्पादनासाठी रासायनिक खतांचा वापर सुरू झाला. सन १९६५-६६ पासून अधिक उत्पादन देणाऱ्या व संकरीत पीक वाणांच्या वापरातून हरित क्रांतीची मुहुर्तमेढ रोवली गेली.

या कार्यकाळात शेतकऱ्यांमध्ये कृषि तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून कृषि विद्यापीठे, राज्य शासनाचा कृषि विभाग, जिल्हा परिषदेकडील कृषि विभाग यांच्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचा एक अंगभूत भाग म्हणून हळूहळू कृषि विस्ताराचे काम सुरु झाले. ग्राम पातळीवरील कृषि विस्ताराचे काम मुख्यत: जिल्हा परिषदेकडील ग्रामसेवकांमार्फत होत होते. त्यानंतर पुढे कृषि विद्यापीठात कृषि विस्तार विभाग स्वतंत्रपणे कार्यरत झाला. त्या विभागाच्या दिशा-दर्शनानुसार कृषि विद्यापीठे आणि कृषि विभागात 'लॅब टु लँड' (Lab to Land) अधिक धान्य उत्पादन कार्यक्रम, अधिक उत्पादन देणाऱ्या तसेच संकरीत बियाणांचा प्रचार आणि प्रसार, माती परीक्षणानुसार खत वापर, ग्राम दत्तक योजना, कृषि पंढरी योजना, अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम, शेतकरी प्रशिक्षण, हंगामपूर्व प्रशिक्षणे, शेतकरी मेळावे, शेतकरी मासिक इ. माध्यमातून कृषि विस्ताराचे कामकाज होत होते. परंतु या कृषि विस्तार कामाला एक निश्चित दिशा किंवा त्याच्यात सुसूत्रता नव्हती. थोडक्यात, विशिष्ट योजनेच्या किंवा कार्यक्रमाच्या गरजेनुसार कृषि विस्ताराचे कार्य होत असे.

### ३) सन १९८१-८२ ते १ जुलै १९९८ या कालखंडातील प्रशिक्षण व भेट योजना

जागतिक बँकेचे तत्कालीन सल्लागार डॅनियल बेनॉर यांनी कृषि विस्तारासाठी एक अभिनव कार्यपद्धती सुचविली. त्याला 'बेनॉर पॅटर्न' असे संबोधले जात होते. ही योजना पुढे काही विकसनशील देशांमध्ये जागतिक बँकेच्या सहकार्याने राबविली गेली. कृषि विद्यापीठांमधील संशोधित झालेले आधुनिक तंत्रज्ञान सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहचवून त्याचा अवलंब व्हावा म्हणून १९८१ साली प्रथम ही योजना राज्यातील चार जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर 'प्रशिक्षण व भेट योजना' या नावाने सुरू करण्यात आली. या योजनेची यशस्विता आणि उपयोगिता लक्षात घेऊन सन १९८२ पासून या

योजनेची व्याप्ती वाढवून ती संपूर्ण राज्यभर सुरू करण्यात आली. या योजनेत शेतकरी हा केंद्रबिंदू मानून आणि कृषि तंत्रज्ञान विस्तारासाठी आवश्यक त्या सर्व पद्धती आणि संसाधनांचा योग्य वापर करून शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करणारी यंत्रणा उभी करण्यासाठी कृषि विभागाची पुनर्रचना करण्यात आली होती. या योजनेत कृषि विद्यापीठे आणि राज्य शासनाचा कृषि विभाग यांच्यात वेगवेगळ्या स्तरावर योग्य समन्वय साधण्यात आला होता. गाव पातळीपासून राज्य पातळीपर्यंत प्रशिक्षणे, पीक आणि तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, मिनिकीटस, आद्यरेषीय प्रात्यक्षिके, स्वीकृत चाचण्या (Adaptive Trials), प्रक्षेत्र भेटी, चर्चासत्रे, मेळावे, प्रदर्शने इ. कृषि विस्तार पध्दतींचा प्रभावी वापर करून कृषि विस्ताराला चालना देण्यात आली. त्या योजनेची रचना आणि कार्यपद्धती थोडक्यात खालीलप्रमाणे होती.

**अ) ग्राम स्तर**

कृषि तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या शेतावर पोहचविण्यासाठी गाव पातळीवर कृषि सहाय्यक/ कृषि पर्यवेक्षक संवर्गामधून ग्राम कृषि विस्तारक हे पद निर्माण करण्यात आले होते. प्रशासकीय सोईच्या दृष्टीने कृषि सहाय्यकाकडे तुलनात्मक छोटे कार्यक्षेत्र, तर कृषि पर्यवेक्षकाकडे मोठा सजा देण्यात आला होता. एका ग्राम कृषि विस्तारकाचे साधारणतः ८००-९०० शेतकरी येतील, याप्रमाणे ३ ते ४ गावांचे कार्यक्षेत्र ठरविण्यात आले होते. ग्राम कृषि विस्तारकाचा प्रत्येक आठवड्याचा फिरती कार्यक्रम ठरवून कोणत्या दिवशी कोणत्या गावाला भेट द्यायची हे त्यानुसार निश्चित केलेले असे. ग्राम कृषि विस्तारकाला सर्व गावातील सर्व शेतकऱ्यांना भेटणे शक्य नसल्यामुळे प्रत्येक गावात संपर्क शेतकऱ्यांची निवड करण्यात आली होती व त्यांच्या माध्यमातून उर्वरीत शेतकऱ्यांपर्यंत कृषि तंत्रज्ञान पोहोचविण्यात येत होते.

**आ) मंडळ स्तर**

ग्राम स्तरावर काम करणाऱ्या १० ते १२ ग्राम कृषि विस्तारकांच्या कामावर संनियंत्रण करण्यासाठी मंडळ कृषि अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. एका तालुक्यात भौगोलिक क्षेत्रानुसार २ ते ४ मंडळ कृषि अधिकारी नियुक्त केले जात होते. हे मंडळ कृषि अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील फिरतीवेळी ग्राम कृषी विस्तारकाने केलेल्या कामाच्या आढाव्यावेळी आवश्यक तेथे त्यांना मार्गदर्शन करीत असत. तसेच मंडळ कृषि अधिकारी स्तरावर प्रत्येक महिन्यात एक पंधरवडा प्रशिक्षण वर्ग आयोजित केला जात असे. त्यावेळी उपविभागीय स्तरावरून मंडळ कृषि अधिकाऱ्यांना प्राप्त झालेल्या कृषि विषयक संदेशाचे वाचन होऊन त्यावर सविस्तर चर्चा केली जात असे आणि तंत्रज्ञान वापरताना शेतकऱ्यांकडून मिळालेले प्रत्याभरण / समस्या उपविभागीय स्तरावर होणाऱ्या प्रशिक्षण वर्गात मांडल्या जात असत.

**इ) उपविभागीय स्तर**

जिल्ह्यातील तालुक्यांची संख्या विचारात घेऊन प्रत्येक जिल्ह्यात ३ ते ४ उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालये असत. त्याच्या कार्यालयात तीन विषय विशेषज्ञांचा चमू असे. उपविभागातील सर्व कर्मचारी आणि अधिकाऱ्यांवर उपविभागीय कृषि अधिकाऱ्याचे प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रण होते, तर उपविभागातील मंडळ कृषि अधिकारी व ग्राम कृषि विस्तारकांना प्रशिक्षण देण्याचे व तांत्रिक मार्गदर्शनाचे काम विषय विशेषज्ञांमार्फत पार पाडले जात होते. महिन्यातून एक वेळ उपविभागीय स्तरावर एक पंधरवडा प्रशिक्षण वर्ग आयोजित केला जात असे. त्यामध्ये मासिक जिल्हा चर्चासत्रातून प्राप्त झालेले संदेशांचे वाचन होऊन ते शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी मंडळ कृषि अधिकारी व ग्राम कृषि विस्तारकांना दिले जात असत. त्याचवेळी त्यांच्याकडून आलेले प्रत्याभरण / समस्यांवर सविस्तर चर्चा होऊन त्याला उत्तरे दिली जात असत. ज्या समस्यांवर उत्तरे देणे शक्य नसे अशा समस्या मासिक जिल्हा चर्चासत्रात मांडल्या जात असत.

**ई) जिल्हा स्तर**

जिल्ह्यातील या योजनेच्या अंमलबाजवणीसाठी प्रमुख कृषि अधिकारी (प्रशिक्षण व भेट) या कार्यालयाची निर्मिती केली होती. त्यांच्या कार्यालयीन कामामध्ये तांत्रिक सहाय्य करण्यासाठी एक जिल्हा विषय विशेषज्ञ नियुक्त करण्यात आला होता.

प्रत्येक जिल्ह्यात महिन्यातून दोन दिवसाचे एक मासिक जिल्हा चर्चासत्र आयोजित केले जात असे. त्यातील एक दिवस क्षेत्रीय भेटीसाठी, तर दुसरा दिवस कृषि विद्यापीठ किंवा कृषि संशोधन केंद्रावर कृषि विद्यापीठ शास्त्रज्ञ आणि कृषि विभागातील अधिकाऱ्यांमधील चर्चेसाठी राखीव असे. क्षेत्रीय भेटीत प्रक्षेत्रावरील अडचणी, झालेली चांगली कामे इ. ची पाहणी केली जात असे. तसेच चर्चेवेळी कृषिशी निगडीत इतर विभागांच्या अधिकाऱ्यांचाही सहभाग असे. या चर्चेत महिन्याभराच्या कालावधीत झालेल्या कामांचा आढावा घेतला जात असे. तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कृषि विस्तार कार्य करीत असताना आलेल्या अडचणींचा ऊहापोह होऊन त्यावर समर्पक उत्तरे दिली जात असत. त्यानंतर पुढील महिन्याच्या कालावधीसाठी कृषि संदेश तयार करून त्यावर सांगोपांग चर्चा करून ते अंतिम केले जात असत. याशिवाय हंगामनिहाय चर्चासत्रे, शेतकरी मेळावे, कृषि प्रदर्शने, प्रात्यक्षिके, शिवारफेऱ्या, कृषि तंत्रज्ञान सप्ताह, कृषि दिंडी इ. कृषि विस्तार विषयक कार्यक्रमांचे आयोजन करून अत्यंत प्रभावीपणे तंत्रज्ञान प्रसाराचे काम केले जात असे

**उ) विभाग स्तर**

साधारणत: ३ ते ५ जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र मिळून विभागीय स्तरावर प्रशासकीय व तांत्रिक संनियंत्रणासाठी विभागीय कृषि सह-संचालक कार्यालयाची स्थापना करण्यात आली होती.

**ऊ) राज्य स्तर**

राज्य स्तरावर प्रशिक्षण व भेट योजनेची जबाबदारी तत्कालीन अतिरिक्त संचालक (विस्तार) यांच्याकडे सोपविण्यात आली होती. त्यावेळी त्यांचे नियंत्रण अधिकारी कृषि संचालक हे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी होते आणि ते कृषि विभागाचे राज्यस्तरीय विभाग प्रमुख म्हणून कार्यरत होते. त्यांच्या नियंत्रणात विस्तार विभागाबरोबरच मृद-संधारण विभाग, निविष्ठा व गुणवत्ता नियंत्रण विभाग आणि फलोत्पादन विभागही होते. प्रशिक्षण व भेट योजनेतील अधिकारी / कर्मचारी यांचेकडे फक्त कृषि विस्ताराचेच काम सोपविण्यात आले होते. त्यांना अन्य कामात गुंतविले जात नव्हते. गाव पातळीपासून राज्य पातळीपर्यंतचे सर्व अधिकारी / कर्मचारी त्यांना ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यरत असत. या कालावधीत कृषि विद्यापीठे आणि कृषि विभागामध्ये योग्य समन्वय होता, परिणामी कृषि तंत्रज्ञान प्रसाराचे काम अत्यंत प्रभावीपणे होत होते. शेतकऱ्यांचे शेती उत्पादन विषयक प्रश्न, अडी-अडचणी कृषि विभाग आणि विद्यापीठ स्तरावर पोहचून त्यावर ऊहापोह होऊन संशोधनाची दिशा शेतकऱ्यांच्या गरजेनुसार निश्चित होत होती. याच काळात कृषि तंत्रज्ञान प्रसारासोबतच अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांचा प्रचार आणि प्रसार होऊन पीक उत्पादन वाढीला चालना मिळाली. शेतकऱ्यांना त्यांच्या बांधावर तंत्रज्ञान मिळू लागले. पिकांच्या घनतेत वाढ होऊ लागली. निविष्ठांचा वापर वाढू लागला. शेतमजुरांच्या रोजगारात वाढ झाली. आणि कृषि विद्यापीठाने शिफारस केलेल्या तंत्रज्ञानाच्या वापराचा वेग वाढू लागला. या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणून कृषि उत्पादन वाढीला चालना मिळाली. त्यामुळे प्रशिक्षण व भेट योजना हे कृषि तंत्रज्ञान प्रसाराचे आजपर्यंत राबविण्यात आलेले सर्वोत्तम मॉडेल ठरले.

जागतिक बँकेचे अर्थसहाय्य बंद झाल्यानंतर ही योजना राज्य शासनाच्या निधीमधून पुढे सुरू राहिली. या दरम्यानच्या कालावधीत कृषि विस्तार कार्याबरोबरच इतर काही विकास योजनांची अंमलबजावणी या यंत्रणेकडे देण्यात आली. जसजशी अन्य कामे वाढत गेली तसतसा प्रशिक्षण व भेट योजनेच्या मूळ कामाला वेळ कमी पडू लागला व हे काम हळूहळू विस्कळीत होऊ लागले.

**ई) सन १९९८ पासून आजतागायत प्रचलित कार्यपद्धती**

१ जुलै, १९९८ रोजी कृषि विभागाची पुनर्रचना करण्यात आली. त्यामध्ये ग्राम पातळीपासून राज्य पातळीपर्यंत कृषि विभागाची कामे एकाच छत्राखाली आणली गेली. त्यामुळे ग्राम, तालुका, जिल्हा तसेच विभाग पातळीवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कृषि विभागातील सर्व विषयांची आणि योजनांची कामे एकत्रितरित्या करावी लागू लागली. त्यामुळे साहजिकच एकाच अधिकारी / कर्मचाऱ्यांवर सर्व कामांचा बोजा येऊन त्याच्यावर एकाच वेळी सर्व कामांचे दडपण येऊ लागले. त्यामुळे अत्यंत निकडीच्या कामांचा निपटारा करण्याकडे त्याचा कल वाढत गेला. परिणामी, कृषि विस्ताराच्या कामाकडे त्याला पुरेसे लक्ष देता येईनासे झाले. खरे तर कृषि विस्ताराचे काम करण्यासाठी संपूर्णपणे वाहून घेऊन काम करणारा पूर्ण वेळ स्वतंत्र कर्मचारी वृंद लागतो. इतर कामे सांभाळून फावल्या वेळात करण्याचे हे काम नाही. या सर्व बदलामुळे सध्या कृषि विस्तार कार्यक्रम काहीसा दुर्लक्षित झाला आहे. या सर्व बाबींचा विचार करून पूर्वीच्या प्रशिक्षण भेट योजनेच्या धर्तीवर कृषि विस्तार कामासाठी कृषि विभागाच्या कामाची नव्याने पुनर्रचना करणे आवश्यक आहे.